सोलापूर **तरुण भारत**

Solapur Tarun Bharat

न मे कर्मफले स्पृहा

छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित

छत्रपती संभाजीनगर | सोमवार, २३ सप्टेंबर २०२४ | वर्ष दुसरे | अंक १८१ | पाने : ८ | किंमत रु. ६/- | www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## नोकरी महोत्सवात १५०० तरुणांना मिळाली रोजगाराची संधी

### आमदार सतीश चव्हाण यांचा स्तुत्य उपक्रम



तभा वृत्तसेवा

गंगापूर दि २२ सप्टेंबर : आमदार सतीश चव्हाण यांच्यावतीने आयोजित करण्यात आलेल्या नोकरी महोत्सवात सुशिक्षीत बेराजगार तरुण तरुणींचा उत्स्फुर्त प्रतिसाद मिळाला. ४५०० हून अधिक तरुणांनी या नोकरी महोत्सवात सहभाग नोंदविला. त्यापैकी १३९८ युवकांना विविध नामांकित कंपन्यांमध्ये चांगल्या पगाराची नोकरी मिळाली.

आमदार सतीश चव्हाण यांच्या वतीने गंगापूर शहरातील श्री मुक्तानंद महाविद्यालयात आज (दि.२२) नोकरी महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये मुंबई, पुणे, छत्रपती संभाजीनगर, सोलापूर, अहमदनगर येथील टाटा सर्व्हिसेस, महिंद्रा न्ड महिंद्रा, लक्ष्मी हायड्रॉलिक, एसबीआय बँक, एक्सीस बँक, आयसीआयसीआय बँक, युरेका यासह ६५ हून अधिक नामांकित कंपन्या सहभागी झाल्या होत्या. विद्यार्थ्यांची शैक्षणिक पात्रता, गुणवत्ता व मुलाखतीच्या आधारे विद्यार्थ्यांना विविध कंपन्यामध्ये वार्षिक ३ते ४लाख रुपये पॅकेजच्या पगारांच्या नोकरी देण्यात आला. तर दुसऱ्या फेरीसाठी १४७० विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली आहे.

कार्यक्रमाच्या उदघाटन प्रसंगी व्यासपीठावर आयोजक आमदार सतीश चव्हाण यांच्यासह माजी आमदार ड.लक्ष्मणराव मनाळ, माजी नगराध्यक्ष संजय जाधव, जॉब फेअर इंडियाच्या संचालिका तस्मिया शेख आदींची उपस्थिती होती. उदघाटन प्रसंगी बोलतांना आमदार सतीश चव्हाण म्हणाले की, शिक्षण घेऊन लाखो तरुण आज बेरोजगार आहेत. या रिकाम्या हातांचे काय करायचे? असा सर्वात मोठा प्रश्न आपणा समोर आहे. शेतीवर अवलंबून राहणे आता शक्य होत नाही. त्यामुळे शेतीतून बाहेर पडण्याचे प्रमाण वाढले तसा इतर रोजगारांचा शोध सुरु झाला. पुर्वी शिक्षण घेणाऱ्यांचे प्रमाण देखील कमी होते. त्यामुळे सहज नोकरी उपलब्ध होत होती. मात्र आज शिक्षण घेणाऱ्यांची वाढलेली संख्या आणि रोजगाराच्या संधीचा अभाव यातून मोठी समस्या आपल्या समोर उभी आहे. गंगापूर -खुलताबाद तालुक्यातील असंख्य सुशिक्षीत तरुण तरुणींना या नोकरी महोत्सवाच्या माध्यमातून नोकरीच्या संधी उपलब्ध होतील याचे नक्कीच समाधान आहे.

# देशाबाहेर राष्ट्रवाद सोडून इतर कशाचाही विचार करणे अयोग्य - उपराष्ट्रपती

दमण, २२ सप्टेंबर : कोणालाही भारताबाहेर जाऊन भारताबद्दल वाईट बोलण्याचा, भारताच्या शत्रूंसोबत बसण्याचा अधिकार नाही. आपण जेव्हा देशाबाहेर जातो तेव्हा देशाचे राजदूत असतो, त्यामुळे राष्ट्रवाद सोडून इतर कशाचाही विचार करणे योग्य नाही, असे उपराष्ट्रपती जगदीप धनखड म्हणाले.



दादरा आणि नगर हवेली तसेच दमण आणि दीव येथील डोकमर्डी सभागृहात आयोजित सार्वजनिक कार्यक्रमात शनिवारी ते उपस्थितांना संबोधित करत होते. दादरा आणि नगर हवेली; दमण आणि दीव तसेच लक्षद्वीपचे प्रशासक प्रफुल्ल पटेल, दादरा आणि नगर हवेली'च्या खासदार डेलकर कलाबेन मोहनभाई आणि इतर मान्यवर यावेळी उपस्थित होते.

परदेशात भारताचे प्रतिनिधित्व करताना राष्ट्राचा सन्मान आणि अभिमान राखण्याचे महत्त्व उपराष्ट्रपतींनी अधोरेखित केले. दिवसातले २४ तास राजकारणाला बळी पडू नका. राजकारण देशापेक्षा वरचढ असू शकत नाही. विकासाच्या बाबतीत राजकारण होता कामा नये. राष्ट्रवाद, राष्ट्राची प्रगती आणि विकासाचे मोल देऊन आपण अतिरेकी राजकारणाला बळी पडू शकत नाही, असेही ते म्हणाले.

माजी पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांच्या अनुकरणीय आचरणाचा दाखला देत, उपराष्ट्रपतींनी अशा काळाकडे निर्देश केला जेव्हा काँग्रेस सरकार सत्तेत असताना विरोधी पक्षाचे नेते असले तरी वाजपेयी भारताच्या शिष्टमंडळाचे नेतृत्व परदेशात करत होते. अटलजींच्या सर्व कृती एकाच ध्येयाने भारलेल्या होत्या - 'माझा भारत महान, माझा भारत, माझा राष्ट्रवाद', असे उपराष्ट्रपतींनी सांगितले.

मंत्री म्हणून काम करत असताना १९९० मधील आपल्या जम्मू आणि काश्मीर भेटीच्या आठवणीला उजाळा देत उपराष्ट्रपतींनी तेव्हाच्या आणि आताच्या परिस्थितीमधील फरक लक्षात आणून दिला. त्यावेळी, माझ्या भेटीदरम्यान मला ३० लोक सुद्धा दिसले नव्हते आणि या वर्षी सुमारे २ कोटी पर्यटकांनी जम्मू आणि काश्मीरला भेट दिली आणि एक महत्वाचे पर्यटन स्थळ म्हणून या प्रदेशाचे महत्त्वपूर्ण पुनरुत्थान अधोरेखित केले.

## वीज कोसळून ८ मेंढ्या दगावल्या

पैठण दि २२ :- पैठण तालुक्यातील विहामांडवा वडगांव येथे दिनांक २२ सप्टेंबर २०२४ रविवार रोजी दुपारी झालेल्या पावसामध्ये पारधी समाजाच्या झोपडीवर वीज कोसळून आठ मेंढ्या दगावल्या असून अनेक मेंढ्या जखमी झाल्याची घटना घडली आहे,

याबाबत सविस्तर माहिती अशी की, विहामांडवा परिसरात जानकी शकिन चव्हाण वय ४५ वडगाव येथे राहतात, दुपारी झालेल्या पावसामध्ये त्यांच्या झोपडीवर वीज पडून आठ मेंढ्या मृत्युमुखी पडल्या असून अनेक मेंढ्या गंभीर जखमी झाल्या आहे. त्यामुळे सदर महिलेवर आर्थिक संकट कोसळले आहे. सदर घटनेचा संबंधित अधिकाऱ्यांनी पंचनामा करून आर्थिक मदत मिळवण्याची विनंती करत होती.

## पुण्यात पंतप्रधानांच्या हस्ते होणार अंडरग्राउंड मेट्रोचे उद्घाटन!

पुणे : पंतप्रधान नरेंद्र मोदी २६ सप्टेंबर २०२४ रोजी पुण्याच्या नवीन भूमिगत मेट्रो मार्गाचे उद्घाटन करतील. दिवाणी न्यायालय ते स्वारगेटपर्यंत धावणाऱ्या या मेट्रो मार्गामुळे शहराच्या कनेक्टिव्हिटीमध्ये मोठी सुधारणा होणार आहे. याबरोबर या मार्गावरील वाहतूक कोंडी कमी होण्यास मदत होईल.

या कार्यक्रमादरम्यान, पंतप्रधान मोदी दोन मोठ्या प्रकल्पांची पायाभरणी करतील. यामध्ये स्वारगेट ते कात्रज मेट्रो मार्गाचा विस्तार आणि पिंपरी चिंचवड ते निगडी असा कॉरिडॉर यांचा समावेश आहे.

या दोन्ही नव्या प्रकल्पांमुळे पुण्याच्या सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेत आणखी सुधारणा होणार आहे. यासह पुणेकरांचा प्रवास आणखी सुलभ होणार आहे. नवीन भूमिगत मेट्रो मार्गामध्ये आरामदायी आणि सुरक्षित प्रवासाठी अनेक आधुनिक सुविधांचा समावेश आहे.

## तरुण भारतच्या वृत्ताची दखल घेत आरोग्य विभागाच्या पथकाची पाहणी



वाळूज महानगर : 'साईबनमध्ये डेंग्यूचे दोन रुग्ण आढळले: ग्रामपंचायत सह आरोग्य यंत्रणा झोपेत ' या मथळ्याखाली दै. तरुण भारत ने दि २१ सप्तेंबर रोजी वृत प्रकाशित केले होते. या वृत्ताने आरोग्य विभाग खडबडून जागे झाले. आज रविवार दि . २२ सप्टेंबर रोजी दोन आरोग्य सेवक व दहा आशा वर्करच्या पथकाने संपूर्ण सोसायटीत पाहणी करून ' बेटिंग' हे औषध साठवणीच्या टाक्यांमध्ये टाकत रहिवाश्यांना मार्गदर्शन केले.

साईबनमध्ये डेंग्यूचे दोन रुग्ण आढळले: ग्रामपंचायत सह आरोग्य यंत्रणा झोपेत या मथळ्याखाली वडगाव येथील साईबन हौसिंग सोसायटीमध्ये डेंग्यू सदृश आजाराने नागरिक हैराण झाले आहेत तरीही आरोग्य यंत्रणा मात्र गाढ झोपेत असल्याचे दिसून येत आहे. एखाद्या व्यक्तीचा मृत्यू होण्याची वाट पाहत आहे की काय अशा आशयाचे वृत्त प्रकाशित केले होते. या वृत्ताची दखल घेत आरोग्य सेवक आनंद वाघ व राहुल इंगळे यांच्यासह दहा आशा वर्करच्या पथकाने सर्च ऑपरेशन करत ४० घरांमधील प्रत्येक सदस्यांची पाहणी व तपासणी केली. तसेच सर्व सभासदांना एक दिवस कोरडा पाळण्याचे आवाहन केले. यावेळी संबंधित ग्रामपंचायतला धूळ फवारणी करण्याबाबत पत्र काढून उद्याच फवारणी करण्यात येईल असे आश्वासन देत काही आरोग्य विषयक तक्रारी असल्यास आरोग्य केंद्रात उपचारासाठी येण्याचा सल्ला दिला. यावेळी आरोग्य सेवक आनंद वाघ व राहुल इंगळे, आशा वर्कर कविता धस , हिरा पठारे , सुजाता कसबे , कमल जाधव , सुनंदा काळे , अश्वीनी शिंदे आदींचा पथकात समावेश होता. सोसायटीमधील सर्वांची आरोग्य तपासणी झाल्याने संस्थापक अध्यक्ष संजय निकम, यशपाल कदम, नामदेव सावंत , राजकुमार गोरगिले , परमेश्वर खवल , सुरेश पाटील, सोमनाथ निमसे, सोमनाथ गवळी , रतन कवाळे , अण्णासाहेब वाघ , गणेश लिहिणार , अविनाश राऊत , अमोल निकम , उमेश लाटकर , युवराज नाईक , सतीश खराटे , लक्ष्मण सिंग राजपूत , बाबाराव कांबळे आदींनी समाधान व्यक्त केले.

# कॅशलेस प्रवासासाठी नॅशनल कॉमन मोबिलिटी कार्डचे मुख्यमंत्र्यांच्या हस्ते अनावरण

## स्मार्ट सिटीच्या बसमध्ये आता कार्डवर मिळणार अत्याधुनिक सुविधा

छत्रपती संभाजीनगर : मराठवाडा मुक्ती संग्राम दिनाच्या औचित्यावर, छत्रपती संभाजीनगर स्मार्ट सिटी डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन लिमिटेड तर्फे चलो पच्या राष्ट्रीय सामान्य मोबिलिटी कार्डचे अनावरण मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी मनपा आयुक्त जी. श्रीकांत यांची उपस्थिती होती.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या वन नेशन, वन कार्ड या संकल्पनेतुन एनसीएमसी कार्ड आता छत्रपती संभाजीनगरमध्ये सार्वजनिक वाहतूक अधिक सुलभ, कॅशलेस




आणि आधुनिक करण्यासाठी महत्त्वपूर्ण ठरणार आहे. हे कार्ड शहरातील स्मार्ट बसेस व्यतिरिक्त रेल्वे, मेट्रो, रेस्टॉरंट्स आणि अन्य ठिकाणी देखील वापरता येणार आहे. हे प्रीपेड कार्ड शहरातील बसस्थानक, रेल्वे स्टेशन आणि स्मार्ट सिटी बसच्या कंडक्टरकडे उपलब्ध होईल. एनसीएमसीसाठी तांत्रिक सहकार्य भारतातील प्रमुख डिजिटल ट्रान्सपोर्ट कंपनी चलो मोबिलिटीने केले आहे. चलो मोबिलिटीने यापूर्वीच मुंबई, नागपूर, जम्मू यांसारख्या देशातील ६० पेक्षा जास्त शहरांमध्ये सार्वजनिक वाहतुकीचे डिजिटलीकरण केले आहे. आता आपल्या शहरातही हे तंत्रज्ञान सुरु झाले. छत्रपती संभाजीनगरमध्ये सध्या २५% कॅशलेस प्रवास होत असून, या उपक्रमामुळे हे प्रमाण वाढेल असा विश्वास स्मार्ट सिटी बस व्यवस्थापनाने व्यक्त केला आहे.

> **व्हर्जन एनसीएमसी आणि डिजिटल तंत्रज्ञानामुळे प्रवाशांना सोयीस्कर आणि कॅशलेस प्रवासाचा अनुभव मिळेल. यामुळे खासगी वाहनांवरील अवलंबित्व कमी होऊन, सार्वजनिक वाहतुकीचा वापर वाढेल, तसेच पर्यावरण प्रदूषणावर नियंत्रण मिळवण्यास मदत होईल.**
>
> **- जी.श्रीकांत, मनपा आयुक्त**

## येत्या ४-५ दिवसांत पावसाचा जोर वाढणार

मुंबई : ऑगस्ट संपूर्ण महिना आणि सप्टेंबरचे १५ दिवस महाराष्ट्रात पावसाने गैरहजेरी लावली. मात्र आता सप्टेंबर महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात पावसाचा जोर वाढणार आहे. राज्यात मुसळधार पावसाची दाट शक्यता वर्तवण्यात आली आहे. भारतीय हवामान विभागाच्या पुढील चार आठवड्यांच्या विस्तारित श्रेणीच्या अंदाजानुसार २६ सप्टेंबरपासून पुढील १० ते १२ दिवस मध्य भारताच्या काही भागांमध्ये पावसाचा जोर वाढण्याची शक्यता आहे. परभणी जिल्ह्यात सर्वदूर विजांच्या कडकडाटासह मुसळधार पाऊस झालाय, यामुळे सखल भागात पाणी साचले होते,तर गंगाखेड तालुक्यातील तांदुळवाडी या गावात वीज पडली आहे. परभणी जिल्ह्यात आठवडा भरानंतर जोरदार पावसाने दुपारच्या सुमारास हजेरी लावली,मुंबईच्या प्रादेशिक हवामान केंद्राने दिलेल्या इशाऱ्या प्रमाणे आज परभणी शहरासह मानवत सेलू भागात पाऊस झाला,या पावसामुळे सखल भागात पाणी साचले होते. २१ व २२ सप्टेंबर रोजी राज्यात तुरळक ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता आहे. हवामान विभागाने दिलेल्या माहितीनुसार कोकण गोव्यात २४ सप्टेंबर रोजी तसेच पालघर, ठाणे, रायगड येथे विजांचा कडकडाट मेघगर्जनेसह हलका ते मध्यम स्वरूपाचा पाऊस पडण्याची शक्यता आहे.

## गवत काढण्याच्या कारणातून सख्ख्या भावाकडुन भावाचा खून

तभा वृत्तसेवा

बिडकीन दि.२२सप्टेंबर पैठण तालुक्यातील तोंडोळी शिवारातील सामायिक शेती मधील गवत काढण्याच्या वादातून दोन सख्या भावामध्ये भांडणात भावानेच केले भावाचा खून. सविस्तर माहिती अशी की बिडकीन पोलीस ठाण्याच्या



हद्दीतील तोंडोळी येथील सामायिक शेती गट क्रमांक १०३ मध्ये शेतातील जनावरांना खावयाचे गवत उपटण्याच्या कारणावरुन तोंडोळी येथील दि. २१ रोजी सकाळी आठ वाजता एका कुटुंबात जोरदार हाणामारीची घटना घडली, यामध्ये दोन भावांमध्ये झालेल्या भांडण्यात भावानेच भावाचा खून केल्याची घटना उघडकीस आली यामध्ये परिसरात एकच खळबळ उडाली, खून झालेल्या व्यक्तीचे नाव नसिरुद्दीन करीमोद्दीन शेख वय ५५ वर्ष रा. तोंडोळी ता. पैठण मारहाण करून खून केल्याची फिर्याद शेख असलम शेख नसिरुद्दीन वय २२ वर्ष व्यवसाय शेती रा. तोंडोळी ता. पैठण यांनी बिडकीन पोलीस ठाण्यात येऊन दिली की मयत व आरोपी हे सख्ये भाऊ असून त्यांचे सामायिक जागेतील आरोपीने पेरलेले शेतातील जनावरांना खावयाचे गवत मयताने उपटण्याचे कारणावरुन वडील (मयत) सोबत भांडण करुन दि. २१ सप्टेंबर रोजी पुन्हा त्याच भांडणाच्या कारणावरुन राग मनात धरून फिर्यादीच्या वडीलास डोक्यावर व दोन्ही पायाचे गुडघ्याचे बाहेरील बाजूस,पाठीवर लाकडी दांड्याने मारुन तसेच फिर्यादीस दोन्ही हातावर लाकडी दांड्याने मारुन उजवा हात फ्रॅक्चर केला , नसिरुद्दीन करीमोदिन शेख यांचे डोक्यात लाकडी दांड्याने मारुन गंभीर जखमी करुन त्यास जीवे ठार मारले म्हणून गुन्हा दाखल करुन आरोपी सख्खा भाऊ शेख मोईन शेख करीमोद्दीन रा. तोंडोळी ता पैठण त्याच्या विरोधात बिडकीन पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली असून खूनतील आरोपी यांना अटक करण्यात आली आहे, पैठण उपविभागीय पोलीस अधिकारी सिद्धेश्वर भोरे, पोलीस निरीक्षक प्रमोद पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक महेश घुगे, सहाय्यक फौजदार सोमनाथ तांगडे पुढील तपास करीत आहे.

# निळवंडेच्या पाण्याचा शेतीक्षेत्राला मोठा लाभ होईल : डॉ. विखे

### निमगावजाळी, आश्वी येथे जलपूजन संपन्न

अहमदनगर, दि. २२ (प्रतिनिधी) : निळवंडे कालव्यांचे पाणी आल्याने अनेक वर्षांचे स्वप्न पूर्ण होत आहे. पालक मंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील यांच्या सुयोग्य नियोजनामुळे पाण्याचा थेट लाभ शेतीक्षेत्राला होणार असल्याने गावाचे अर्थकारण प्रगतीच्या दिशेने जाईल, असा विश्वास डॉ. सुजय विखे पाटील यांनी व्यक्त केला.

तालुक्यातील निमगावजाळी आणि आश्वी येथे निळवंडे उजव्या



कालव्यातून उपलब्ध झालेल्या पाण्यामुळे गावातील बंधारे व तलाव भरल्याने परीसरातील शेतकार्यांमध्ये समाधानाचे वातावरण आहे. यानिमित्त आयोजित जलपूजन कार्यक्रमात डॉ. विखे बोलत होते.

मागील अनेक वर्षांपासून निळवंडे धरणाच्या पाण्याची प्रतिक्षा या भागातील शेतकऱ्यांना होती. राज्यात महायुतीचे सरकार आल्यानंतर मंत्री विखे पाटील यांच्या पुढाकाराने कालव्यांची कामे मार्गी लागली. २०२४ पर्यंत पाणी देण्याचा दिलेला शब्द पूर्ण होत असल्याचे समाधान सर्वांना आहे, असे डॉ. विखे म्हणाले.

कालव्याच्या पाण्याचा लाभ थेट शेतीक्षेत्राला होणार असल्याने उत्पादकता वाढण्यास मोठी मदत होईल. गावाचे अर्थकारण यामुळे बदलेल, असा विश्वास व्यक्त करताना त्यांनी मंत्री विखे पाटील यांच्या माध्यमातून प्रत्येक गावात विकासाची प्रक्रिया सुरू असल्याचे सांगितले. विकास कामांचा चढता आलेख शिर्डी मतदारसंघात कायम असून, रस्त्यांच्या कामांसह व्यक्तिगत लाभाच्या योजनांना लोकांपर्यंत पोहचविण्यात जनसेवा फाउंडेशनच्या माध्यमातून पुढाकार घेतला जात आहे.

राज्यातील महायुती सरकारने सुरू केलेल्या सर्व योजनांची प्रभावी अंमलबजावणी सुरू आहे. मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेबरोबरच बचत गटातील महिलांच्या उत्कर्षासाठी विखे पाटील यांच्या पुढाकाराने योजना राबविल्या जात आहेत. शिर्डी येथे सुरू होणाऱ्या औद्योगिक वसाहतीमुळे युवकांच्या रोजगाराचा प्रश्न मार्गी लागेल, अशी ग्वाही त्यांनी दिली.

# एकाच बाकावर पाच पाच विद्यार्थी; बहुलखेडा शाळेतील प्रकार

## एकाच बाकावर पाच पाच विद्यार्थी दुसऱ्या छायाचित्रात एकाच वर्गात शंभर वर विद्यार्थी

तभा.वृत्तसेवा

सोयगाव,दि.२२ सप्टेंबर

एकाच बाकावर चक्क वेगवेगळ्या वर्गाचे पाच पाच विद्यार्थी बसून ज्ञानार्जन करत असल्याचा प्रकार सोयगाव तालुक्यातील बहुलखेडा येथील जिल्हा परिषदेच्या शाळेत शनिवारी (दि.२१) उघड झाला आहे त्यामुळे सोयगाव तालुक्यात जिल्हा परिषदेच्या शाळांची गुणवत्तेवर प्रश्न चिन्हे निर्माण झाले आहे

बहुलखेडा येथे इयत्ता एक ते आठवी पर्यंत शाळा आहे या शाळेत शिक्षकांची आठ पदे मंजूर आहे मात्र तिघांना प्रतिनियुक्तीवर घेतल्या मुळे सध्या पाच शिक्षक कार्यरत आहे.त्यामुळे एक





मुख्याध्यापक पदाचा कार्यभार सांभाळत असून चार शिक्षकांना आठ वर्ग एकत्र करून सांभाळावे लागत आहे त्यामुळे या शाळेत एकाच वर्गात दोन दोन इयत्तेचे विद्यार्थ्यांना एकत्र बसविण्यात येत आहे विद्यार्थी संख्या वाढते झाल्याने एकाच बाकावर विभिन्न वर्गाचे पाच पाच विद्यार्थी बसून शिक्षण घेत असल्याचा धक्कादायक प्रकार ग्रामस्थांनी दिलेल्या भेटीत उघड झाला आहे दरम्यान या शाळेत मंजूर असलेल्या आठ शिक्षकां पैकी तीन शिक्षक प्रतिनियुक्तीवर पाठविण्यात आले आहे यामध्ये सुशील आखाडे यांना सोयगाव तहसील कार्यालयात निवडणुकीच्या कामांसाठी प्रतिनियुक्तीवर घेण्यात आले असून दुसऱ्या अन्य शिक्षक प्रमोद पाल्हाळ यांना गटशिक्षणाधिकारी कार्यालयात प्रतिनियुक्तीवर घेण्यात आले मात्र तिसरे गजानन वरकड यांना तर थेट जिल्हा परिषदेने कोणत्याही लेखी आदेश न देता प्रतिनियुक्ती दिली असल्याचे बोलले जाते सदर शिक्षक हे (दि.३०) जुलै पासून विना आदेश शाळेतून गायब आहे एकीकडे जिल्हा परिषद ग्रामीण भागात शिक्षक देतात मात्र सोयगाव तालुक्यातील या शिक्षकांला चक्क जिल्हा परिषदेने परत घेतले आहे सदर गायब असलेल्या या शिक्षकाला मुख्याध्यापक राजेंद्र उंबरकर यांनी तीन सप्टेंबर ला नोटीस बजावून उपस्थित असलेल्या कार्यालयाचे उपस्थिती प्रमाणपत्र सादर करण्याचे नोटिस मध्ये नमूद केले मात्र अद्यापही या शिक्षका चे उपस्थिती प्रमाणपत्र सादर झाले नसून वेतन मात्र नियमितपणे सुरु आहे त्यामुळे या शिक्षकाची अद्यापही प्रतिनियुक्तीवर असलेल्या ठिकाणाचा थांगपत्ता स्थानिक प्रशासनला माहिती नाही या प्रकाराची चौकशी करण्याची मागणी इदबार तडवी,चरणदास चव्हाण, गणेश राठोड, मुसा तडवी यांनी केली आहे

## आ. प्रशांत बंब यांच्या शिफारशीनुसार डोंगरी विकास कार्यक्रमांतर्गत भडजी येथे सभामंडपाचे लोकार्पण



खुलताबाद प्रतिनिधी : भडजी कं.आ प्रशांत बंब यांच्या हस्ते करण्यात आले तसेच देवदारा वस्ती येथे जाऊन तेथील नागरिकांशी संवाद साधला. या कार्यक्रमास जिल्हा सरचिटणीस एल.जी गायकवाड, भाजप जिल्हा उपाध्यक्ष प्रकाश वाकळे, सरपंच बाबासाहेब वाकळे,माजी उपसभापती दिनेश अंभोरे, शहराध्यक्ष परसराम बारगळ , माजी नगरसेवक योगेश बारगळ युवा मोर्चा जिल्हा चिटणीस अमोल गवळी, प्रकाश चव्हाण, अंकुश होळकर ,गणेश वाकळे, मच्छिंद्र वाकळे,राजू वाकळे, योगेश वाकळे, शौकत शेख शेख सुभान शेख सांडू ,सुखदेव वाकळे, संतोष वाकळे, दत्तू वाकळे ,भागिनाथ गवळे, जनार्दन गवळी, लक्ष्मण गवळी, सागर वाकळे भारत वाकळे, सुनील वाकळे, योगेश वाकळे, नितीन वाकळे,हारुण शेख, भगवान वाकळे,विजय वाकळे, शिवाजी गवळे, रमाबाई गवळे, पुष्पाबाई वाकळे, काशीबाई वाकळे, शुभांगी वाकळे, संतोष घुसिगे, आप्पाराव वाकळे, उपस्थित होत्या.

सोलापूर तरुण भारत


www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# श्री साई संस्थान शिर्डी येथे मुख्य प्रधान पुजारी म्हणून शुभम जोशी नियुक्ती



बिडकीन दि २० सष्टेंबर : पैठण तालुक्यातील बिडकीन येथील वे.शा.स. शुभम देवा कृष्णराव जोशी यांची श्री साई संस्थान शिर्डी येथे मुख्य प्रधान पुजारी म्हणून साई संस्थान च्या वतीने निवड करण्यात आली या निवडीचे ब्राह्मण समाज बिडकीन व समस्त पुरोहित वर्ग बिडकीन यांच्या वतीने शुभमदेवा यांचे मनःपूर्वक अभिनंदन व छोटेखानी स्वागताचा कार्यक्रम घेण्यात आला या प्रसंगी सूत्र संचालन डॉ.त्रिंबक पाडळकर सरयांनी केले तर आभार प्रदर्शन समाजाचे अध्यक्ष अविनाश जोशी यांनी केले या प्रसंगी ब्राम्हण समाजाचे उपाध्यक्ष संजय जोशी सचिव प्रशांत कुलकर्णी, तसेच पैठण येथील पुरोहित अनंत खरे गुरुजी, किशोर कुलकर्णी,सतीश जोशी, गिरीश कुलकर्णी,प्रकाश जोशी, अविनाश जोशी,प्रदीप घुंगरे,कृष्णा भणगे,शंतनू जोशी,महेश जोशी, अमोल जोशी, अरुण म्हरोळकर, शिवम जोशी, दिलीप देवळाणकर, राजेंद्र वैद्य,गोरख धर्मे, आदींची उपस्थिती होती.

# जिल्हा स्तरीय बॉक्सिंग स्पर्धेत अनुश्री प्रविण घुगे, रोप्य पदक जिंकले



तभा वृत्तसेवा

बिडकीन दि १९ सष्टेंबर शालेय जिल्हा स्तरीय बॉक्सिंग स्पर्धेत अनुश्री प्रविण घुगे हिने १७ वर्षा खालील व ४४ ते ४६ वजन गटात रोप्य पदक जिंकले. अनुश्री घुगे ही सह्याद्री स्कूल ची विद्यार्थी आहे. या यशाबद्दल शाळेचे मुख्याध्यापक निलेश महस्के, शाळेचे शिक्षक वृंद, व मिशन मार्शल आर्टस् अँड वूशु कुंग -फू स्पोर्ट्स कराटे असोसिएशन (इंडिया) संघटनेचे अध्यक्ष पवन घुगे, सचिव व मुख्य कराटे प्रशिक्षक प्रविण घुगे, राम बुधवंत, शाम बुधवंत, यांनी अभिनंदन केले व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# जरांगे यांच्या उपोषणाच्या समर्थनार्थ सोमवारी पैठण बंदची हाक



पैठण दि २२: मराठा आरक्षण संघर्ष योद्धा मनोज पाटील जरांगे यांना पाठिंबा देण्यासाठी सकल मराठा समाजाच्या वतीने पैठण येथील छत्रपती शिवाजी महाराज स्मारक परिसरामध्ये बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीत उद्या पैठण बंदची हाक देऊन आवाहन करण्यात आले आहे. पैठण व्यापारी महासंघाचे तालुका अध्यक्ष ज्ञानेश्वर उगले आणि शहर अध्यक्ष पवन लोहिया यांच्याकडून बंदला प्रतिसाद देण्याचे आश्वासन सकल मराठा समाजाच्या प्रतिनिधींना देण्यात आले आहे. पैठण येथे सकाळी दहा वाजता ही बैठक संपन्न झाली. बैठकीला तालुक्यातील आणि शहरातील विविध भागातून मराठा बांधव मोठ्या प्रमाणात उपस्थित होते. सोमवार २३ सप्टेंबर रोजी सकाळी आठ वाजता छत्रपती शिवाजी महाराजांच्या अश्वारुढ पुतळ्यापासून रॅलीने पाचोड फाटा येथे रास्ता रोको आंदोलन केले जाईल. बैठकीनंतर सर्व समाज बांधवांनी पैठण पोलीस स्टेशन येथे जावून पोलीस निरीक्षक संजय देशमुख यांना निवेदन देण्यात आले.

# नाट्यपंढरीच्या विष्णू मापारी,अरुण सोहनी,डिंगाबर वाघ,संजय बोरसे यांना जळगाव (खान्देशाचा) पुरस्कार जाहीर



सोयगाव,दि.२२ सप्टेंबर - सोयगाव नाट्यपंढरीच्या चार समाजसेवकांना राजनंदिनी बहुउद्देशीय संस्था जळगाव याचे वतीने पुरस्कार जाहीर करण्यात आले.अनुक्रमे समाजप्रबोधनकार तथा लोककलावंत,महाराष्ट्रशासन,भारत सरकार सन्मानित विष्णू मापारी सोयगावकर यांना राज्यस्तरीय समाज भुषण पुरस्कार २०२३- २०२४ तसेच जयभोले मित्र मंडळ कार्यकर्ते तथा कोरोना काळात जिवाची पर्वा न करता रुग्णाची सेवा करणारे डिगांबर वाघ यांना राज्यस्तरीय आरोग्यदुत २०२३-२०२४ पुरस्कार,सामाजिक कार्यकर्ते संजय बोरसे यांना राज्यस्तरीय आरोग्यदुत पुरस्कार तर युवा शेतकरी तथा शेती विषयी योग्य सल्ला देणारे अरुण सोहणी समाजसेवक यांना राज्यस्तरीय कृषी भूषण पुरस्कार संस्थापक अध्यक्षा सौ. संदिपा ज्ञानेश्वर वाघ यांनी जाहीर केला असुन दि.२८/९/२०२४ शनिवार रोजी अल्पबचत भवन,कलेक्टर ऑफिस शेजारी येथे अनेक मान्यवरांचे उपस्थितीतीमध्ये प्रदान करण्यात येत आहे पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल चारही मान्यवरांचे सोयगाव शहरासह परिसरात सर्वत्र अभिनंदन होत आहे.

## 'छोट्या बयोची मोठी स्वप्नं' चा ६०० भागांचा टप्पा पार

छत्रपती संभाजीनगर - बयोच्या स्वप्नपूर्तीचा प्रवास रेखाटणारी 'छोट्या बयोची मोठी स्वप्नं' ही सोनी मराठीवरील मालिका प्रेक्षकांनी चांगलीच उचलून धरली आहे. शिक्षणाच्या ध्यासाने कोकण ते मुंबई असा खडतर प्रवास करणारी बयो आता डॉक्टर होण्याच्या प्रवासात पुढची वाटचाल करते आहे. तिला आजवर वडिलांचा पाठिंबा आणि डॉ. विशालची साथ मिळाली. आजवरच्या सगळ्या अडचणींना सामोरं जात बयोचा डॉक्टर होण्याचा प्रवास सुरू आहे. वडिलांसोबत ती गरजू रुग्णांची सेवा घरच्या घरी करू लागली होती, पण आता हॉस्पिटलमध्येच रुग्णांची सेवा करून बयो आपले शिक्षणही घेते आहे. मुंबईसारख्या स्वप्नांच्या नगरीत येऊन आपले स्वप्न पूर्ण करू पाहणारी बयो अनेक संकटांना सामोरी गेली आहे. स्वतःच्या अस्तित्वासाठी झटणारी बयोही आपण पहिली. बयोला आपल्या आईचा पाठिंबा सुरुवातीपासूनच आहे. ही भूमिका अभिनेत्री विजया बाबर चोख बजावते आहे. तर तिच्या वडिलांची भूमिका अभिनेते विक्रम गायकवाड साकारत आहेत. मालिकेने आता ६०० भागांचा टप्पा पार केला आहे.

# नेस्टेराने प्रीमियम गणेशोत्सव साजरीकरणासाठी मुंबईतील प्रख्यात गणेश मंडळांना सुशोभित केले

मुंबई : नेस्टेरा या के. के. बिर्ला ग्रुपचा भाग सतलेज टेक्सटाइल्स ॲण्ड इंडस्ट्रीज लि.च्या प्रिमिअम होम फर्निशिंग्ज ब्रँडला मुंबईतील दोन सर्वात प्रतिष्ठित गणेश मंडळ: चिंचपोकळी सार्वजनिक उत्सव मंडळ आणि लालबागचा राजा यांच्यासोबत सहयोगाची घोषणा करण्याचा अभिमान वाटत आहे. या सहयोगामधून कला, भक्ती व सांस्कृतिक अभिमानाचे संयोजन असलेल्या लक्झरी डिझाइनच्या दृष्टिकोनातून अद्भुतरित्या भारतीय परंपरांना साजरे करण्याप्रती नेस्टेराची कटिबद्धता दिसून आली. लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्या विचारांवर आधारित १०५ वर्षांपूर्वी स्थापना करण्यात आलेल्या चिंचपोकळी सार्वजनिक उत्सव मंडळाने मुंबईतील सामाजिक आणि सांस्कृतिक परंपरा जपली आहे.

# अजिंठा लेणीच्या पोलिस स्टेशनचा २५ कर्मचारींचा भार १५ कर्मचाऱ्यांवर

तभा वृत्तसेवा

फर्दापूर दि २२ छत्रपती संभाजीनगर जळगाव महामार्गावरील फर्दापूर (ता. सोयगाव) पोलीस स्टेशन अंतर्गत एकूण ३२ गावांचा समावेश आहे.पोलीस स्टेशन अस्तित्वात आल्यापासून त्या कामकाजानुसार २५ पोलीस कर्मचारी संख्या मंजूर आहे.मात्र प्रत्यक्षात या ठिकाणी १५ पोलीस कर्मचाऱ्यांवर गावांतील कायदा व सुव्यवस्था सांभाळण्याची जबाबदारी आहे.यामध्ये १ सहायक पोलीस निरीक्षक,१ पोलीस उपनिरीक्षक,व १३ कर्मचाऱ्यांचा समावेश असून त्यांची चांगलीच दमछाक होत आहे.तर ३ कर्मचारी हे उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालयाशी संलग्न आहे व २ कर्मचारी कोर्टकामी तालुका व जिल्हास्तरावर आहेत.२ कर्मचारी अजिंठा लेणी व २ ठाणे अंमलदार,२ कर्मचारी सावळदबारा दूरक्षेत्र येथे कार्यरत आहे.




फर्दापूर पोलीस स्टेशन मध्ये पोलीस कर्मचारी संख्या कमी भासवत असल्याने त्या कर्मचाऱ्यांवर कामाचा अतिरिक्त ताण वाढत आहे.परिणामी,त्यांच्या आरोग्याचा प्रश्न उपस्थित होत आहे.

याच पोलीस स्टेशन हद्दीत पूर्वेस ५० किमी अंतरावर सावळदबारा दुरक्षेत्र आहे.या अंतर्गत १२ खेड्यांचा समावेश आहे. व या १२ खेड्यांची जबाबदारी मात्र दोन कर्मचाऱ्यांवर असल्याने तपासकामी त्यांची चांगलीच पंचाईत होते.

सध्या बदलत्या काळात वाढलेली लोकसंख्या,गुन्ह्याचे नवीन नवीन तंत्र गुन्हेगारांनी विकसित केले आहे.गावोगावी तंट्याचे प्रमाण वाढले आहे. त्यामुळे एका एका कर्मचाऱ्यावर अनेक गावांचा भार देण्यात आल्याने कर्मचाऱ्यांना कर्तव्य बजावत असताना चांगलीच अडचण वाढत असल्याचे दिसून येत आहे.बंदोबस्त,कायदा व सुव्यवस्था प्रसंग,सणासुदीचे दिवस,मोर्चे,आंदोलने यासारख्या अनेक घटनांमध्ये ड्युटी बजवावी लागते अश्यावेळी अपुऱ्या कर्मचाऱ्यांमुळे त्यांच्यावर अधिक ताण पडत आहे.यादरम्यान,फर्दापूर पोलीस स्टेशन हद्दीत येणाऱ्या गावांचा कायदा व सुव्यवस्था सांभाळण्याची जबाबदारी फर्दापूर पोलिसांना पार पाडावी लागत आहे. जागतिक वारसा स्थळ असलेली जगप्रसिद्ध अजिंठा लेणी फर्दापूर पोलीस स्टेशन अंतर्गत येत असल्याने येथे हजारोंच्या संख्येने पर्यटक येत असतात.त्यामुळे कायदा व सुरक्षेचा प्रश्न उद्भवू नये म्हणून येथे पोलीस चौकी स्थापन केली आहे.तेथे दोन कर्मचारी कार्यरत आहे.त्याचप्रमाणे लेणीला भेट देण्यासाठी व्हीआयपी पर्यटक येत असतात.प्रोटोकॉल प्रमाणे त्यांनाही संरक्षण देण्याची अतिरिक्त जबाबदारी येथील पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांवर असते.

फर्दापूर पोलीस स्टेशन हद्दीत छत्रपती संभाजीनगर जळगाव महामार्गावरील अजिंठा घाट येत असल्याने या घाटात एकेरी मार्ग आहे.मोठी रहदारी असल्याने घाटात वारंवार अपघात होत असतात.परिणामी, वाहतूक ठप्प होऊन वाहनांच्या दुतर्फा लांबच लांब रांगा लागत असतात.मनुष्यबळ कमी असल्याने येथील एक किंवा दोनच पोलीस कर्मचाऱ्यांना रात्री अपरात्री मोठ्या संकटांचा सामना करून वाहतूक पूर्ववत करावी लागते.

# विघ्नहर्त्यांचा शिवसेनेच्या वतीने सत्कार

वाळूज महानगर (प्रतिनिधी) महिन्याभरापासून सण, उत्सवासोबतच सामाजिक, राजकीय घडामोडींनी वाळूज महानगर परिसर ढवळून निघत आहे. वरिष्ठांचे विशेष दौरे, विविध आंदोलनांमुळे कायदा सुव्यवस्था कायम ठेवण्याची मोठी जबाबदारी एमआयडीसी पोलिसांवर होती. प्रत्येक जण कुटुंबासोबत उत्सव साजरा करत असताना पोलिस अधिकारी मात्र डोळ्यात तेल घालून ७२ तासांपेक्षा अधिक काळ शांततेसाठी रस्त्यावर उभे होते. परिणामी, या दरम्यान एकही अनुचित प्रकार घडला नाही.

काही दिवसांपासून विविध सामाजिक, राजकीय विषयांमुळे वाळूज महानगर परिसर



ढवळून निघाला होता. परिसरात सातत्याने आंदोलन, संवेदनशील विषयांवर उपोषण सुरू, अंबेलोहळ गावात दोन समाजात निर्माण झालेला वाद, त्यानंतर लगेचच गणेश विसर्जन व ईद-ए- मिलाददरम्यान बंदोबस्ताची जबाबदारी पोलिसांवर होती. एमआयडीसी पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक कृष्णचंद्र शिंदे यांनी आपल्या प्रदीर्घ अनुभव व नियोजबद्ध पद्धतीने तसेच आपल्या सर्व सहकाऱ्यांच्या मदतीने सर्व घटनांवर बारीक लक्ष ठेऊन असल्याने सर्व सण, उत्सव विना विघ्न पार पडला म्हणून या विघ्नहर्त्यांचा शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे उपतालुकाप्रमुख विष्णू जाधव यांच्या वतीने वाळूज एमआयडीसी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. कृष्णकांत शिंदे यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी उपतालुकाप्रमुख विशाल खंडागळे, विभाग प्रमुख विनोद दाभाडे, युवानेते बिरजू तरय्यावाले आदीं सह पोलीस कर्मचारी उपस्थित होते.

# शेलगाव येथे सेवापुर्ती सत्कार कार्यक्रमास उत्स्फूर्त प्रतिसाद

## पोलीस उपनिरीक्षक सुरेश उसरे यांचा ग्रामस्थांनी केला मिरवणुक, सत्कार

तभा वृत्तसेवा

नाचनवेल: दि.२२. सप्टेंबर- कन्नड तालुक्यातील शेलगाव येथील भूमिपुत्र महाराष्ट्र पोलीस दलात गेले( ३५) वर्ष सेवा करून सेवानिवृत्त झाल्याबद्दल शेलगाव ग्रामस्थांच्या वतीने पोलीस उपनिरीक्षक सुरेश उसरे यांचा शेलगाव ग्रामस्थांनी गावातून भव्य मिरवणूक काढली तसेच ठिकठिकाणी महिलांनी त्यांचे औक्षण करीत पूजन केले यावेळी ठिकठिकाणी रांगोळ्या काढलेल्या होत्या तसेच वाजत गाजत त्यांची गावातून भव्य मिरवणूक काढण्यात आली. यावेळी श्री महामंडलेश्वर श्री दयानंद महाराज यांची प्रमुख उपस्थिती होती . वाईट काळात साथ देणाऱ्या, मदत करणाऱ्या व्यक्तीची प्रत्येकाने जाणीव ठेवून कार्य करणे गरजेचे आहे असे मत सुरेश उसरे यांनी व्यक्त केले. या कार्यक्रमासाठी आजी - माजी सैनिकांची



देखील उपस्थिती होती. यानंतर समस्त गावकऱ्यांसाठी भोजनाची व्यवस्था करण्यात आली होती. यावेळी अनेक मान्यवरांनी आपले मनोगत व्यक्त केले. गावातील तरुणांनी यांचा आदर्श समोर ठेवून विविध क्षेत्रात उल्लेखनीय यश संपादन करून आई वडील व गावाचे नाव मोठे करावे आम्ही प्रत्येकाचा अशा पद्धतीने सन्मान सत्कार करू असे मत सरपंच विलास मनगटे यांनी व्यक्त केल. असून ग्रामस्थांनी त्यांचा शाल, पुष्पगुच्छ व श्रीफळ देऊन सत्कार सन्मान केला. यावेळी आजी-माजी सैनिक, सरपंच, उपसरपंच ,सदस्य, गाव पदाधिकारी ,महिला भगिनी, युवा तरुण मित्रमंडळ ,ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# नाथांचे विचार आत्मसात करण्यासाठी हा जन्म कमी पडेल : जयश शेवलकर

छत्रपती संभाजीनगर - समजून घेणे आणि त्यांचे विचार आत्मसात करण्यास हा जन्म अपुरा पडेल ,ज्या काळामध्ये भ्रमंती करण्याचे साधन नव्हते त्याकाळात नाथांनी अखंड भारत भ्रमंती केली त्यांनी हे कसे केले हे समजून घेण्यासाठी व त्या विचार आत्मसात करण्यासाठी हा जन्म कमी पडेल असे गाथा नवनाथांचे या मालिकेचे मच्छिंद्रनाथ यांचे भूमिका साकारणारे कलावंत जयशंकर म्हणाले, छत्रपती संभाजीनगर येथे पत्रकारांशी संवाद साधत होते.

सोनी मराठी वाहिनीवरील नवनाथांची कथा उलगडून दाखवणार्या 'गाथा नवनाथांची' ह्या पौराणिक मालिकेने नुकताच १००० भागांचा टप्पा पार केला आहे. आता नव्या वेळेत, सोम. ते शनि., रात्री ८ वाजता, या वेळेत प्रेक्षकांच्या भेटीला येत आहे. यामध्ये आत्तापर्यंत नवनाथांपैकी नाथांचे अवतार, त्यांचे प्रवास आणि लीला हे सर्व दाखवण्यात आले आहे.

# एमजीएममध्ये राष्ट्रीय स्तरावरील आयडीई बुट कॅम्पचे आयोजन

छत्रपती संभाजीनगर, दि.२१ : केंद्रीय शिक्षण विभाग आणि अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद (एआयसीटीई) यांच्या संयुक्त विद्यमाने आयडीई बुट कॅम्प दुसऱ्या एडिशनमधील पहिल्या सत्राचे उद्घाटन सोमवार, दिनांक २३ सप्टेंबर २०२४ रोजी सकाळी ९:३० वाजता एआयसीटीई'चे संचालक प्रा.टी.जी.सीताराम हे दुरदृश्यप्रणालीमार्फत प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित असणार आहेत. या बुट कॅम्पचे आयोजन करण्याची संधी महाराष्ट्र राज्यातून केवळ एमजीएम विद्यापीठाच्या इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट अँड रिसर्च महाविद्यालयास मिळाली आहे.

एमजीएम विद्यापीठाच्या रुक्मिणी सभागृहात होणाऱ्या उद्घाटन सोहळ्यास विद्यापीठाच्या वतीने कुलपती अंकुशराव कदम, कुलगुरू डॉ.विलास सपकाळ, कुलसचिव डॉ.आशिष गाडेकर, संचालक डॉ. रणीत किशोर, प्राध्यापक व सर्व संबंधित उपस्थित असणार आहेत.

आयडीई बुट कॅम्पविषयी माहिती :

आयडीई बुट कॅम्प दुसऱ्या एडिशनमधील पहिल्या सत्रामध्ये देशभरातील ३००० विद्यार्थी सहभागी होणार असून एमजीएममध्ये होणाऱ्या कॅम्पसाठी देशभरातील ३०० विद्यार्थी आपला सहभाग नोंदवणार आहेत. हा कॅम्प सोमवार, दिनांक २३ सप्टेंबर २०२४ ते शुक्रवार, दिनांक २७ सप्टेंबर २०२४ असे ५ दिवस चालणार आहे. या ५ दिवसीय कॅम्पमध्ये विद्यार्थ्यांना नाविन्यता, कौशल्य, उद्योजकता, डिझाईन, प्रशिक्षण अशा विविध बाबी तज्ञ मार्गदर्शकांकडून शिकता येणार आहेत.

**देशभरातील खालील ९ ठिकाणी एकाच वेळी बुट कॅम्पचे आयोजन :** १. इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट अँड रिसर्च, एमजीएम विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर, २. अमिटी युनिव्हर्सिटी राजस्थान , ३. अमल ज्योती कॉलेज ऑफ इंजिनियरिंग कांजीरपल्ली कोट्टायम , ४. इंटिग्रल युनिव्हर्सिटी लखनऊ , ५. सरदार वल्लभभाई नॅशनल इन्स्टिटयूट ऑफ टेक्नॉलॉजी, सुरत , ६. नॅशनल इन्स्टिटयूट ऑफ टेक्नलॉजी, मंगलोर, ७. एसआरएम इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स अँड टेक्नॉलॉजी, त्रिची, ८. गांधी इन्स्टिटयूट ऑफ टेक्नॉलॉजी अँड मॅनेजमेंट, विशाखापटणम, ९. आयआयएम, सांभलपूर.

या ५ दिवसीय कॅम्पमध्ये राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावरील तज्ञ मार्गदर्शक, स्टार्टअपचे संस्थापक, उद्योजक हे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणार आहेत. वाधवानी फाऊंडेशन तज्ज्ञांच्या नेतृत्वाखालील उद्योजकता शिक्षण आणि उत्कृष्ट प्रशिक्षण मॉड्यूलचे यावेळी सादरीकरण करणार आहे.

## जाहीर प्रगटन

**मा.दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) सोयगांव यांचे न्यायालयात, जि. औरंगाबाद**

दिवाणी किरकोळ अर्ज क्रं. १२७/२०२४.

१. कांताबाई गिरधर गायकवाड (नाईक) वय ५४ वर्षे, धंदा शेती. रा. आमखेडा, ता.सोयगांव, जि. छ.संभाजीनगर. २. लक्ष्मीबाई राजु मोरे, वय ३३ वर्षे, धंदा शेती. रा. वरीलप्रमाणे, ३. श्रावण गिरधर गायकवाड (नाईक), वय ३० वर्षे, धंदा शेती. ग. वरीलप्रमाणे. ४. छाया भोलाराम माळी, वय २९ वर्षे धंदा शेती, रा. बलद ब. ता. पाचोरा, जि. जळगांव ५. सागर गिरधर गायकवाड (नाईक) वय २६ वर्षे, धंदा शेती, रा. आमखेडा, ता. सोयगांव, जि. छ. संभाजीनगर. ६. समाधान गिरधर गायकवाड (नाईक), वय २५ वर्षे, धंदा शेती, रा. वरीलप्रमाणे.

विरुद्ध

निल

प्रकरण :- वारसप्रमाणपत्र मिळणे बाबत

सर्व संबंधितास जाहिर प्रकटनाद्वारे कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदाराने वारसप्रमाणपत्र मिळणेसाठी ॲड. शुभम अशोक आगे, सोयगांव, ता. सोयगांव, जि. छ. संभाजीनगर यांच्या मार्फत या न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे. मयत गिरधर हरसिंग गायकवाड (नाईक) यांचा दिनांक २५/०६/२०२१ रोजी मौजे आमखेडा येथे मृत्यु झालेला असुन त्यांच्या पश्च्यात वरील अर्जदार क्रं. १ ते ६ वारस आहे असा अर्ज मा. न्यायालयात दाखल केलेला आहे.

तरी ज्या कोणाला अर्जदाराच्या वारस प्रमाणपत्र देण्याकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहीर प्रकटनाद्वारे प्रसिद्ध केल्यापासुन ३० दिवसांच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदपत्रासह आपला आक्षेप नोंदवावा अन्यथा अर्जदार यांना कायदेशीररित्या योग्य ते प्रमाणपत्र देण्यात येईल असे.

आजरोजी दिनांक ०९/०९/२०२४ रोजी सही व न्यायालयाच्या शिक्क्यासह दिले

पु.ता.१०.१०.२०२४

आदेशावरुन,

विभागीय लिपीक सहाय्यक अधिक्षक

(दिवाणी व फौजदारी न्यायालय सोयगांव

# वाळूज महानगर तापाने फणफणले प्रत्येक शाळेत १० विद्यार्थी आजारी

वाळूज महानगर: पावसाची उघडीप आणि कडक उष्म्यामुळे तापाचा जोर वाढला असून खोकला, डोळे येणे, सर्दी, ताप , अंगदुखी या आजारांनीही डोके वर काढले आहे. तापाने वाळूज महानगरवासीयांना हैराण केले आहे. लहान मुले, ज्येष्ठ नागरिक,गर्भवती स्त्रियांमध्ये संसर्गजन्य साथींची लागण होण्याचे प्रमाण वाढले असून , प्रत्येक शाळेत १० विद्यार्थी आजारी आहे. त्यामुळे सामान्यांनी कोणत्याही प्रकारचा ताप वा संसर्गजन्य आजाराची लक्षणे अंगावर काढू नयेत असे आवाहन वैद्यकीय तज्ज्ञांनी केले आहे. प्रत्येक वर्षी ज्या प्रमाणे हवामानबदलानुसार साथीच्या आजारांचा जोर कमी अधिक होत असतो. यावेळी हे चक्र व्यस्त झाले आहे. त्यामुळेही मागील वर्षाच्या तुलनेत ताप, सर्दी खोकला,भोवळ येणे,उलट्या, घेरी येणे यासारखा त्रास अधिक दिसून येत आहे. सार्वजनिक आणि खासगी रुग्णालयांमध्ये विविध प्रकारच्या आजारांवर वैद्यकीय उपचार करण्यासाठी येणाऱ्या रुग्णांची विशेष करून लहान मुलांची संख्या वाढली आहे.

## ॲक्शनपट 'रानटी' मराठी रुपेरी पडद्यावर

छत्रपती संभाजीनगर, दि.१९ प्रदर्शित झालेल्या ह्या पोस्टरवरनं 'रानटी' चित्रपट दिसतोय तेवढाच हिंस्त्र आणि त्याहून अधिक ॲक्शनने भरलेला आहे. मराठी सिनेमांत आजपर्यंत कधीही न पाहण्यात आलेल्या दिग्दर्शनाची शैली, थरारक ॲक्शन दृश्य, जबरदस्त पटकथेचा जॉनर आणि अचूक संकलन हे 'रानटी' चित्रपटात पहायला मिळणार आहे. मोठ्या पडद्यावर मराठीत आजवर न पाहिलेली पॉवरफुल्ल ॲक्शन, एंटरटेनमेंट 'रानटी' चित्रपटातून पहायला मिळणार आहे. या चित्रपटातून महाराष्ट्रातील न्यू 'अँग्री यंग मॅन' शरद केळकरच्या रूपाने मिळणार असल्याचे समित सांगतात. समित कक्कड फिल्म्स प्रॉडक्शन्स आणि सन्स ऑफ सॉईल मीडिया प्रा. लिमिटेड यांच्या संयुक्त विद्यमाने येणार्या या चित्रपटाच्या निर्मीती पुनीत बालन यांनी केली आहे. 'रानटी'च्या निमित्ताने श्वास रोखून ठेवणारा चित्रपट २२ नोव्हेंबरला प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. ह्या सिनेमासाठी हृषिकेश कोळी यांचं लिखाण, अजित परब यांचं संगीत, अमर मोहिले यांचं पार्श्वसंगीत, एझाज गुलाब यांची साहसदृष्ये, सेतु श्रीराम यांचं छायाचित्रण, आशिष म्हात्रे यांचं संकलन अशी भक्कम तांत्रिक बाजू असलेली टीम ह्या चित्रपटाला लाभलेली आहे.

## संगीत महोत्सवात दिग्गज कलाकार सहभागी होणार

छत्रपती संभाजीनगर : सिग्नेचर पॅकेज्ड ड्रिंकिंग वॉटर आपल्या चाहत्यांना गोष्टी नैसर्गिक रूपात जतन करण्याची, चांगले आयुष्य जगण्याची आणि निसर्गाशी एकरूप होऊन जगण्याची प्रेरणा देते. त्यामुळेच, झीरो फेस्टिव्हलशी असलेली त्यांची प्रदीर्घ भागीदारी चालू ठेवली यह. झीरो फेस्टिव्हल हा भारतातील एक अत्यंत मोठा आणि निसर्गाचे साहचर्य असलेला भव्य सोहळा आहे. अरुणाचल प्रदेशातील झीरो व्हॅलीच्या हिरव्यागार प्रदेशात साजरा होणारा हा ४-दिवसीय महोत्सव जीवनाच्या पर्यायी मार्गाशी लीन होण्यास मदत करतो. सिग्नेचर पॅकेज्ड ड्रिंकिंग वॉटर आणि भारताच्या सर्वाधिक हरित संगीत महोत्सवाच्या भागीदारीच्या प्रदीर्घ परंपरेत यंदा तामिक्रेस्ट, बल्लीमारन, हनुमानकाइंड, डॅबझी आणि इतर काही कलाकार या महोत्सवात सहभागी होणार. या महोत्सवात विविध प्रकारच्या आणि समृद्ध अनुभवांची एक मालिका आपल्या समोर येते. हे अनुभव निसर्गप्रेमींना तसेच संगीत रसिकांना आकर्षित करतात. इको-सजग प्रथांपासून ते महोत्सवात सादर होणाऱ्या सांस्कृतिक आणि सांगीतिक कृतींपर्यंत सर्वांसाठी हा महोत्सव एक अनोखा मंच सादर करतो. आणि येथे उपस्थित रसिकांना विविध परफॉर्मन्सचा आस्वाद घेता घेता, वेगवेगळे क्रियाकलाप करता-करता निसर्गाचे विलोभनीय रूपही अनुभवता येते. हा महोत्सव यंदा २६ सप्टेंबर ते २९ सप्टेंबर २०२४ दरम्यान आयोजित करण्यात आला आहे.

# मनपा निधीतील थकीत देयके आता क्रमवारीनुसार मिळणार

अहमदनगर : महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासकपदाची सूत्रे हाती घेतल्यानंतर यशवंत डांगे यांनी महापालिकेच्या विविध विभागांच्या कामामध्ये सुसूत्रता आणण्याचे नियोजन केले आहे. महानगरपालिकेच्या सर्वात महत्त्वाच्या अशा अर्थ विभागाकडे अनेक वर्षांपासून थकीत असलेली महापालिका निधीतल्या विकास कामांची देयके अदा करण्यासाठी नियोजन केले आहे. ही थकीत देयके आता स्थायी खर्च भागविल्यानंतरच शिल्लक राहिलेल्या रकमेतून क्रमवारीनुसार देण्याचे नियोजन आयुक्त डांगे यांनी केले आहे. दहा लाखापर्यंतची थकीत देयके पूर्ण अदा करण्यात येतील व त्यापेक्षा मोठ्या रकमेची देयके टप्प्याटप्प्याने अदा करण्यात येणार आहेत. क्रमवारीनुसार थकीत देयकांची यादी तयार करण्यात आली असून ती मनपाच्या संकेतस्थळावर व नोटीस बोर्डवर प्रकाशित करण्यात आली आहे. याबाबत काही हरकती अथवा सूचना असल्यास त्या लेखी स्वरूपात मुख्यलेखाधिकारी यांचेकडे दिनांक २८/०९/ २०२४ रोजी सायं. ५ वाजेपर्यंत दाखल कराव्यात असे आवाहन आयुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे यांनी केले आहे

## जाहीर प्रगटन

**श्रीमती पी.बी. पाटील, दिवाणी न्यायाधिश, (क. स्तर) न्यायालय गंगापुर**

सिव्हील एम ए.क. ३९२/२०२४ प्रकरणात पु. त.दि. २५/१०/२०२४

अर्जदार : १) अजिज अब्दुलरज्ञाक बागवान, वय ५३ वर्ष, धंदा मजुरी, रा. शक्करभाई मोहल्ला, लासुर स्टेशन ता. गंगापुर जि. औरंगाबाद २) तमिज अब्दुल रज्ञाक बागवान, वय ५५ वर्ष, धंदा मजुरी, रा. शक्करभाई मोहल्ला, हर्सुल, ता. गंगापुर जि. औरंगाबाद ३) शेख अनिस शेख रज्ञाक, वय ४८ वर्ष, धंदा मजुरी, रा. गोपीनाथनगर, लासुर स्टेशन ता. गंगापुर जि. औरंगाबाद ४) जफर रज्ञाक शेख, वय ४५ वर्ष, धंदा मजुरी, रा. लासुर स्टेशन ता. गंगापुर जि. औरंगाबाद ५) अजहर रज्ञाक बागवान, वय ३८ वर्ष, धंदा मजुरी, रा. लासुर स्टेशन ता. गंगापुर जि. औरंगाबाद ६) अफसर अब्दुल रज्ञाक बागवान, वय ४० वर्ष, थंदा मजुरी, रा. शक्करभाई मोहल्ला, लासुर स्टेशन ता. गंगापुर जि. औरंगाबाद ७) बागवान बब्बु अब्दुलरज्ञाक, वय ३६ वर्ष, धंदा मजुरी, रा. अनंतपुर ता. गंगापुर जि. औरंगाबाद ८) शबाना भ्र. नसीर बागवान, वय ४८ वर्ष, धंदा घरकाम, रा. बाबुराव पवार चौक लासुर स्टेशन, ता. गंगापुर जि. औरंगाबाद ९) बागवान सुमैय्या भ्र. अनिस, वय ३७ वर्ष, धंदा घरकाम, रा. मन्सुरी कॉजली, गंगापुर, ता. गंगापुर जि. औरंगाबाद

विरुध्द

गैरअर्जदार : निरंक

प्रकरण : बॉम्बे रेगुलेशन ॲक्ट VIII 1827 अन्वये लिगल हेअरशिप सर्टिफिकेट मिळणे बाबत

सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त अर्जदार यांनी या न्यायालयात ॲड. आसिफ आय. शहा गंगापुर यांच्यामार्फत बॉम्बे रेगुलेशन ॲक्ट VIII 1827 अन्वये लिगल हेअरशिप सर्टिफिकेट मिळणे कामी अर्ज सादर केला आहे की, अर्जदार क १ ते ९ हे वर नमुद ठिकाणचे कायमस्वरूपी राहणारे असुन अर्जदार क १ ते ९ हे आपसात नात्याने सख्खे भाउ व विवाहीत बहिनी आहेत. अर्जदार क १ ते ९ यांचे वडील नामे आब्दुल रज्ञाक शे. शक्करजी बागवान हे दि.२१/१२/२०१२ रोजी मौजे हर्सुल, लासुर स्टेशन ता. गंगापुर जि. औरंगाबाद येथे मयत झालेले असुन मयताची पत्नी म्हणजेच अर्जदार क १ ते ९ यांची आई नामे सुरय्याबी अब्दुल रज्ञाक बागवान हि दि. १७/०१/२०१६ रोजी मौजे हर्सल ता. गंगापुर जि. औरंगाबाद येथे मयत झालेली असुन दोन्ही मयतांना अर्जदार क १ ते ७ हे मुले व अर्जदार क ८ व ९ हया विवाहीत मुली कायदेशीर वारसदार आहे. मयत आब्दुल रज्ञाक शे. शक्करजी बागवान व मयत सुरय्याबी अब्दुल रज्ञाक बागवान यांना अर्जदार क १ ते ९ हेच एकमेव कायदेशीर वारसदार आहे. अर्जदारांच्या व्यतिरिक्त मयतास इतर कोणीही वारसदार नाही. मयत आब्दुल रज्ञाक शे. शक्करजी बागवान व मयत सुरय्याबी अब्दुल रज्ञाक बागवान यांच्या मृत्यु मुळे अर्जदारांना शासकीय, निमशासकीय कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे सबब सदर प्रकरणी कोणाचाही कोणत्याही प्रकारचा आक्षेप किंवा उजर असल्यास त्यांनी प्रस्तुत जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासुन ३० दिवसाच्या आत या न्यायालयात नोंदवावा. त्यानंतर आलेल्या आक्षेपाचा विचार

केला जाणार नाही. करीता जाहीर प्रगटन. आज दि. २१/९/२०२४ रोजी माझ्या सहिने व या न्यायालयाच्या शिक्कयानिशी दिले.

आदेशावरून

लिपीक सहाय्यक अधिक्षक

दिवाणी न्यायालय क स्तर गंगापुर

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# भारतीय जनता पार्टी जालना महानगरच्या संघटनात्मक नियुक्त्या जाहीर

तभा वृत्तसेवा
जालना/प्रतिनिधी

माजी केंद्रीय मंत्री ना. रावसाहेब पाटील दानवे व भाजपा प्रदेशाध्यक्ष आ.चंद्रशेखर बावनकुळे यांच्या सुचनेनुसार भाजपा प्रदेश निमंत्रित सदस्य श्री.विजयजी बिशनलाल कामड व सौ.विमलताई अशोकराव आगलावे यांची आज (दि.२१) रोजी पत्राद्वारे नियुक्ती करण्यात आली आहे.

यावेळी भारतीय जनता पार्टी जालना महानगर ची कार्यकारिणी आज (दि.२१) रोजी माजी केंद्रीय मंत्री ना. रावसाहेब पाटील दानवे यांच्या सुचनेनुसार भाजपा जिल्हा कार्यालय जालना येथे जालना विधानसभा प्रमुख भास्कर (आबा) दानवे यांच्या प्रमुख उपस्थितीत व भाजपा जालना महानगराध्यक्ष अशोक आण्णा पांगारकर यांच्या अध्यक्षतेखाली जाहीर करण्यात आली.

भाजपा जालना महानगराचे दहा भाग करण्यात आले व त्याला मंडळ असे नाव देण्यात आले यापैकी मंडळ अध्यक्ष पदी १. ढवळेश्वर मंडळ अध्यक्ष सुभाष चंदुलाल सले, २. कन्हैय्यानगर मंडळ अध्यक्ष बाबुराव शंकरराव भवर, ३. चंदनझिरा मंडळ सोमनाथ माणिकराव गायकवाड, ४. कसबा मंडळ रामलाल सुखलाल जाधव, ५. बाजारपेठ मंडळ आनंद शिवाअप्पा झारकंडे, ६. रामनगर मंडळ सौ.सखुबाई गुलाब पणबिसरे, ७. गांधीचमन मंडळ आनंत म्याका, ८. भाग्यनगर-शिवनगर मंडळ श्रीकांत वसंतराव शेलगावकर, ९. आनंदवाडी मंडळ मनोज बिडकर, १०. अंबडरोड मंडळ सुमित सुधाकरराव सुरडकर यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

भाजपा जालना महानगर मंडळ प्रभारी पदी ढवळेश्वर मंडळ प्रभारी अमोल दत्तात्रय कारंजेकर, कन्हैय्यानगर मंडळ दुर्गेश रतनलाल कुरील, चंदनझिरा मंडळ शिवराज केशवराव जाधव, कसबा मंडळ ज्ञानेश्वर रावसाहेब ढोबळे, बाजारपेठ मंडळ प्रमोद कमलाकरराव गंडाळ, रामनगर मंडळ सतीश सुरेशराव जाधव, गांधीचमन मंडळ शशिकांत रामकृष्ण घुगे, भाग्यनगर-शिवनगर मंडळ महेश विष्णू निकम, आनंदवाडी मंडळ प्रभुलाल नारायणजी गोमतीवाले, अंबडरोड मंडळ प्रा.राजेंद्र संपतराव भोसले यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

भाजपा जालना महानगराध्यक्ष अशोक आण्णा पांगारकर यांच्यासह जालना महानगर प्रभारी पदी श्री.सिद्धिविनायक वसंतराव मुळे तसेच भाजपा जालना महानगर उपाध्यक्ष पदी श्री.चंपालाल छोटेलाल भगत, श्री.सुहास विजयकुमार मुंढे, श्री.योगेश लहाने, श्री.दुर्गेश रतनलाल कुरील, सौ.रुख्मीनी सुभाष पवार, श्री.महेंद्र अकोले, श्री.ज्ञानेश्वर रावसाहेब ढोबळे, श्री.राजू गवई, श्री.चेतन देसरडा, श्री.शशिकांत रामकृष्ण घुगे, श्री.लक्ष्मण वर्मा, श्री.सुनील रुपा पहेलवान खरे, श्री.सुनील मोहनलाल राठी यांची जालना महानगराच्या उपाध्यक्ष पदी नियुक्ती करण्यात आली आहे.




भाजपा जालना महानगर सरचिटणीस पदी शिवराज केशवराव जाधव, महेश निकम, अमोल दत्तात्रय कारंजेकर, सुनील सुभाष पवार यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

भाजपा जालना महानगर चिटणीस पदी श्री.किरण लालासाहेब इंगळे, सौ.लक्ष्मीबाई अशोक लहाने, श्री.शांतीलाल राऊत, श्री.गोविंद बालकिसन चिलवर, श्री.सतिष अकोलकर, श्री.नेमीचंद भूरेवाल, श्री.मनोज इंगळे, श्री.शेखर बुंदिले, रणजित राजपाल रिडला यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

भाजपा जालना महानगर सोशल मिडिया प्रमुख पदी श्री.मनोज दाविदराव बिडकर, कोषाध्यक्ष पदी श्री.राहुल किशोर अग्रवाल व प्रसिध्दीप्रमुख श्री.नागेश बेनीवाल यांची नियुक्ती करण्यात आली आहे. भाजपा जालना महानगर मोर्चा अध्यक्ष पदी युवा मोर्चा अध्यक्ष श्री.अमोल धानुरे, महिला मोर्चा अध्यक्षा सौ.शुंभागी श्रीकांत देशपांडे, ओबीसी मोर्चा अध्यक्ष श्री.सोमेश चुन्नुलाल काबलिये, अनुसूचित जाती मोर्चा अध्यक्ष श्री.अभिजीत अंभोरे, अल्पसंख्यांक मोर्चा अध्यक्ष श्री.सय्यद इम्रान अली, अनुसूचित जाती जमाती मोर्चा अध्यक्ष श्री.डोंगरसिंग भावडू साबळे, किसान मोर्चा अध्यक्ष श्री.प्रशांत गाडे यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

भाजपा जालना महानगर प्रकोष्ठ व सेल च्या अध्यक्ष पदी कामगार आघाडी संयोजक माणिक फड, उद्योग आघाडी संयोजक अविनाश देशपांडे, व्यापार आघाडी संयोजक मनोज पाचफुले, उत्तर भारतीय आघाडी संयोजक अशोक मिश्रा, वैदकिय सेल संयोजक गोविंद भताने, कायदा सेल संयोजक राहुल प्रल्हादराव इंगोले, सहकार सेल संयोजक गणेश धारूरकर, सोशल मिडीया संयोजक मनोज दावीदराव बिडकर, जेष्ठ कार्यकर्ता सेल संयोजक प्रभुलालजी नारायणजी गोमतीवाले, दिव्यांग सेल संयोजक नितीन देव, शिक्षक सेल संयोजक अतुल हेलसकर, जैन प्रकोष्ठ संयोजक राजेश चंदुलाल बांठीया, आयुष्यमान भारत सेल संयोजक लक्ष्मण नामदेवराव खाडे, बेटी बचाओ-बेटी पढाओ संयोजक सौ.सुनिता अर्जुन जाधव, फेंन्डस ऑफ बीजेपी सेल संयोजक धिरज केसरीलाल मेवाडे, मन की बात सेल संयोजक धनराज मोहनलाल काबलिये, सेवाभावी संस्था (एनजीओ) सेल संयोजक विश्वनाथ क्षीरसागर, दक्षिण भारतीय सेल संयोजक योगेश परशुराम सामलेटी, बुद्धीजीवी सेल संयोजक पदी डॉ.पवन लक्ष्मीकांत देशमुख यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

भाजपा जालना महानगर जिल्हा कार्यकारिणी सदस्य पदी श्री.रोषण जयसिंग चौधरी, सौ.सरिता महेंद्र अकोले, श्रीधर प्रभाकर देशपांडे, श्री.योगेश विश्वनाथ नागरे, श्री.पंकज किल्लेदार, श्री.देविदास अंबादास जाधव, श्री.अमोल अरुण खडके, श्री.विवेक नारायण पाटील, श्री.हरीभाऊ बाबुराव नाटकर, श्री.राजेश किसनराव बाबरेकर, श्री.सचिन राजेश्वर सासवडे, श्री.प्रेमनारायण मच्छिंद्र काळे, श्री.देविदास विश्वनाथ तिळवणे, श्री.विजय वनगुजर, श्री.विजय पांगारकर, श्री.करण फुलचंद झाडीवाले, श्री.गौरव मनोज गोधेकर, श्री.गणेश भालेराव, श्री.निलेश गवळी, श्री.मुकेश राठोड, श्री.गणेश जल्लेवार, श्री.रोहित नलावडे, श्री.संतोष काळे, श्री.सुरज पणबिसरे, श्री.लखन ठाकूर, श्री.सुरेंद्र शेडूते, श्री.सेवक नारीयलवाले, श्री.प्रकाश जायभाये, श्री.संतोष वाघ, श्री.गोपाल गोमतीवाले, श्री.बबनराव उजेड, श्री.पवन शांतीलाल झुंगे, श्री.संतोष औरंगे, सौ.वैशाली बनसोडे, सौ.ममता गोपाल कोंड्याल, सौ.वर्षा शंकरसिंग ठाकूर, श्री.जगदीश नरसय्या येनगुपटला, श्री.अथर्व कुलकर्णी, श्री.अमोल बाबुराव भवर, श्री.उमेश सोपान पेंढारकर, श्रीमती स्नेहा राजेश जोशी यांची भाजपा जालना महानगर जिल्हा कार्यकारिणी सदस्य पदी नियुक्ती करण्यात आली आहे.

यावेळी भाजपा नवनिर्वाचीत पदाधिकाऱ्यांना मार्गदर्शन करतांना जालना विधानसभा प्रमुख भास्कर आबा दानवे म्हणाले की, आपण जालना महानगरातील पक्ष संघटने करीता अनेक लोकउपयोगी कामे करुन जनतेमध्ये आपला ठसा उमटवित आहात तसेच यापुर्वी पक्ष संघटनेच्या बळकटीसाठी केलेले कार्य उत्तम आहे.केंद्र व राज्य शासनाच्या जनकल्याणकारी योजना सामान्य जनतेपर्यंत पोहचविण्याचे काम व विकास कामे आपणास दिलेल्या पक्षाच्या जबाबदारीतुन जनतेला समजावून सांगावे असे म्हटले आहे.

यावेळी भाजपा नवनिर्वाचीत पदाधिकाऱ्यांना मार्गदर्शन करतांना जालना महानगराध्यक्ष अशोक आण्णा पांगारकर म्हणाले की, जालना महान-गरातील दहा मंडळातील अध्यक्ष, प्रभारी व पदाधिकाऱ्यानी सर्व २२४ बूथ पर्यंत भारतीय जनता पार्टीचे संघटन बांधणी करून येणाऱ्या निवडणुकांच्या तयारी साठी कामाला लागावे व पक्षाचे काम करीत असताना जनहिताचे कामे करावेत व शासनाच्या सर्व योजना सर्वसामान्य जनतेपर्यंत पोहोचवाव्यात असे त्यांनी सांगितले.

यावेळी प्रमुख उपस्थिती प्रदेश निमंत्रित सदस्य रामेश्वर भांदरगे, जिल्हा सरचिटणीस सिद्धिविनायक मुळे, महिला मोर्चा जिल्हाध्यक्षा सौ.संध्याताई देठे, प्रदेश निमंत्रित सदस्य विजय कामड, तालुकाध्यक्ष वंसतराव शिंदे, वैशाली बनसोडे भाजपा चे सर्व नगरसेवक व पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उप-स्थित होते.

## संक्षिप्त

### परतवाडी ग्रामपंचायतवर सहा कोटींच्या भ्रष्टाचाराचे आरोप; ग्रामस्थांचा उपोषणाचा आज तिसरा



तभा वृत्तसेवा
परतुर/प्रतिनिधी

परतुर तालुक्यातील परतवाडी ग्रामपंचायतवर सहा कोटींच्या भ्रष्टाचाराचे आरोप करण्यात आले आहेत. माजी सरपंच शैलेंद्र आढे यांनी या प्रकरणात कारवाई करण्याची मागणी करत जिल्हा परिषद कार्यालयासमोर आमरण उपोषण सुरू केले आहे.जालना जिल्ह्यातील परतुर तालुक्यातील परतवाडी ग्रामपंचायतवर माजी सरपंच शैलेंद्र आढे यांनी सहा कोटींच्या भ्रष्टाचाराचे आरोप केलेत. वेगवेगळ्या योजनांच्या माध्यमातून गेल्या काही वर्षापासून ग्रामपंचायत ग्रामसेवक, विस्तार अधिकारी यांच्या मार्फत हा भ्रष्टाचार झाला असल्याचा आरोप देखील त्यांनी केला. या प्रकरणात वारंवार तक्रारी करूनही संबंधित अधिकारी कर्मचाऱ्यावर तसेच पदाधिकाऱ्यावर कोणतीही कारवाई झाली नसल्याने त्यांनी अखेर जिल्हा परिषद कार्यालयासमोर उपोषण सुरू केले आहे.



तभा वृत्तसेवा

जालना : महायुती सरकारच्या कार्यकाळात गोरगरीब जनतेस मोफत धान्य आणी गौरी गणपती सणानिमीत्त दिला जाणारा आनंदाचा शिधा १०० रुपयात आज मौजे तांदुळवाडी खुर्द ता जि जालना येथे वाटप करतांना स्वस्त धान्य दुकानदार आण्णासाहेब चित्तेकर व तांदुळवाडी खुर्द येथील ग्रामस्थ स्वस्त धान्य दुकाणांतून आनंदाचा शिधा वाटपाचा लाभ घेताना दिसत आहेत .

### मुख्यमंत्री जनकल्याण कक्षाच्या पुढाकाराने विद्यार्थ्यांना ऑनलाईन टेस्ट सिरीजचे वाटप



तभा वृत्तसेवा
जालना/प्रतिनिधी

मुख्यमंत्री जनकल्याण कक्ष यांच्या पुढाकाराने जालना जिल्ह्यातील ८३३ विद्यार्थ्यांसाठी ऑनलाईन टेस्ट सिरीज कार्यक्रमा अंतर्गत श्री महावीर स्थानकवासी जैन माध्य. व उच्च माध्यमिक विद्यालय, जालना येथे विद्यार्थ्यांना टेस्ट सिरीज, स्मार्ट कार्डचे वाटप केले. सीएसआर निधीमधून लोकाभिमुख कामांचे नियोजन आणि अंमलबजावणीसाठी महाराष्ट्राचे कर्तबगार मुख्यमंत्री मा.श्री. एकनाथजी शिंदे साहेब यांच्या नेतृत्वाखाली मुख्यमंत्री जनकल्याण कक्ष स्थापन करण्यात आला आहे.

या कक्षाच्या वतीने सामाजिक उत्तरदायित्व निधी (सीएसआर) मधून शालेय विद्यार्थ्यांना टेस्ट सिरिज वाटपाचा नाविन्यपूर्ण उपक्रम हाती घेण्यात आला आहे. यावेळी विद्यार्थ्यांशी संवाद साधत चांगला अभ्यास करा, आपल्या आवडीच्या क्षेत्रात प्रावीण्य मिळवा व उच्च शिक्षण घेऊन जालना जिल्ह्याचं नावलौकिक करावे, यासाठी सर्वांना शुभेच्छा दिल्या. यावेळी प्राचार्य, शिक्षक व विद्यार्थी यांची मोठ्या संख्येने उपस्थित होती.

## मनोज जरांगे पाटील यांच्या समर्थनार्थ जालना जिल्हा बंदला जाफराबादेत उस्फुर्त प्रतिसाद

तभा वृत्तसेवा
जाफराबाद/प्रतिनिधी

मनोज जरांगे पाटील यांच्या आमरण उपोषणाला पाठिंबा देण्यासाठी जालना जिल्हा बंदची हाक देण्यात आली होती या बंदला जाफराबाद तालुक्यातील नागरिकांनी व व्यापाऱ्यांनी आपली प्रतिष्ठान दुकाने बंद ठेवून उस्फूर्त प्रतिसाद दिला आहे.




यावेळी मराठा आंदोलकांनी सरकारला इशारा दिला आहे की मराठा संघर्ष योद्धा मनोज जरांगे पाटील हे गेल्या १३ महिन्यापासून आंदोलन करीत आहे आणि त्यांनी १३ महिन्यात पाच आमरण उपोषण केले आता सध्या त्यांचे सहावे आमरण उपोषण हे सुरू असून त्यांच्या उपोषणाचा सहावा दिवस आहे त्यांची त्यांची प्रकृती खालावली असून सरकार मात्र झोपेचे सोंग घेत आहे असा आरोप मराठा समाजाने केला आहे तरी राज्य सरकारने तात्काळ मराठा आरक्षण सदर्भातील

निर्णय घ्यावा सगे सोयरे अधिसूचनेचे कायद्यात रूपांतर करण्यात यावे व मराठा समाजाचा हैदराबाद गॅझेट सातारा संस्थान गॅझेट बॉम्बे गॅझेट घेऊन महाराष्ट्रातील मराठा समाजाला सरसकट ओबीसीचे आरक्षण देऊन न्याय द्यावा व मनोज जरांगे पाटील यांचे उपोषण मागे घ्यावे अशी मागणी यावेळी मराठा समाज बांधवांनी केली आहे... यावेळी तालुक्यातील सकल मराठा समाज बांधव उपस्थित होते.

## मनोज जरांगे पाटील यांच्या समर्थनार्थ मंठ्यात सर्वपक्षीयांनी एकत्र येऊन पाळला आजचा बंद



तभा वृत्तसेवा
मंठा/प्रतिनिधी

मराठा समाजाला ओबीसी प्रवर्गातून आरक्षण मिळावे यासाठी अंतरवाली सराटी येथे उपोषणाला बसलेले मराठा योध्दा मनोज जरांगे पाटीलत यांच्या समर्थनात रविवारी २२ सप्टेंबर रोजी जालना जिल्हा बंदच्या हाकेला मंठा तालुक्यात कडकडीत बंद ठेवून उस्फूर्त प्रतिसाद देण्यात आला. यादरम्यान मंठा शहरातील व्यापारी बांधवांनी रविवारी सकाळपासूनच दुकाने बंद ठेवून बंदला उस्फूर्त प्रतिसाद दिला. यावेळी शहरात ठिकठिकाणी पोलीस निरीक्षक रवींद्र निकाळजे यांच्या पथकाकडून पोलीस बंदोबस्त तैनात ठेवण्यात आला होता.

मंठा शहरातील छत्रपती संभाजी महाराज चौक ते छत्रपती शिवाजी महाराज चौकापर्यंत मंठा तालुक्यातील सकल मराठा समाज बांधवांच्या वतीने रॅली काढण्यात आली.या रॅलीमध्ये मराठा आरक्षण योद्धा मनोज जरांगे पाटील यांची प्रतिमा हातात घेऊन तरुणांनी घोषणा दिल्या. आरक्षण आमच्या हक्काचे, एक मराठा , लाख मराठा यासह विविध घोषणा मराठा समाज बांधवांच्या तरुणांनी दिल्या. या रॅलीत मोठ्या संख्येने मराठा समाज बांधवांची उपस्थिती होती.

## मानवी जीवनमूल्य सांगणारी महाचिंतनी यंदा जालन्यात; स्वागताध्यक्षपदी अर्जुनराव खोतकर

तभा वृत्तसेवा
जालना/प्रतिनिधी

मानवी जीवनमूल्य आणि आचारधर्म सांगणारे महाराष्ट्र शासनाचा ज्ञानोबा तुकोबा पुरस्कार प्राप्त महंत प.पू. बाभूळगावकर शास्त्री यांच्या संकल्पनेतील महाचिंतनी कार्यक्रम यावर्षी जालना शहरात होत आहे. माजी राज्यमंत्री अर्जुनराव खोतकर यांची स्वागताध्यक्षपदी सर्वानुमते निवड करण्यात आली असून जानेवारीत होणाऱ्या या कार्यक्रमाची पूर्वतयारी बैठक नुकतीच पार पडली. महाचिंतनी कार्यक्रमाचे हे २८ वे वर्ष आहे. येथील संजीवनी हॉस्पिटलचे संचालक डॉ. बळीराम बागल हे प्रमुख संयोजक आहेत. महाचिंतनी कार्यक्रमात सर्वज्ञ श्री. चक्रधर स्वामी यांच्या समता, ममता आणि जीवनमूल्य विषयक विचारावर प्रबोधन केले जाते. याशिवाय महाचिंतनी मध्ये वारकरी संप्रदाय,हिंदू , लिंगायत, बौद्ध, जैन, मुस्लिम आदी सर्व धर्मीय तत्त्ववेत्ते व



विचारवंतांना आमंत्रित केले जाते. तसेच सर्व पक्षीय लोकप्रतिनिधींना देखील निमंत्रित करण्यात येते.यंदाही प्रख्यात विचारवंतांना आमंत्रित केले जाणार आहे. महाचिंतनी म्हणजे एक वैचारिक मेजवानीच असते. ९ ते ११ जानेवारी दरम्यान हा कार्यक्रम जालना येथे होणार आहे. सामनगाव रोडवर स्थळ पाहणी देखील करण्यात आली आहे. विविध संयोजन समित्यांची स्थापना करण्यात आली आहे. सुमारे २५ हजार लोक महाराष्ट्रातून या कार्यक्रमास तीन दिवस आवर्जून उपस्थित राहतात. पूर्वतयारी बैठक स्वागताध्यक्ष अर्जुनराव खोतकर यांच्या प्रमुख उप-स्थितीत संजीवनी हॉस्पिटल मध्ये पार पडली. यावेळी प.पू. बा.भो. शास्त्री यांच्यासह शिवसेनेचे जिल्हा संपर्कप्रमुख पंडितराव भुतेकर, सुदाम बाबा शास्त्री, माधवराज दादा फलटणकर, डॉ. बळीराम बागल, शिवसेनेचे शहर प्रमुख आत्मानंद भक्त, ज्येष्ठ पत्रकार गुलाबराव पाटील, विश्वंभर भुतेकर, एड. योगेश अक्कर, आबासाहेब मते, अनिल भालेकर, रामेश्वर कोल्हे, गोरख कावळे, सुभाष कदम, आजिनाथ सुरवसे, रवींद्र घनगाव, राहुल गवारे, अरुण काकडे आदी प्रमुख उपस्थित होते. या बैठकीचे संचालन सुदामबाबा शास्त्री यांनी केले तर उपस्थितांचे आभार डॉ. बळीराम बागल यांनी मानले.

## जामवाडी येथील कार्यकर्त्यांचा राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीमध्ये प्रवेश



तभा वृत्तसेवा
जालना/प्रतिनिधी

जालना तालुक्यातील मौजे जामवाडी येथील अनेक जेष्ठ व युवक कार्यकर्त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे जिल्हाध्यक्ष तथा माजी आमदार अरविंदराव चव्हाण यांच्या हस्ते राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी प्रवेश केला. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे जिल्हा उपाध्यक्ष अण्णासाहेब चितेकर, असंघटित कामगार आघाडीचे मराठवाडा कार्याध्यक्ष सतीष वाहुळे, असंघटित कामगार आघाडीचे जिल्हाध्यक्ष अनिल वानखेडे, सेवादलाचे जिल्हाध्यक्ष पद्माकर हांडे, जालना तालुकाध्यक्ष संतोष ढेंगळे, युवक तालुकाध्यक्ष उमेश मोहिते, असंघटित कामगाराचे शहराध्यक्ष रवि भुजंग, सरचिटणीस अशोक जाधव, उपाध्यक्ष वाहेद तांबोळी यांची उपस्थिती होती. यावेळी लहू थोरात,बबन खंडाळे,महेमुद सय्यद, अंबादास कांबळे,विजय लोखंडे,राम कावळे,वैजिनाथ कावळे, बजरंग लोंढे,डी.के.गायकवाड, बाबासाहेब वाहुळे यांच्यासह अनेक कार्यकर्ते व युवकांनी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीमध्ये प्रवेश केला.

# इच्छुकांच्या भाऊगर्दीमुळे काँग्रेसची वाढली डोकेदुखी!

## निवडणुकांच्या तोंडावर परतुर-मंठा विधानसभा मतदारसंघातून विधानसभेच्या उमेदवारीसाठी पक्षातील वरिष्ठानां इच्छुकांकडून साकडे!

तभा वृत्तसेवा
जालना/सुरेश कवडे पाटील







राज्यात विधानसभा मतदारसंघाच्या निवडणुकांचे पडघम वाजायला सुरुवात झाली आहे . कोणत्याही क्षणात जाहीर करण्यात येऊ शकतात तसेच तात्काळ आदर्श आचार संहिता लागु होऊ शकते . या पाश्वभुमीवर परतुर - मंठा तालुक्यातील कॉग्रेस पक्षात आमदाकीसाठी सर्वाधिक ईच्छुक उमेदवार असल्याने कॉग्रेस पक्षातील वरिष्ठ नेत्यांची उमेदवार निवडीसाठी डोकेदुखी वाढू शकते . परतूर - मंठा विधानसभा मतदारसंघातून विधानसभेसाठी ईच्छुक एक , दोन , तिन नव्हे तर तब्बल पाच जणांनी आपल्या उमेदवारीचे वार्शिंग गुड्यांना बाशिंग बांधले आहे . यात निष्ठावंत प्रभावी उमेदवार म्हणुन सुरेश जेथलिया आहेत तर दुसरे विधानपरिषेदे आमदार राजेश राठोड , अन्वर देशमुख , अविनाश चव्हाण , कल्याण बोराडे असे ईच्छुक उमेदवार म्हणून कॉग्रेस पक्षाकडुण परतुर - मंठा विधानसभा मतदारसंघातून ईच्छुकांच्या शर्यतीत आहेत . म त दा र संघात स्वतःला उमेदवारी मिळवण्यासाठी पक्षातील वरिष्ठ नेत्यांना आपआपल्या परिने भेठीगाठीत साकडे घालण्यात येत आहेत . परतुर मंठा मतदारसंघात ईच्छुकांची भाऊगर्दी वाढल्याने वरिष्ठांना सक्क्षम खंबिर उमेदवार निवडावा लागेल . जो तो आप-ापल्या परीने प्रयत्न करित आहे मात्र सध्यातरी पक्षाकडुण कोणाला विधानसभेच्या उमेदवारीची माळ घातली जाणार आहे हे सांगता येत नसले तरी जो तो आपापल्या परीने मतदारसंघात विविध सण उत्सवांचे बॅनर प्लेक्स लावून पोस्टरबाजी करताना दिसत आहेत . कॉग्रेस पक्षाकडुण प्रत्येकजण मलाच उमेदवारी जाहीर करण्यात येणार आसल्याचे बोलले जात आहे . सध्यातरी सर्वच ईच्छुक उमेदवार मतदार संघात कामाला लागल्याचे चित्र पहायला मिळत आहे .

> **“ परतुर - मंठा विधानसभा मतदारसंघात कॉग्रेस पक्षातुन ईच्छुकांच्या भाऊगर्दीची संख्या वाढली आसुन उमेदवारी केवळ एकाच व्यक्तीला मिळणार असल्याने ऐण निवडणुकांत कॉग्रेस पक्षात पक्षाअंतर्गत वाद निर्माण होऊ शकतो या पक्षा अंतर्गत वादाचा फायदा विरोधी पक्षाला नक्कीच बहुमत मिळवुन देऊ शकते अशी सुत्रांची माहिती आहे.**

# फेडरल रिझर्व्हच्या व्याज दरकपातीचा प्रभाव

विश्लेषण

**प्रबोध नरसापूरकर**

अमेरिकेच्या फेडरल रिझर्व्हने १८ सप्टेंबर २०२४ रोजी ५० बेसिस पॉईंट्सने आपल्या मुख्य कर्ज दरात कपात केली. हा निर्णय गेल्या चार वर्षांतील पहिला महत्त्वपूर्ण बदल आहे. 'फेड'च्या या निर्णयामुळे अमेरिकेतील व्यावसायिक बँकांद्वारे ग्राहकांना आणि व्यवसायांना दिल्या जाणाऱ्या कर्जांच्या दरांवर थेट परिणाम होईल, ज्यामुळे गृहकर्जांपासून ते क्रेडिट कार्डपर्यंतच्या सर्व प्रकारांच्या कर्जांवर व्याजदर कमी होईल. विशेषतः नोव्हेंबरमध्ये होणाऱ्या अध्यक्षीय निवडणुकीच्या पृष्ठभूमीवर हा निर्णय दिशादर्शक ठरेल, असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही.

'फेड'च्या दरकपातीवर चर्चा करण्यापूर्वी, फेडच्या भूमिकेची आणि पृष्ठभूमीची माहिती घेणे क्रमप्राप्त आहे. फेडरल रिझर्व्ह प्रणाली ही अमेरिकेची केंद्रीय बँक आहे. केंद्रीय बँक म्हणून फेड, बँकर्सची बँक आणि सरकारची बँक या दोन्ही भूमिकांमध्ये कार्य करते. बँकर्स बँक म्हणून, ती पेमेंट्स प्रणालीच्या सुरक्षा आणि कार्यक्षमतेची खात्री करण्यास मदत करते. सरकारच्या बँक किंवा वित्तीय एजंट म्हणून, फेड विविध आर्थिक व्यवहार प्रक्रियेत लाखो डॉलर्स हाताळते. जसे एखादी व्यक्ती बँकेत खाते ठेवते, तसेच अमेरिकेची ट्रेझरी फेडरल रिझर्व्हसोबत एक चेकिंग खाते ठेवते, ज्याद्वारे येणाऱ्या फेडरल करांचे भांडवल आणि बाहेर जाणारे सरकारी भांडवल हाताळले जाते.

फेडरल रिझर्व्हची स्थापना का झाली? अमेरिकेत १९०७ मध्ये आलेल्या एका गंभीर आर्थिक संकटामुळे बँकिंग प्रणालीवर मोठा परिणाम झाला. यामुळे १९१३ मध्ये कॉंग्रेसने फेडरल रिझर्व्ह अधिनियम तयार केला. फेडरल रिझर्व्ह प्रणाली सुरुवातीला बँकिंग संकटांचा सामना तसेच संकटांचे व्यवस्थापन करण्यासाठी स्थापन करण्यात आली. आज, 'फेड'ला अनेक व्यापक जबाबदाऱ्या दिल्या गेल्या आहेत, ज्यामध्ये एक मजबूत बँकिंग प्रणाली आणि आरोग्यदायी अर्थव्यवस्था टिकवणे समाविष्ट आहे.

सध्याच्या परिस्थितीकडे येत असताना, फेडने आपल्या मुख्य कर्ज दरात ५० बेसिस पॉईंट्सने कपात करण्याचा निर्णय घेतल्याने व्यावसायिक बँका ग्राहकांना आणि व्यवसायांना जे कर्ज देतात, त्यावर परिणाम होईल. यामुळे गृहकर्जांपासून ते क्रेडिट कार्डांपर्यंतच्या सर्व गोष्टींवर उधारीचा खर्च कमी होईल. हा निर्णय फेडच्या उच्च व्याजदरांच्या वातावरणाच्या अंताची सुरुवात दर्शवतो, ज्याचा उद्देश मागणी कमी करणे होता. बुधवारी झालेली दरकपात डेमोक्रॅटिक पक्षाच्या अध्यक्षीय उमेदवार आणि अमेरिकेच्या उपाध्यक्षा कमला हॅरिससाठी चांगली बातमी आहे, ज्या आगामी निवडणुकीत रिपब्लिकन पक्षाचे अध्यक्षीय उमेदवार तथा माजी अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्याविरुद्ध लढत आहेत.

धोरणनिर्मात्यांनी केंद्रीय बँकेच्या मानक दरात ४.७५ टक्के ते ५ टक्के दरम्यान कपात करण्याच्या प्रस्तावाला ११-१ मतदान करून मान्यता दिली, असे फेडने एका निवेदनात जाहीर केले.

**आता फेडच्या निर्णयांचा नेमका सारांश काय ते पाहूया :**

- फेडने २०२० नंतर पहिल्यांदा ५० बेसिस पॉईंट्सने व्याजदरात कपात केली.
- फेड २०२४ मध्ये आणखी २ वेळा २५ बेसिस पॉईंट्सच्या दरकपातीची अपेक्षा करत आहे.
- २००५ नंतर पहिल्यांदाच एका फेड गव्हर्नरने २५ बेसिस पॉईंटची दरकपातीच्या बाजूने मत दिले.
- फेड आगामी डेटा काळजीपूर्वक मूल्यमापन करेल आणि आपला दृष्टिकोन विकसित करेल.
- फेड २०२५ मध्ये १०० बेसिस पॉईंट्स आणि २०२६ मध्ये ५० बेसिस पॉईंट्सच्या दरकपातीची अपेक्षा करतो.



**फेडरल रिझर्व्हच्या व्याज दरकपातीचा भारतीय बाजारावर होणारा प्रभाव**

फेडरल रिझर्व्हने ५० बेसिस पॉईंटने व्याजदर कमी करण्याचा निर्णय घेतला आहे आणि या निर्णयासोबत पुढील व्याज दरकपातीची अपेक्षा आहे. याचा भारतीय बाजारावर काही महत्त्वाचा परिणाम होऊ शकतो आणि या संभाव्य परिणामांचा सारांश एकूणतः भारतीय अर्थव्यवस्थेच्या अनुषंगाने विचारात घेणे क्रमप्राप्त ठरते :

**१. भांडवली प्रवाहात वाढ :** अमेरिकेतील व्याजदर कमी झाल्यामुळे अमेरिकन वित्तीय मालमत्ता उच्च परतावा असलेल्या भारतीय बाजारांपेक्षा कमी आकर्षक बनू शकतात. यामुळे विदेशी गुंतवणूकदारांना भारतीय बाजारात गुंतवणूक करण्याची संधी अधिक आकर्षक वाटेल, असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. अमेरिकेत कमी व्याजदर असल्याने, गुंतवणूकदारांना तेथे उपलब्ध असलेल्या गुंतवणूक पर्यायांचा परतावा कमी झाला आहे. यामुळे, त्यांना त्यांच्या गुंतवणुकीच्या वाढीची अपेक्षा असलेल्या इतर बाजारांत, विशेषतः भारतीय बाजारात, पैसा गुंतवण्याची प्रेरणा मिळते. भारतीय समभाग आणि कर्ज पत्रांमध्ये गुंतवणूक वाढल्यास, भारतीय अर्थव्यवस्थेत तरलता वाढते ज्याला आपण 'लिक्विडिटी' म्हणतो आणि बाजाराची स्थिती सुधारते. हे केवळ विदेशी गुंतवणूकदारांच्या लाभासाठीच नाही तर स्थानिक अर्थव्यवस्थेसाठीही फायदेशीर आहे, कारण यामुळे रोजगार निर्माण होण्यास मदत होते आणि आर्थिक विकासाला गती मिळू शकते.

**२. स्टॉक मार्केटला चालना :** वाढलेल्या तरलतेमुळे (लिक्विडिटी) आणि विदेशी गुंतवणुकीत वाढ झाल्यामुळे भारतीय स्टॉक मार्केटला सकारात्मक चालना मिळू शकते. गुंतवणूकदारांचे भांडवल उदयोन्मुख बाजारांमध्ये गुंतवले जाऊ शकते, जे विशेषतः भारतीय समभाग बाजारासाठी फायदेशीर ठरू शकते. जेव्हा अधिक गुंतवणूक भारतीय बाजारात येते, तेव्हा त्याचा परिणाम म्हणून समभागांच्या किमतीत वाढ होऊ शकते. हे वाढते भांडवल बाजारात नवीन कंपन्या आणि स्टार्टअप्सच्या भागीदारीत वाढ करून त्यांच्या विकासाला चालना देईल. फेडच्या व्याज दरकपातीचा सकारात्मक परिणाम भारतीय स्टॉक मार्केटवर दिसून येऊ शकतो, जो दीर्घकालीन विकासाला गती देईल.

**३. विनिमय दरातील बदल :** कमी व्याजदरांमुळे अमेरिकन डॉलर कमजोर होऊ शकतो, त्यामुळे भारतीय रुपयाची मूल्य वाढ होऊ शकते. विदेशी भांडवली प्रवाह वाढल्यास हे अधिक प्रभावी ठरू शकते. यामुळे आयातीला कमी किंमत मिळू शकते, पण भारतीय निर्यातदारांच्या स्पर्धात्मकतेवर परिणाम होऊ शकतो.

**४. कर्ज पत्र बाजारातील परिणाम :** जेव्हा विदेशी गुंतवणूकदार भारतीय कर्ज पत्र बाजारात अधिक गुंतवणूक करतात, तेव्हा बाजारात तरलता वाढते. या वाढलेल्या तरलतेमुळे कर्जांच्या किमती कमी होतात, ज्याचा परिणाम म्हणजे कर्ज घेण्यासाठी लागणारे व्याजदर कमी होते. यामुळे भारतीय सरकार आणि कंपन्यांना अधिक अनुकूल शर्तींवर कर्ज मिळवता येते, ज्यामुळे त्यांना आपल्या आर्थिक योजनांना अंमलात आणण्यात मदत मिळते. उदाहरणार्थ, कमी कर्जाच्या खर्चामुळे सरकार अधिक पायाभूत सुविधा प्रकल्पांमध्ये गुंतवणूक करू शकते, जसे की रस्ते, रेल्वे, आणि इतर सार्वजनिक सेवा क्षेत्र. हे आर्थिक वाढीस चालना देईल, नवीन रोजगार निर्माण करेल आणि देशाच्या विकासात योगदान देईल. त्याचप्रमाणे, कॉर्पोरेट क्षेत्रासाठी हा फायदा होतो, कारण कमी व्याजदरामुळे त्यांना नवीन प्रकल्प सुरू करण्याची आणि विस्ताराच्या संधींचा उपयोग करण्याची प्रेरणा मिळते. यामुळे संपूर्ण अर्थव्यवस्था अधिक गतिशील व प्रतिस्पर्धात्मक बनते आणि दीर्घकालीन आर्थिक विकासाला हातभार लागतो. आता, जर भारतातील महागाई नियंत्रित राहिली, तर हे सुधारित कर्ज वातावरण भारताच्या आर्थिक स्थिरतेसाठी आणखी एक सकारात्मक घटक ठरू शकते.

**५. आर्थिक धोरणांची विचारधारा :** फेडरल रिझर्व्हच्या व्याज दरकपातीच्या परिणामस्वरूप भारतीय रिझर्व्ह बँकेला आपल्या व्याजदरांमध्ये बदल करण्यास अधिक मोकळीक मिळू शकते. फेडच्या निर्णयामुळे जागतिक बाजारपेठेत स्थिरता येऊ शकते, ज्यामुळे भारतासारख्या उदयोन्मुख अर्थव्यवस्थांना फायदा होईल. स्थानिक वाढीस समर्थन देण्यासाठी व्याजदर कमी करणे हे आरबीआयचे एक प्रमुख उद्दिष्ट आहे. जेव्हा आरबीआय व्याजदर कमी करते, तेव्हा बँकांदेखील त्यांच्या कर्जांच्या दरांमध्ये कपात करतात. यामुळे लोकांना गृह कर्ज, व्यवसाय कर्ज आणि वैयक्तिक कर्ज घेण्यात सुलभता प्रदान होते. हे सर्व आर्थिक क्रियाकलापांना उत्तेजित करते, ज्यामुळे ग्राहकांची मागणी वाढते आणि त्यामुळे आर्थिक वाढीला गती मिळते.

**६. निर्यात आणि व्यापार :** रुपयाच्या मूल्यवाढीमुळे निर्यातदारांच्या स्पर्धात्मकतेवर परिणाम होऊ शकतो, कारण अधिक मजबूत रुपया आंतरराष्ट्रीय बाजारात भारतीय उत्पादनांच्या किमती वाढवतो. यामुळे भारतीय वस्त्र, कापड किंवा इतर उत्पादने खरेदी करण्यासाठी परदेशी ग्राहकांना अधिक खर्च करावा लागतो, ज्यामुळे भारतीय निर्यातदारांच्या उत्पादनांना स्पर्धा कमी होऊ शकते.

**७. आर्थिक वाढीवर दृष्टिकोन :** जागतिक व्याजदर कमी झाल्यास जागतिक स्तरावर वाढीच्या संधी सुधारतात. जर फेडच्या उपाययोजनांमुळे अमेरिकेत आणि इतर ठिकाणी आर्थिक क्रियाकलाप वाढला, तर भारतीय निर्यातदारांना वाढीव मागणीचा लाभ मिळू शकतो.

**निष्कर्ष :** वरील चर्चिल्या सर्वच बाबींचा प्रत्यक्ष प्रभाव अनेक घटकांवर अवलंबून आहे. देशांतर्गत आर्थिक धोरणे, महागाई दर आणि जागतिक आर्थिक आणि राजकीय घडामोडी यांसारखे घटक या प्रक्रियेत महत्त्वाची भूमिका बजावतील. आरबीआय या बाबींवर बारकाईने लक्ष ठेवेल आणि आवश्यकतेनुसार आपल्या धोरणांमध्ये बदल करेल, हे निश्चित आहे. जर जागतिक स्तरावर किंवा देशांतर्गत स्तरावर कोणतेही महत्त्वाचे बदल झाले, तर आरबीआय त्यानुसार योग्य निर्णय घेण्यासाठी सज्ज आहे तसेच सक्षमदेखील आहे. या सर्व घटकांचा एकत्रित विचार करून, भारतीय अर्थव्यवस्थेला अधिक समृद्ध बनविण्याच्या उद्देशाने आरबीआय धोरणात्मक योजना तयार करेल, हे नक्की.

prabodhn6gmail.com

# महाभारत ते भारत (४)

जीवन जिज्ञासा

**प्राचार्य प्र. श्री. डोरले**

मागील लेखात पाहिल्याप्रमाणे (भाग ३) महाभारत काळातील चक्रवर्ती सम्राट भरताच्या समुद्र वलयांकित असलेल्या भारताची द्वापार युगात फाळणी झाली त्याचा परिणाम कुरुक्षेत्रावरील महायुद्धात झाला. कलियुगातदेखील त्याच राजर्षी भरताच्या भारताची पुन्हा फाळणी झाली. काळ, युग भिन्न असले, तरी त्याच्या मागील 'धृतराष्ट्री वृत्ती' तीच आहे. त्या वृत्तीला आधुनिक काळात आपण पाकिस्तान म्हणतो. सातवळेकरांच्या विवेचनाचे सूत्र गृहीत धरून विचार करण्याचा, चिंतन करण्याचा प्रयत्न केला तर काय लक्षात येते?

आधुनिक काळातही राजर्षी भरताच्या विशाल असलेल्या या भारताचे खरे वारसदार कोण? तर अनादिकाळापासून वारसा हक्काने व्यासांनी निर्मिलेल्या, वर्णिलेल्या सांस्कृतिक जीवनमूल्यांना धरून भारताला मातेच्या स्वरूपात पाहणारा म्हणजे पुत्ररूपाने राहणारा हिंदू समाज! त्यामुळे या देशाचे नाव 'हिंदुस्तान' हे विख्यात झाले आहे, ही वस्तुस्थिती आहे. या वस्तुस्थितीला धरून विचार केला तर मग हिंदुस्तान हिंदूंचा - तात्त्विक भाषेत सांगायचे म्हटले तर 'हिंदुत्व हेच येथील राष्ट्रीयत्व' आहे, हा युगानुयुगे चालत आलेला सिद्धांत स्पष्ट होतो आणि तो मानावाच लागतो. पण स्वातंत्र्य आंदोलनातील इंग्रज, मुसलमान आणि या देशाचे मूळ मालक असलेले हिंदू यांच्यात भारतावर आपला मूळ अधिकार काहीही नसणाऱ्या या दोन घटकांनी शकुनी आणि दुर्योधनासारखी भूमिका वठवली. भारतीय राजकारणाच्या सारीपटावर इंग्रजांनी 'तोडा, फोडा आणि झोडा' ही शकुनीमामाची भूमिका वठवून लीगच्या द्वारा मुसलमानांना हवा दिली. त्यांच्यातील धृतराष्ट्री मनोवृत्तीच्या दूषित महत्त्वाकांक्षेच्या आणि 'काफर' म्हणून अखंड पेटत्या असलेल्या द्वेषाग्नीत तेल ओतले. युधिष्ठिरासारख्या पापभिरू, धर्मभिरू सात्त्विक सोज्वळ असलेल्या भोळसट हिंदू समाजाने त्याकडे दुर्लक्ष केले. धर्मराज दुर्योधनाला 'सुयोधन' म्हणत असे त्याप्रमाणे हिंदूंचे नेतेही मुसलमानांना आपले भाऊ समजत. त्यांचाशी आपलेपणाचा व्यवहार करीत, पण महाभारताचा संदेश आहे की एकतर्फी चांगूलपणाने, विवेकाने, द्वेषाने अंध झालेल्या वृत्तीत काहीही बदल, जीवनाच्या शेवटच्या, अंतिम क्षणापर्यंतही होत नसतो. गदायुद्धात मांड्यांचा चुराडा होऊन अंतिम श्वास घेतानाही धृतराष्ट्री वृत्तीचे प्रतीक असलेल्या दुर्योधनाने त्याच जखमेतून वाहणाऱ्या रक्ताचा तिलक अश्वत्थाम्याला लावून कौरवांचा सेनापती नेमून संपूर्ण पांडवांचा विनाश करण्याचा आदेश दिलाच की नाही? पण लक्षात कोण घेतो?

**संघर्ष - दैवी संपदा आणि असुरी संपदांचा**

महर्षी व्यासांचे महाभारत म्हणजे संपूर्ण मानव जातीचे ठायी अस्तित्वात असलेल्या दैवी संपदा आणि असुरी संपदेतून प्रत्यक्ष व्यवहारी जीवनात प्रकट होणाऱ्या क्रियाशीलतेचा म्हणजे आचरणशास्त्राचा भव्य-दिव्य आलेखच आहे (ब्लू-प्रिंट). या दोन भिन्न प्रवृत्तींमध्ये अखंडपणे संघर्ष चालू असतो; त्यालाच संत तुकोबारायांनी 'रात्रंदिन आम्हा युद्धाचा प्रसंग- अंतर्बाह्य जग आणि मन' असे म्हटले आहे. योगी अरविंद म्हणतात, पाशवी मन आणि दैवी प्रेरणा असलेल्या मनामध्ये अखंडपणे चालणारा संघर्ष- इनसेसंट फ्लो ऑफ स्ट्रगल म्हणजेच 'धर्मक्षेत्र' आणि 'कुरुक्षेत्र' होय. यालाच भगवद्गीतेने दैवी आणि असुरी संपदा असे म्हटले आहे.

द्वापारयुगात कंस, जरासंध, शिशुपाल, धृतराष्ट्र, दुर्योधन, दुःशासन, शकुनी, कर्ण इत्यादी सर्व आसुरी, तामसी, आततायी गुणांचे म्हणजे आसुरी संपदेचे प्रतिनिधित्व करतात तर कृष्ण, बलराम, सर्व पांडव हे दैवी गुणसंपदेचे प्रतिनिधित्व करतात. या विविध पात्रांच्या माध्यमातून, मानवी जीवनात उत्पन्न होणारे सत् आणि असत् प्रवृत्तींच्या सूक्ष्मातिसूक्ष्म चालणाऱ्या विविध संघर्षाचे, प्रसंगांचे जिवंत रेखाटन, चित्रण महर्षी व्यासांच्या दिव्य प्रतिभेतून महाभारतात साकारलेले आहे. भगवद्गीतेत अ. १६ मध्ये या दोन्ही संपदाची यादीच दिली आहे. ती नेहमीसाठी लक्षात ठेवली तर महाभारताच्या वेळेप्रमाणे, कालखंडाप्रमाणे वर्तमानकालीन भारताच्या राजकीय, सामाजिक क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या पाशवी, दानवी शक्ती आणि देश, धर्म, संस्कृती, परंपरा यासाठी कार्यरत असणाऱ्या सात्त्विक, विधायक शक्ती कोणत्या हे आपल्या लक्षात येईल.

**दैवीसंपदा -** अहिंसा, सत्य, त्याग, शांती, कोणाचीही निंदा न करणे, दया, क्षमा, शास्त्राविरुद्ध आचरण न करणे, धैर्य, कोणाशीही शत्रुत्व वा वैर न करणे. आपणच श्रेष्ठ आहोत अशी भावना नसणे, धर्म-परंपरा या बाबतीत श्रद्धा, विश्वास असणे इत्यादी सद्गुणांनी संपन्न असणे. आजच्या परिभाषेत लोकशाही व्यवस्थेत यालाच 'एनलाईटंड सिटिझनशिप' म्हणतात. या सर्व गुणांचे प्रतिनिधित्व आजही भारतीय समाजात दिसून येते. या विरुद्ध आसुरी संपदा असते.

**असुरी संपदा -** दंभ, घमेंड, अहंकार, क्रोध, कठोर भाषण, अज्ञान आंतरबाह्य अशुची, सत्य भाषणाचा तिटकारा, स्वतःचा स्वार्थ साधण्यासाठी काहीही बेकायदेशीर कृत्य करणे, श्रेष्ठ आचरणाचा लवलेश नसणे, परमेश्वरावर श्रद्धा नसणे, ढोंगी, अहंकारी, वासना, विकार यांनी ग्रस्त, मदोन्मत्त, अनैतिक आचरण करणारा, मी मोठा धनिक, थोर कुळात जन्माला आल्याचा अभिमान बाळगणारा (घराणेशाही), माझ्या समान दुसरा कुणीच नाही अशी दर्पोक्ती करणारा 'कः अन्यः अस्ति सदृशः मया?' आणि विषय भोगांच्या पूर्तीसाठी अन्यायाने म्हणजे भ्रष्टाचार करून धनादी पुष्कळशा पदार्थांचा संग्रह करण्याचा प्रयत्न करणारा, हे सर्व असुरी संपदेचे प्रतिनिधित्व करणारे लोक आहेत. महाभारत काळाप्रमाणेच विद्यमान भारतातही ही असुरी संपदाच विविध व्यक्तींच्या माध्यमातून थैमान आणि गोंधळ घालतानाची अनुभूती आपण घेत आहोत. भगवान श्रीकृष्ण अर्जुनाला म्हणतात, हे अर्जुना! दैवी संपदा ही मुक्तिदायक आणि असुरी संपदा ही बंधनकारक आणि अवनतीला, अधःपतनाला कारणीभूत समजली आहे. पण तू शोक करू नकोस. कारण तू दैवी संपदा प्राप्त असलेला पुरुष आहेस. (अ. १६ श्लोक ५).

अर्जुनाच्या भूमिकेत जायचे की देश, धर्म, संस्कृती, परंपरा याच विनाशक आणि स्त्री भक्षी कामांधांच्या, सत्तांधांच्या धृतराष्ट्री मनोवृत्तीच्या कळपात सामील व्हायचे? 'चॉईस इज आवर्स...'

९८६०२९६१३१
(लेखक विचारवंत आणि माजी प्राचार्य आहेत)

# रविवारची पत्रे

## ज्येष्ठ नागरिक कौटुंबिक समस्या

'ज्येष्ठ नागरिक कौटुंबिक समस्या की समाधान' अशी चर्चा नेहमीच ऐकण्यात येते. १ ऑक्टोबर ज्येष्ठ नागरिक दिन आहे. एकत्र कुटुंब पद्धतीत राबता असल्याने मुलांना ज्येष्ठांची देखभाल करणे सहज शक्य होते. आता काळ बदलला आहे. नोकरी-व्यवसायामुळे विभक्त कुटुंब पद्धतीचा प्रघात आला. दोघंही कामानिमित्त बाहेर जातात. अशावेळी ज्येष्ठांकडूनच संस्कार मुलांवर घडत असतात. शुभम् करोति, रामरक्षा यातून आदर निर्माण होतो. आजी-आजोबांचे सहवासाचे हे फलित निश्चित समाधानाचे प्रतीक आहे. घरातील सदस्यांनी ज्येष्ठांना समजून घ्यायला हवं. आजी-आजोबांमध्ये आणि नातवांमध्ये विशेष (नैसर्गिक) जवळीक असते. तथापि, आजारपण सांगून येत नाही. दवाखाना घर आणि नोकरी यात तारेवरची कसरत होते. 'हेल्पेज इंडिया'सारख्या संस्था उपलब्ध असतात. आई-वडिलांची जबाबदारी मुलांवर असते; पण ते एक ओझे न मानता सदस्यातील संवाद, खेळीमेळीच्या वातावरणात त्या जबाबदारीचे निर्वाहन करावे. जेणेकरून निकोप वातावरण राहील. उच्च पदावरील मुलं पैसे भरून वृद्ध आई-वडिलांची रवानगी वृद्धाश्रमात करून जबाबदारी पार पाडल्याचा आव आणतात. प्रेमाच्या स्पर्शाची भूक त्यांना असते. घरात निकोप वातावरण असेल तर समाधान नक्कीच राहील. कुटुंबात एकी, परस्पर आदरभाव, प्रेमभावना आणि एकमेकांना समजून घेण्याची सचोटी हे नितांत गरजेचे आहे. आई-वडील आपल्या इच्छांना मुरड घालून मुलांना उच्च शिक्षण देतात. त्यांच्या यशात, आनंदात आपला आनंद मानतात, याची जाणीव मुलांनी ठेवली व प्रेमाने संवाद साधला तर समाधान आणि समाधानच राहील. जे आपण पेरू तेच उगवते. योग्य संस्काराचे शिंपण करून संस्कारक्षम पिढी निपजते. आई-वडिलांचे घरातील ज्येष्ठांशी वागणे कसे आहे, याचे सूक्ष्म निरीक्षण मुले करीत असतात. त्यामुळे आई-वडिलांनी आपापसातील वाद, मतभेद, ज्येष्ठांसंबंधित तक्रारी मुलांसमोर करू नये. ज्येष्ठांना आपण मान दिला तर मुलांची ही आदर भावना वाढीस लागते. विभक्त कुटुंब पद्धतीने किंवा मुलं जरी परदेशी असतील तरी ज्येष्ठांना अडचणी आणि समस्या होऊ शकतात. त्यांच्या हक्कासाठी, समस्यांसाठी युनोने उपाय शोधला. ६० वर्षे वयाच्या लोकांना ज्येष्ठ नागरिक संबोधण्यात यावं, असं १९७५ साली ठरलं. १ ऑक्टोबर जागतिक ज्येष्ठ नागरिक दिन म्हणून पाळण्यात येतो. व्यक्तिपरत्वे, कुटुंबपरत्वे ज्येष्ठ नागरिक ही कौटुंबिक समस्या किंवा समाधान ठरू शकते. कोणाच्या बाबतीत ती समस्या तर कोणाच्या बाबतीत ती समाधान अर्थात हे त्या त्या वेळेच्या परिस्थितीवर अवलंबून राहील.

**प्रांजली सरपटवार**/९५०३४०११४४

## पावसाचे येणे आणि जाणे...

पावसाळ्यात पाऊस पडण्याची प्रतीक्षा मनुष्यच नाही तर नदी-नाले, झाडे-पहाड, रस्ते-पूल पण करतात. ही प्रतीक्षा पावसाला पाहवत नाही. पाऊस जाणतो की, मी न पडल्यामुळे या सर्वांच्या मनावर काय परिणाम होत असेल यासाठी पाऊस पडतो व सर्वांना चिंब भिजवतो. सर्वत्र आनंदीआनंद होतो. लहान मुले काय, तरुण काय म्हातारी माणसे काय की शेतकरी काय, सर्वांच्या नजरा आकाशाकडे असतात. पावसाच्या लहान लहान सरींमुळे निसर्ग ओलेचिंब होऊन आपल्या नवीन रूपाकडे खुशीने पाहतो. शेतकरी एवढे आनंदी होतात की ते आपली मागणी-धरणे-आंदोलने या आनंदामध्ये विसरून जातात. देशाच्या उत्तरी भागात पावसाच्या येण्याच्या खुशीमुळे तिथली पहाड-पर्वत हालचाल करतात, त्यामुळे भूस्खलन होते. पहाड तुटू लागतात. पावसाचे पाणी नदींना इतका आनंद देतात की नद्या विशाल रूप धारण करून वाहू लागतात; ज्यामुळे घरे-गाव-शहर नद्यांच्या वेगवान धारेबरोबर वाहू लागतात. मोठमोठी झाडे, लहान लहान झुडपी मुळापासून उखडून खाली पडतात व नदीबरोबर वाहू लागतात. बिचाऱ्या पक्ष्यांची घरे पावसामुळे पडून जातात व पाण्याबरोबर वाहू लागतात त्यामुळे ते दुःखी व चिंताग्रस्त होतात. पावसाचे विक्राळ रूप तुटणारी पहाड धाराशायी होणारी झाडे त्यांची काही मदत करू शकत नाही. पावसाच्या आगमनाने शहराच्या गल्ल्या-रस्ते-चौक पाण्याबरोबर स्वतः वाहत जातात. जेव्हा पाऊस बंद होतो तेव्हा लोक रस्ता शोधू लागतात. त्यांना कोण सांगणार की पावसाच्या पाण्याच्या उत्कट प्रेमाने त्यांना आपल्याबरोबर वाहून नेले. रस्त्यांना इतका आनंद होतो की, पावसाच्या पाण्याला एकत्रित करून त्याला नदीचे रूप देऊन नगरवासीयांना नावेने मोफत सैर करायला संधी देतो. नवीन बनलेले नदीवरील पूल मुसळधार पावसामुळे आपल्या तरुणपणाच्या दोषात पावसाच्या पाण्याला धरून ठेवतात व पाण्याच्या तीव्र वेगामुळे पडून जातात, वाहून जातात.

**मधुसूदन भावे**/७६२०६२९७२८

## असंसदीय भाषेचा वापर

शब्द हे शस्त्र आहे असे म्हणतात. अनेकदा आपण अपशब्द वापरून दुसऱ्याला दुखावतो, अपमान करतो तेव्हा दुसऱ्या व्यक्तीला ते शब्द शस्त्रासारखेच जिव्हारी लागतात. राजकारणात काम करताना जिभेवर साखर आणि डोक्यावर बर्फ ठेवायला शिकले पाहिजे. मान दिला तर मान मिळतो. अपमान केला तर अपमान मिळतो. हीच जगाची रीत आहे. कॉंग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खडगे यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदींना पत्र लिहिले आहे, भारतीय जनता पार्टी आणि त्यांच्या सहयोगी पक्षाच्या नेत्यांद्वारा राहुल गांधींना आपल्या विधानांनी लक्ष्य करत आहे आणि देशाच्या भवितव्यासाठी हे कसे घातक आहे, हे त्यात म्हटले आहे. केंद्र सरकारमधील रेल्वे राज्यमंत्री असलेले, भाजपाशासित उत्तरप्रदेशमधील मंत्री, लोकसभेचे विरोधी पक्षनेते राहुल गांधींना नंबर एक आतंकीवादी म्हणून संबोधले तर महाराष्ट्रातील शिवसेना आमदारांनी तर यापुढे जाऊन राहुल गांधींबद्दल असंसदीय विधान केले आहे. असे म्हणतात, आपल्यास आपली पाठ दिसत नाही. स्वतः कॉंग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खडगे यांनी गुजरातमधील निवडणूक प्रचारादरम्यान नरेंद्र मोदींबाबत अपशब्द वापरले होते. पंतप्रधान मोदी यांची तुलना रावणाशी केली होती. कॉंग्रेस पक्षाच्या सर्वेसर्वा सोनिया गांधी यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदींना 'मौत का सौदागर' म्हणून संबोधले होते. कॉंग्रेस पक्षाचे झारखंड येथील नेते आणि माजी केंद्रीय मंत्री सुबोधकांत सहाय मोदींबाबत असंसदीय शब्दाचा एकेरी वापर केला होता. दिल्ली येथील जंतरमंतर येथे राहुल गांधी यांची ईडी चौकशीविरोधात सत्याग्रह आंदोलनादरम्यान त्यांनी मोदी यांची तुलना हिटलरशी केली होती. याशिवाय असभ्य भाषेचा वापर केला होता. राहुल गांधी यांनी 'चौकीदार चोर है' ही घोषणा करून टाकली होती. त्यांनी अनेकदा असंसदीय भाषा वापरली होती. कॉंग्रेस पक्षाचे नेते दिग्विजयसिंह तसेच मणिशंकर अय्यर यांची विधाने आठवा. कॉंग्रेस पक्षाचे नवनियुक्त उत्तरप्रदेशातील खासदारांनी पंतप्रधान नरेंद्र मोदींबद्दल लोकसभा काळात असंसदीय शब्दाचा वापर करत विधान केले होते. त्याबद्दल त्यांना तुरुंगवास झाला होता. अशी कित्येक उदाहरण सांगता येईल. विरोधक पंतप्रधान नरेंद्र मोदींबद्दल वाट्टेल ते बोलत असतात, पण या शब्दाचा वापर ते ढालीसारखा करून विरोधकांना प्रतिउत्तर देतात. पण आजपर्यंत कधीही आपला तोल ढळू दिल्याचे दिसले नाही. याबाबतची तक्रार स्वतः पंतप्रधान असताना तरी कोणाकडे करणार. एकेकाळी राजकारणात बोलताना राजकीय संस्कृती जपली जायची; काळानुसार त्याला मर्यादा आल्या आहेत. कारण आपल्याकडे जनतेला सांगण्यासारखे काही नसेल तर राजकीय नेते मग व्यक्तिशः टीकाटिप्पणीवर उतरतात, हे आजच्या राजकारणातील मुख्य सूत्र झाले आहे.

**अविनाश देशपांडे**/९२८४६७९६२३

## तपश्चर्येला न्याय मिळणार?

पद्मश्री शंकरबाबा पापळकर यांच्या निस्वार्थ व समर्पण भावनेने सुरू असलेल्या कार्याची अखेर केंद्र सरकारने दखल घेतली, हे वाचून खूप आनंद व समाधान झाले. मागील अनेक वर्षांपासून अचलपूर येथील वझ्झर आश्रमात अनेक बेवारस, बेसहारा, अपंग व दिव्यांग बालकांचे मातृत्व भावनेने संगोपन करीत त्यांना सोबतच पितृत्वाचा आधार देत पद्मश्री शंकरबाबा यांनी माणुसकीचा एक नवीन आयाम निर्माण केला आहे. खरं तर शंकरबाबांचे कार्य बघता त्यांना बऱ्याच आधी पद्मश्री हा पुरस्कार मिळायला हवा होता. परंतु, त्यांनीच कोणताही पुरस्कार किंवा डोनेशन घ्यायचे नाकारले. पण म्हणतात न की 'मोदी है तो मुमकिन है.' शेवटी मोदींच्याच पुढाकाराने त्यांनी सरकारच्या सामाजिक न्याय विभागाला शंकरबाबांचे मन वळवण्यास व त्यांच्या कार्याची प्रेरणा इतरांना मिळावी व त्याचा विस्तार व्हावा, या दृष्टीने प्रयत्न करायला लावून व खासदार डॉ. अनिल बोंडे यांनी विशेष प्रयत्न करून या वर्षीच्या पद्म पुरस्कार सोहळ्यात शंकरबाबा यांना पद्मश्री पुरस्कार स्वीकारण्यास तयार केले. पद्मश्री पुरस्कार घोषित होताच शंकरबाबांच्या कार्याची चर्चा होऊ लागली व अनेक तज्ज्ञ, सरकारी, गैरसरकारी संस्था वझ्झर येथे भेट देऊन प्रत्यक्ष पाहणी करू लागल्या. वास्तविक ज्या विपरीत परिस्थितीतून शंकरबाबा यांनी हा आश्रम सुरू केला ते फार भीषण वास्तव आहे. जन्मजात बालकांना कचऱ्याच्या ढिगाऱ्यातून गंभीर अवस्थेत उचलून आणणे, आई-वडिलांनी अपंग बालक जन्माला आले म्हणून त्याला मंदिराच्या पायऱ्यांवर सोडून दिले, अशा अनेक हृदय पिळवटून टाकण्यासारख्या प्रसंगातून शंकरबाबा यांनी आपली तपश्चर्या प्रारंभ केली. अशा मुला-मुलींना सांभाळलं, मोठे केलं, शिकवलं, अनेकांना आपल्या पायावर उभं केलं, स्वतःचे नावं त्यांचे वडील म्हणून दिलं, काही मुलींची लग्न लावून दिली. स्थानिक प्रशासनाची त्यांना मदत मिळत होती, परंतु त्यांनी आपल्या कामाचा गवगवा नाही केला. यासाठी त्यांनी अनेक संस्था, व्यक्तींनी देऊ केलेली आर्थिक मदत देखील अनेकदा नाकारली. शेवटी त्यांनी आपल्या वाढत्या वयाची व वयाप्रमाणे होणारे व्याधी, आजार इत्यादींचा विचार करून आणि हे कार्य पुढे सुरू राहावे, यादृष्टीने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासोबत भेटीदरम्यान वझ्झरसारखे कार्य देशभर चालावं, अशी इच्छा प्रकट केली. त्याच अनुषंगाने खासदार डॉ. बोंडे यांनी हा मुद्दा राज्यसभेच्या अधिवेशनामध्ये उचलून धरला. वर्तमानपत्रात वाचल्याप्रमाणे यादृष्टीने वझ्झर 'मॉडेल' देशभरात लागू करण्याच्या हालचाली सुरू झाल्या आहेत. त्याचे कायदेशीर रूप येण्यास किती काळ लागेल हा विषय वेगळा आहे. परंतु, शंकरबाबा यांच्यासारखा कर्मवीर, तपस्वी, निस्वार्थ, समर्पण टिकवून एक तपश्चर्या करण्याच्या दृष्टीने अशा बेवारस बालकांचे शोषण होऊ नये, हेच ध्येय पूर्ण करण्यासाठी झटणारा माणूस मलातरी वाटतं की दुसरा होणे नाही. आता 'वझ्झर मॉडेल' म्हणून संपूर्ण देशभरात लागू करून किती यशस्वी होईल, हे काळच ठरवेल. पण शंकरबाबांच्या कार्याची दखल उशिरा का होईना सरकार दरबारी घेतली गेली हे पण काही थोडे थोडके नाही.



अजून एक गोष्ट नमूद करावीशी वाटते की पद्मश्री शंकरबाबा गेल्या अनेक वर्षांपासून एक कायदेशीर लढाई लढत आहेत. ती अशी की, कायद्यानुसार वयाची १८ वर्षे पूर्ण झाल्यानंतर या आश्रमातील मुलांना तिथे ठेवू शकत नाही. मग ही अशी मुलं ज्यांना स्वतःचे काहीच करता येत नाही त्यांनी जावे कुठे? ही वयोमर्यादेची कायद्याची अट शंकरबाबा यांना अस्वस्थ करते. ही अट शिथिल करून १८ वर्षांवरील मुला-मुलींना (असहाय, अपंग, बेसहारा, बेवारस, दिव्यांग) त्यांच्या सम्मतीने आश्रमात राहू द्यावे, ही अगदी रास्त मागणी असून शासनाने त्याची विशेष तरतूद करावी. केंद्र सरकारने सहानुभूतीपूर्वक विचार करून पद्मश्री शंकरबाबांची ही इच्छा पूर्ण करून त्यांना न्याय मिळवून द्यावा. खा. डॉ. बोंडे यांचे आभार मानत त्यांना पण ही विनंती की आश्रमातील मुलांच्या अडचणीप्रमाणे कायद्यात योग्य तो बदल करण्यात शंकरबाबा यांच्या प्रयत्नाला यश मिळवून देण्यात पुढाकार घ्यावा. शेवटी एवढेच म्हणायचे आहे की, वझ्झर हे काही एक मॉडेल नाही, ती एक तपश्चर्या आहे, अशा सेवेला जे समर्पण , त्याग, निस्वार्थ भाव व अशा मुलांसाठी आपले आयुष्य बाजूला ठेवून आपले सर्वस्व त्यांच्या सेवेत खर्ची घालू शकणारा व्यक्तीच हे करू शकतो. पद्मश्री शंकरबाबा यांच्या कार्यास सलाम व वझ्झर मॉडेल म्हणून न स्वीकारता ती तपश्चर्या अंगीकारावी.

**राजीव दारव्हेकर**/९०९६३२२२००

## कॉंग्रेस कुठे चालली आहे?

कॉंग्रेसची सूत्रे शहरी नक्षलवादी आणि तुकडे तुकडे टोळीच्या हातात गेली आहेत, असा आरोप पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काल वर्ध्यातील सभेमध्ये केला आहे. पंतप्रधान मोदींच्या या आरोपात तथ्य आहे. हे वक्तव्य त्यांनी उथळपणे केलेले नाही तर त्याला काही पृष्ठभूमी आहे. २०१४ सालापासून कॉंग्रेसच्या विचारसरणीत कमालीचा बदल झाला आहे. भाजपाच्या राजकीय विचारसरणीला विरोध, भाजपाला विरोध एवढेच नव्हे तर पंतप्रधान नरेंद्र मोदींना विरोध इथवर कॉंग्रेसचे राजकारण स्वीकारार्ह होते. नव्हे ती त्यांची जबाबदारी आहे, त्यांचा हक्क आहे. जनतेनेच त्यांना विरोधी पक्षाची जबाबदारी दिली आहे. असा विरोध करताना त्याचा पाया देशहिताचा असावा, ही किमान अपेक्षा आहे. देशहितासाठी विरोध होत असेल तर ते जनतेलाही जाणवायला हवे. राहुल गांधी आणि कॉंग्रेसच्या नेत्यांनी काही सोयीस्कर असे (गोड) गैरसमज करून घेतले आहेत. आपण देशापेक्षा मोठे आहोत, आपला परिवार हा राजपरिवार आहे, आपण या देशाचे अनभिषिक्त सुलतान आहोत, या देशावर राज्य करण्याचा अधिकार केवळ आपल्यालाच आहे आणि या देशातील जनता आपली पारंपरिक गुलाम आहे, असे स्वातंत्र्यप्राप्तीपासूनच गांधी-नेहरू परिवार आणि कॉंग्रेसच्या नेत्यांना वाटत आले आहे. या देशात सूर्य उगवेल तो आपल्याच कोंबड्याने बांग दिल्यानंतर, असेही त्यांना वाटते आहे. आपल्याला या देशात काहीही करण्याचा निसर्गदत्त अधिकार आहे आणि त्याबद्दल आपल्याला कधीही, कोणीही, काहीही विचारू शकत नाही, असाही त्यांचा गैरसमज झाला आहे. कॉंग्रेसच्या नेत्यांची देश-विदेशातील वक्तव्ये, त्यांच्या राजकीय हालचाली, त्यांच्या भेटीगाठी बघता या विरोधामध्ये देशहिताचा मागमूसही दिसत नाही. भाजपा आणि नरेंद्र मोदींना विरोध करता करता आपण देशहिताचा विरोध करू लागलो आहोत, हे कॉंग्रेसच्या नेत्यांच्या गावीही नाही. लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी त्यांच्या परदेश दौऱ्यात सातत्याने भारतविरोधी वक्तव्ये जाहीरपणे करत असतात. विदेशातील भारतविरोधी शक्तींच्या गाठीभेटी घेण्याचाही आरोप त्यांच्यावर नेहमीच होत आला आहे. हे खरे असेल तर केंद्र सरकार त्यांच्याविरुद्ध कायदेशीर कारवाई का करत नाही, हा प्रश्न जनतेच्या मनात नेहमीच येतो.

आताची कॉंग्रेस महात्मा गांधींची कॉंग्रेस आहे, असे शुद्धीवर असलेला कोणताही माणूस म्हणू शकणार नाही. २०१४ पूर्वीचा भारत आणि त्यानंतरचा भारत यातील फरक स्पष्टपणे दिसून येत आहे. यात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या धोरणांचा, अपार कष्टांचा, मंत्रिमंडळातील त्यांच्या सहकारी मंत्र्यांचा सिंहाचा वाटा आहे. तरीही कॉंग्रेसच्या नेत्यांनी गेल्या दहा वर्षांत पंतप्रधान नरेंद्र मोदींबद्दल एकही चांगला शब्द उच्चारला नाही. उलट मोदींच्या कार्यात कोलदांडे घालण्याचे पाप राहुल गांधी आणि त्यांचे नेते हेतुपुरस्सर करत आहेत. कॉंग्रेसधार्जिणी प्रसारमाध्यमे आणि पत्रकारसुद्धा कॉंग्रेसच्या नेत्यांच्या आरोपांना उथळपणे प्रसिद्धी देऊन जनतेची दिशाभूल करत आहेत. नरेंद्र मोदींची बदनामी करण्यासाठी कॉंग्रेस आणि इतर विरोधी पक्ष कोणत्याही थराला जाऊ शकतात, हे अनेकदा दिसून आले आहे.

देशात हिंदूधर्मीयांमध्ये जातीय फुट पाडण्यासाठी राहुल गांधींनी कंबर कसली आहे. देशातील मोदीविरोधी नेतेही या कार्यात आपापली भूमिका निभावत आहेत. काही प्रसारमाध्यमेसुद्धा आगीत तेल ओतण्याचे काम करीत आहेत. भारतात अस्थिरता, अराजकता पसरवण्याचा हा उघड प्रयत्न आहे. हे सगळे प्रकार पूर्वीच्या काळात नव्हते. हे सगळे दिसत असूनही केंद्र सरकार शांतपणे बघत का बसले आहे, हेही कळत नाही. स्व. पंतप्रधान इंदिरा गांधी यांना 'दुर्गा' संबोधणारे अटलजी कुठे आणि सत्तेसाठी भारतविरोधी शक्तींशी हातमिळवणी करण्याचा आरोप होत असलेले राहुल गांधी कुठे? लोकशाही मार्गाने सत्ता मिळत नाही, असे लक्षात आल्यानंतर कॉंग्रेसने आता हे आत्मघातकी पाऊल उचलले आहे. याने कॉंग्रेसचा फायदा होणे तर दूरच पण भारतीय जनतेसमोर मोठे संकट उभे राहण्याची शक्यता निर्माण झाली आहे. कॉंग्रेसमधील शुद्धीवर असलेल्या नेत्यांनी याबाबत आत्मपरीक्षण करून पक्षाची प्रतिमा सुधारण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत. तसे केले नाही तर कॉंग्रेसच इतिहासजमा होईल.

**शिवराम वैद्य**/९८५०५१८०१८

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समूह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# अंबाजोगाई-लातूर रोडवर भीषण अपघात

## स्विफ्ट कारमधील चौघेही जागीच ठार

**तभा वृत्तसेवा**
**अंबाजोगाई दि.२२ सप्टेंबर**

बीड- अंबाजोगाई लातूर रोडवर नांदगाव पाटीजवळ रविवारी पहाटे स्विफ्ट कार आणि कंटेनरचा भीषण अपघात झाला. या अपघातात स्विफ्ट कारमधील चौघेही जागीच ठार झाले. सर्व मयत लातूर जिल्ह्यातील चाकूर तालुक्यातील जगलपूर येथील आहेत.



शनिवारी रात्री उशीरा जगलपूर येथील चार जण स्विफ्ट कारमधून (एमएच २४ एएस ६३३४) छत्रपती संभाजीनगरला निघाले होते. रात्री सुरू असलेल्या मुसळधार पावसात अंबाजोगाई लातूर रोडवरील पाचपीर दर्गा जवळ त्यांच्या कारची आणि समोरून येणाऱ्या कंटेनरची (एमएच १२ एमव्ही ७१८८) जोरदार धडक झाली. हा अपघात रविवारी मध्यरात्री १ च्या सुमारास झाला. यावेळी कार कंटेनरच्या खाली घुसल्याने कारचा चुराडा झाला आणि आतील चौघांचा जागीच मृत्यु झाला.मयताचे नावे १) आत्माराम माधवराव बानापुरे वय ५४ वर्षे १० जगळपूर ता.चाकूर,२) माधव व्यंकटराव खलंग्रे -वय ५८ वर्ष,३)सौदागर केशव कांबळे वय ५० वर्ष,४)शिवराज शंकरराव डोम- वय ५१ वर्ष रा. बालाजी मंदिराजवळ लातूर

अपघाताची माहिती मिळताच बर्दापूर पोलीस ठाण्याचे एपीआय ससाणे, पीएसआय यादव, सहा.फौजदार बिडगर, हेड कॉन्स्टेबल शेख, कर्मचारी यांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. सर्व मृतदेह अंबाजोगाईच्या शासकीय रुग्णालयात हलविण्यात आले आहेत.अपघाताच्या वेळी मुसळधार पाऊस सुरू होता, त्यामुळे चालकांना समोरून येणाऱ्या वाहनाचा अंदाज न आल्याने अपघात झाला असावा अशी शक्यता वर्तविण्यात येत आहे.दरम्यान, लातूरहून अंबाजोगाईकडे येणारा चौपदरी रस्ता बर्दापूरच्या पुढे दुपदरी करण्यात आला आहे. अचानक निमुळता झालेल्या या रस्त्याने आतापर्यंत शेकडो लोकांचे बळी घेतले आहे.त्यामुळे हा रस्ता लोखंडी सावरगावपर्यंत चौपदरी करावा अशी मागणी पुन्हा जोर धरू लागली आहे.

# भविष्यातील संधी ओळखून प्रयत्न करा-जयदत्त क्षीरसागर

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२२ सप्टेंबर**

सर्व साधारण सभेच्या माध्यमातून आज सर्वांना एकत्र येण्याची संधी मिळाली ,संस्थेचा लेखाजोखा सर्वांना कळावा यासाठी हा दिवस महत्वाचा असतो. लोकशाहीच्या राज्यात प्रत्येकाला स्वतंत्र अधिकार असतात, तो अधिकार कुठे? कसा? आणि का वापरायचा हे सर्वांनी समजून घेतले पाहिजे. गट-तट, जात-पात, हेवे-दावे दूर करून भविष्याची संधी ओळखून प्रयत्न करावा, येणारे दिवस गुणवत्तेचे आहेत. गुणवत्ता बघूनच निवड होणार आहे असे प्रतिपादन माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी व्यक्त केले.



रविवार दि.२२ रोजी पेठ बीड भागातील रविराज मंगल कार्यालयात श्री गजानन नागरी सहकारी बँक लि.बीड आणि आदर्श शिक्षण संस्था कर्मचारी सहकारी पतपेढीच्या ४१ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर हे होते. यावेळी जगदीश काळे, अरुण डाके, दिनकर कदम, विलास बडगे , नानासाहेब काकडे, डॉ.राजा मचाले, डॉ.अरुण भस्मे, सखाराम मस्के, राजू मुनोत, सुभाष क्षीरसागर, नगरसेवक मुखीद लाला, विलास विधाते, अर्जुन बहिरवाळ, सुग्रीव रसाळ, अच्युत मोरे, विजय सरवदे, नगरसेवक जमील भाई, पाशा भाई, गुलाब जहांगीर, सर्जेराव खटाने, ॲड.शेख खाजा, चंद्रकांत पेंढारे, कल्याण खांडे, अरुण बोंगाणे, दादासाहेब मुंडे, सुधाकर मिसाळ, शरद ढाकणे, राजेश तांगडे, प्रा. दत्तात्रय आघाव यांची प्रमुख उपस्थिती होती.

# २९ सप्टेंबर रोजी मोंढा मैदान येथे कार्यकर्त्यांचा निर्धार महामेळावा घेऊन विधानसभेचे रणशिंग फुंकणार-मोहनराव जगताप

**तभा वृत्तसेवा**
**माजलगाव दि.२२ सप्टेंबर**

महाराष्ट्रात आगामी होणाऱ्या विधानसभा निवडणुकीचे बिगुल केव्हाही वाजवू शकते या अनुषंगाने छत्रपती सहकारी साखर कारखान्याचे व्हा. चेअरमन मोहनराव जगताप यांनी माजलगाव, धारूर व वडवणी येथील प्रमुख कार्यकर्त्यांची माजलगाव येथील त्यांच्या संपर्क कार्यालयात बैठक आयोजित केली. या बैठकीवेळी उपस्थित असलेल्या अनेक कार्यकर्त्यांनी आपले मत व्यक्त करत असताना मोहनराव जगताप यांनी वरिष्ठ नेत्यांच्या कोणत्याही दबावांमध्ये न येता आगामी विधानसभा लढवावी अशी भावना व्यक्त केली. तसेच प्रत्येक वेळा मोहनराव जगताप यांच्या कार्यकर्त्यांनी दुसऱ्यांसाठी काम करायचे आमदार करायचे परंतु मोहनराव यांना संधी कधी मिळणार, वरिष्ठ नेत्यांचा मान ठेवून निवडणुकीमध्ये माघार किती वेळेस घ्यायची आणि कार्यकर्त्यांनी मतदारसंघ बाहेरील उमेदवारासाठी काम कधीपर्यंत करायचे अशी भावना व्यक्त करत मोहनराव जगताप यांना निवडणुकीच्या मैदानात उतरावे असे मत कार्यकर्त्यांनी याठिकाणी व्यक्त केले.

यावेळी मोहनराव जगताप पुढे बोलताना म्हणाले मी मागील तीस वर्षापासून राजकारण करतो मागील चार टर्म मला दुसऱ्याला आमदार करण्यासाठी फिरावे लागले मला आज ना उद्या न्याय मिळेल या भावनेने मी दुसऱ्यांचे काम करीत राहिलो पण आता आगामी येणाऱ्या विधानसभेच्या निवडणुकीत मी जनतेसमोर जाणार असून मी मतदारसंघात पूर्ण वेळ उपलब्ध असून नेहमी मतदारसंघातील अडी अडचणी सोडविण्यासाठी तत्पर असतो. येणाऱ्या विधानसभा निवडणुकीत माझा पक्ष कोणताही असो अथवा अपक्ष लढण्याची वेळ आली तरी मी विधानसभा निवडणूक लढविणार असल्याचे या बैठकीत दरम्यान कार्यकर्त्यांना मोहनराव यांनी सांगितले.

तसेच पुढे बोलताना म्हणाले येत्या २९ सप्टेंबर रोजी माजलगाव येथील जुना मोंढा मैदान येथे कार्यकर्त्यांचा मोठ्या प्रमाणावर निर्धार महामेळाव्याचे आयोजन करून या ठिकाणी विधानसभेचे रणसिंग फुंकणार

### माजलगाव येथे प्रमुख कार्यकर्त्यांची बैठक घेऊन केली घोषणा

असल्याचे या बैठकीवेळी त्यांनी घोषणा केली. या बैठकीला माजलगाव धारुर व वडवणी येथील प्रमुख कार्यकर्ते पदाधिकारी यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# बीड तालुका स्तरीय खो-खो स्पर्धेत हिवरापाहाडी हायस्कूलचे सुयश



**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२२ सप्टेंबर**

महाराष्ट्र राज्य क्रिडा युवक सेवा संचालनालय आणि जिल्हा क्रीडा अधिकारी बीड यांच्या संयुक्त विद्यमाने क्रिडा स्पर्धा सुरू आहेत बीड तालुका शालेय खो खो क्रिडा स्पर्धा दि १९सपटेबर रोजी सैनिकी शाळा च्या मैदानावर घेण्यात आल्या वय १४ वर्ष मुले वयवगटामधये हिवरापाहाडी हायस्कूल विरूध सैनिकी विघालय बीड यांच्या मध्ये अंतिम खो खो चा सामना झाला यात हिवरापाहाडी हायस्कूल ने प्रथम क्रमांक पटकावला त्यांच्या या यशाबद्दल सर्व खेळाडू आणि क्रिडा शिक्षक काचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे या बद्दल अधिक माहिती अशी की महाराष्ट्र राज्य क्रिडा युवक सेवा संचालनालय आणि जिल्हा क्रीडा अधिकारी बीड यांच्या संयुक्त विद्यमाने क्रिडा स्पर्धा सुरू आहेत दि १९ सप्टेंबर रोजी सैनिकी विघालय बीड येथील मैदानावर वय१४ वर्ष वयोगटातील मुलांच्या बीड तालुका स्तरीय शालेय खो खो क्रिडा स्पर्धा घेण्यात आल्या त्यामध्ये सैनिकी विघालय बीड विरूद्ध हिवरापाहाडी हायस्कूल यांच्या मध्ये अंतिम सामना झाला त्यात हिवरापाहाडी हायस्कूल ने प्रथम क्रमांक पटकावला त्यांच्या या यशाबद्दल संस्थेचे सचिव डॉ.भारतभूषण क्षीरसागर डॉ दिपाताई क्षीरसागर डॉ.योगेश क्षीरसागर यांनी मुख्याध्यापक घनशाम झोडगे क्रिडा विभाग प्रमुख चंद्रकांत लेडाळ पवार शिंदे पावले व सर्व शिक्षक खेळाडूंचे अभिनंदन केले.

# मागील दोन हंगामात आर्थीक समस्यांचा मुकाबला करुन ऊसाला हमीभावा पेक्षा जास्त भाव दिला- माजी मंत्री आ.प्रकाशदादा सोळंके

**तभा वृत्तसेवा**
**माजलगाव दि.२२ सप्टेंबर**

लोकनेते सुंदररावजी सोळंके साहेब यांनी ३५ वर्षापुर्वी लावलेले हे साखर कारखान्याचे रोपटे आज विशाल वटवृक्षात रुपांतरीत झाले आहे. या कारखान्याने कायम शेतक-यांच्या हिताचाच विचार केलेला असुन मागील दोन हंगामात राज्यात व देशातील साखर कारखानदारी आर्थीक संकटात असतानाही आपल्या कारखान्याने तोटा सहन करत शासनाने ऊसाला ठरवलेल्या हमीभावापेक्षा जास्तीचा भाव शेतकऱ्यांच्या ऊसाला देवुन, शेतकऱ्यांचे हित जोपासले असल्याचे प्रतिपादन कारखान्याचे जेष्ठ मार्गदर्शक तथा आ. प्रकाशदादा सोळंके यांनी व्यक्त करुन यावर्षी शेतक-यांनी आपला ऊस इतरत्र न देता आपल्याच लोकनेते सुंदररावजी सोळंके सहकारी साखर कारखान्यास देवुन सहकार्य करावे असे आवाह नही यावेळी आ. सोळंके यांनी केले. ते कारखान्याच्या वार्षिक सभेत बोलत होते.

लोकनेते सुंदररावजी सोळंके सहकारी साखर कारखान्याची ३५ वी अधिमंडळाची वार्षिक सर्वसाधारण सभा काल रविवार दि.२२ सप्टेबर, २०२४ रोजी दुपारी १.०० वाजता कारखाना कार्यस्थळावर खेळीमेळीच्या व आनंदाच्या वातावरणात पार पडली. या सभेचे अध्यक्षस्थानी चेअरमन श्री. विरेंद्रदादा सोळंके होते. तर कारखान्याचे जेष्ठ संचालक आ.श्री. प्रकाशदादा सोळंके, मार्गदर्शक मा.श्री. धैर्यशीलकाका सोळंके, व्हाईस चेअरमन श्री. जयसिंगभैय्या सोळंके यांचेसह सर्व संचालक मंडळ व्यासपीठावर उपस्थीत होते. यावेळी चेअरमन श्री. विरेंद्रदादा सोळंके यांनी श्रध्दांजली ठरावाचे वाचन केले. तर जेष्ठ संचालक आ.श्री. प्रकाशदादा सोळंके यांनी विषयनिहाय ठरावाचे वाचन केले व त्यास सर्व सभासदांनी ठरावास टाळयाच्या गजरात मान्यता दिली. यावेळी उपस्थीतांना मार्गदर्शन करताना आ. सोळंके म्हणाले की, हा कारखाना कायमच शेतक-यांच्या हिताला प्राधान्य देत भक्कम व सक्षमपणे वाटचाल करत आहे. या कारखान्याने कधीही ऊस उत्पादकांवर अन्याय होवु दिलेला नाही. परिणामी कारखान्याने तोटा सहन केला मात्र शेतक-यांचे हित जोपले. मागील वर्षी आपले कारखान्याने इथेनॉल उत्पादन क्षमता ४५००० लिटर क्षमतेहुन १५०००० लिटर प्रतिदिन केलेली आहे. त्यातुन मिळणा-या आर्थीक उत्पन्नातुन ऊस उत्पादकांना सर्वाधिक भाव देणे शक्य झाले असते. परंतु केंद्र शासनाने अचानक सिरप व ऊस रसापासुन इथेनॉल निर्मातीस बंदी घातलेने आपल्याला इथेनॉल निर्मीतीचा प्रकल्प बंद ठेवावा लागला. त्याचा परिणाम कारखान्यास आर्थीक फटका बसला. मात्र चालु हंगामासाठी ही बंदी उठवल्याने हा निर्णय आपलेसाठी आनंदाचा असलेचे सांगत आ. सोळंके पुढे म्हणाले की, शासन ऊसाचे हमी भावात सातत्याने वाढ करीत आहे. मात्र त्या तुलनेत साखरेच्या दरात



दरवाढ न करता सन. २०२१-२२ मध्ये साखरेचे दर जे होते तेच दर आजही असलेने हा निर्णय संबंध साखर कारखानदारांसाठी तोट्याचा निर्णय असल्याचे सांगत ही परिस्थिती अवघड असुन या सर्व समस्यांना आपल्याला सामोरे जावे लागणार असल्याचेही ते यावेळी म्हणाले. आपला कारखाना शेतक-यांच्या हिताचा व हक्काचा असल्याचे गेल्या ३५ वर्षात वेळोवेळी सिध्द झाले. गेल्या वर्षी पावसाचे प्रमाण खुप कमी झाल्याने दुष्काळजन्य परिस्थिती होती त्यामुळे ऊस लागवडीचे क्षेत्र कमालीचे घटल्याने त्याचा यंदाच्या ऊस गाळपावर परिणाम होणार असुन ऊसाची कमतरता भासणार आहे. तरी ऊस उत्पादक शेतक-यांनी आपला ऊस इतरत्र न देता आपल्या हक्काच्या लोकनेते सुंदररावजी सोळंके सहकारी साखर कारखान्यास द्यावा असे आवाहनही आ. प्रकाशदादा सोळंके यांनी केले.

या वार्षीक सभेस परिसरातुन मा. सभासद, ऊस उत्पादक, तोड वहातुक ठेकेदार, विविध संस्थाचे पदाधिकारी. कार्यकारी संचालक श्री. आर. सी. बडगुजर व सर्व खातेप्रमुख, कर्मचारी, कामगार उपस्थीत होते. या सभेचे सुत्रसंचलन व आभार संचालक श्री. छगनराव जाधव यांनी केले.

**मला मिळालेला पुरस्कार मतदार संघातील जनतेला समर्पीत : आ. सोळंके**

आ.प्रकाशदादा सोळंके यांना राष्ट्रकुल संसदीय मंडळ महाराष्ट्र शासनाचा २०२०-२१ चा उत्कृष्ठ भाषण पुरस्कार नुकताच प्रदान करण्यात आला त्याबद्यल कारखान्याच्या वतीने यावेळी त्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी सत्कारास उत्तर देताना आ. सोळंके म्हणाले की, मी आपल्या आर्शीवादने गेल्या अनेक वर्षापासुन आमदार म्हणुन कार्य करत असुन या कार्यकाळात मी मतदारसंघात जलसिंचन, शैक्षणीक, आरोग्य, विज, रस्ते यासह समाज हिताचे अनेक सामाजिक कार्य केले. जनतेचे प्रश्न वेळोवळी विधिमंडळात मांडुन त्यावर आवाज उठविला याची दखल घेवुन राष्ट्रकुल संसदीय मंडळाने मला पुरस्कार जाहिर करुन देशाच्या प्रथम नागरीक श्रीमती द्रौपदी मुर्मु यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान केला. या पुरस्काराने माझेसह मतदार संघाचा गौरव झाला असुन मी हा पुरस्कार मतदारसंघातील सर्व नागरीक, शेतकरी, कष्टकरी, मजुर अधिकारी, कर्मचारी यासह मतदार संघातील सर्व जनतेस समर्पीत करतो.

# शांत, सुखी आणि आनंदी जीवनासाठी धम्माचा आश्रय घ्या: भंते संघरत्न थेरो

**तभा वृत्तसेवा**
**माजलगाव दि.२२ सप्टेंबर**

सर्वांना सगळे चांगले व्हावे असे वाटते, परंतु ते विनाकष्ट होईल अशी अपेक्षा ठेवतात. परंतु, विनाकष्ट काहीही साध्य होणार नाही. धार्मिक विधींमध्ये शॉर्टकट शोधण्याचा प्रयत्न केला जातो, परंतु धर्माच्या आवश्यक गोष्टी शॉर्टकटने साध्य होतील का? यामुळे समाजावर विपरीत परिणाम होतो. शांत, सुखी आणि आनंदी जीवनासाठी धम्माचा आश्रय घ्या. सर्वांनी धर्माला समर्पित होऊन, शुद्ध आचरण पाळावे, असा उपदेश पूज्य भंते संघरत्न थेरो यांनी धम्मदेसनेद्वारे दिला.

केसापूरी कॅम्प येथील तीर्थक्षेत्र श्रावस्ती बुद्धविहार येथे दर रविवारी बुद्धवंदना व धम्मदेसनेचा कार्यक्रम नियमितपणे आयोजित केला जातो. आज, दिनांक २२ सप्टेंबर रोजी, बुद्धवंदना आणि धम्मदेसना कार्यक्रम पार पडला. या प्रसंगी सद् धम्म सेवा संघाचे माजी अध्यक्ष भागवतराव उघडे गुरुजी यांच्या चवथ्या स्मृतीदिनानिमित्त त्यांच्या कार्यकर्तृत्वाला उजाळा देण्यात आला आणि सद् धम्म सेवासंघाचे सदस्य आणि उपस्थितांनी त्यांना श्रद्धांजली अर्पण केली. कार्यक्रमाचे अध्यक्ष सदाशिव भालेराव यांनी माजी अध्यक्ष उघडे गुरुजी यांच्या धम्मकार्यातील योगदानाबद्दल गौरवोद्गार काढले. विशेषतः श्रावस्ती बुद्धविहाराच्या उभारणीत त्यांचा सिंहाचा वाटा होता, असेही त्यांनी सांगितले.

पुढे धम्मदेसनेत भंते संघरत्न यांनी बौद्ध अनुयायांना पंचशील आणि अष्टांगिक मार्गाच्या पालनाचे आवाहन केले. या मार्गानेच मानवी जीवन हे आनंदी आणि सुखमय होऊ शकते, तसेच जास्तीत जास्त धम्म शिबिराची आवश्यकता असल्याचेही त्यांनी नमूद केले.

कार्यक्रमाला पोलिस निरीक्षक राहुल सूर्यतळ प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. त्यांनी आपल्या भाषणात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारधारेचे स्मरण करून दिले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आम्हाला बुद्ध धर्माचा विज्ञानवादी मार्ग दिला, ज्यामुळे माझे जीवन घडले, असे ते म्हणाले. तसेच, सर्वांनी दर रविवारी बुद्धविहारात येण्याचे आवाहन त्यांनी केले. उपस्थितांनी शांत आणि धर्ममय वातावरणात कार्यक्रमाचा लाभ घेतला.

सूत्रसंचलन ड. दशरथ मकसरे यांनी केले. आभार जी एन घनघाव यांनी मानले. यावेळी पांडुरंग जाधव, भगवानराव सातपुते, एन. जी शिनगारे, सोपान उजगरे, एम बी चांदमारे, रविकांत उघडे, धम्मपाल जावळे, विजय होळीकट्टी, लीलाताई उजगरे, अरुण नाकलगावकर, श्यामराव वाघमारे, ज्ञानोबा साळवे यांची उपस्थिती होती. तर नायब तहसीलदार सुप्रिया वक्ते, माजी नगरसेविका सुदामती पौळ, डॉ. श्रीराम खळगे, बहुजन विकास मोर्चाचे नवनाथ धाईजे , वंचितचे धम्मानंद साळवे, अंकुश जाधव, सचिन उजगरे, शिवाजी धाईजे, विलास साळवे, डॉ. भागवत साळवे, बाबासाहेब जाधव, शिवाजी ससाणे, काशिभाऊ साळवे, अनंत वाघमारे, वृंदावनी कांबळे, नवनाथ गायकवाड, पद्माकर रूचके, राज सोनवणे, प्रा. राजेश जाधव, धम्मपाल उघडे, विद्याताई निसर्गंध, बिभीषण उघडे, संपादक सुहास बोराडे, प्रशांत सातपुते, ज्योती तेजस बनसोडे, श्रीहरी मस्के, गुलाब धाईजे, एल आर मस्के, सुभाष घनघाव, श्रीपाद शिंदे, अभिजित साळवे यांच्यासह अनेक अनुयायी उपस्थित होते.

# लाडकी बहीण योजना राबविल्याने अजित पवार यांच्या आभारासाठी स्वाक्षरी मोहीम

**तभा वृत्तसेवा**
**माजलगाव दि.२२ सप्टेंबर**

लाडकी बहीण योजना राबवून शासनाकडून महिलांना आथिक मदत दिल्याने महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री अजित दादा पवार यांचे आभार मानण्यासाठी माजलगाव येथे महिलांनी स्वाक्षरी मोहीम राबविली.



राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष, जिल्हा महिला उपाध्यक्षा रेखाताई कोमटवार यांच्या साईनगर निवासस्थानी उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आणलेली माझी लाडकी बहीण योजने अंतर्गत वॉल सिग्नेचर कार्यक्रम घेतला .त्यावेळी अनेक लाभार्थी महिलांनी उपस्थिती नोंदवून व स्वाक्षरी करून अजित पवार यांचे आभार व्यक्त केले, यावेळी जिल्हा महिला उपाध्यक्षा रेखाताई कोमटवार यांच्यासह जिल्हा सरचिटणीस रेखाताई अंबुरे आणि तालुकाध्यक्ष सीमाताई तिडके यांची प्रमुख उपस्थिती होती.

## संक्षिप्त वृत्त...

### माळवे यांना राज्यस्तरीय क्रीडारत्न गौरव पुरस्काराने सन्मानीत



**सेलू,/प्रतिनिधी:** मनुष्यबळ विकास लोकसेवा अकादमी यांच्या वतीने शुक्रवारी, २० सप्टेंबर रोजी सेलू येथील नूतन विद्यालयातील क्रीडा शिक्षक गणेश शेषराव माळवे यांना राज्यस्तरीय क्रीडा रत गौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. ''राज्यस्तरीय गुणिजन गौरव महासंमेलन २०२४'' या उपक्रमात समारंभपूर्वक श्री गणेश माळवे यांना पुरस्कार प्रदान करण्यात आला. सन्मानपत्र, गौरवपदक, सन्मानचिन्ह असे पुरस्काराचे स्वरूप आहे. या बद्दल श्री माळवे यांचा शनिवारी नूतन विद्यालयात सत्कार करण्यात आला. मुख्याध्यापक संतोष पाटील, उपमुख्याध्यापक किरण देशपांडे, शिक्षक प्रतिनिधी पी.टी. कपाटे, बाबासाहेब हेलसकर , सुधीर जोशी, भगवान देवकते, अशोक लिंबेकर, संजय भुमकर, सुनील तोडकर, उपस्थित होते. गणेश माळवे यांना महाराष्ट्र शासनाच्या जिल्हा क्रीडा गुणवंत मार्गदर्शक पुरस्कार प्राप्त झाला आहे. महाराष्ट्र राज्य शारीरिक शिक्षण संघटना चार आदर्श क्रीडा शिक्षक पुरस्कार, तसेच महात्मा ज्योतिबा फुले जिल्हा आदर्श क्रीडा पुरस्कार प्रदान करण्यात आला आहे. टेनिस व्हॉलीबॉल राज्य संघटनेच्या सरचिटणीस पदावर कार्यरत आहेत. त्यांच्या मार्गदर्शनाखाली ७५ खेळाडू राष्ट्रीय स्तरावर खेळले असुन यात ३० खेळाडूंना महाराष्ट्र शासनाची क्रीडा शिष्यवृत्ती प्राप्त झाली आहे. विविध ०९ राज्य क्रीडा स्पर्धा आयोजन केले आहे.

क्रीडा सुविधा निर्माण योजनेंतर्गत व क्रीडांगण विकास योजना घेऊन क्रीडा क्षेत्रात अनेक उपक्रमात सहभागी झाले आहेत. क्रीडा क्षेत्रातील अनेक उपक्रमात सक्रिय सहभाग असतात. यांच्या कार्यावर राज्य क्रीडा रत पुरस्कार प्रदान करण्यात आला आहे.

या पुरस्कार बदल अभिनंदन अप्पर जिल्हाधिकारी डॉ.प्रताप काळे, माजी नगराध्यक्ष विनोद बोराडे, संस्थेचे अध्यक्ष डॉ.एस.एम. लोया, उपाध्यक्ष डी.के.देशपांडे, सचिव डॉ विनायकराव कोठेकर, सहसचिव जयप्रकाशजी बिहाणी, नंदकिशोर बाहेती, महेश खारकर, चंद्रशेखर नावाडे, प्रा. नागेश कान्हेकर, डी.डी. सोन्नेकर, संजय मुंढे, विविध क्रीडा संघटना, शिक्षक वृंद व कर्मचारी यांच्या वतीने करण्यात आले आहे.

### जागा सुटली म्हणून भाजपाव्दारे आनंदोत्सव साजरा- महायुतीतील जागा वाटप

**परभणी,/प्रतिनिधी:** आगामी विधानसभा निवडणूकीच्या पार्श्वभूमीवर भारतीय जनता पार्टी, शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष व अन्य घटक पक्षांच्या महायुतीतून परभणी विधानसभा मतदारसंघाची जागा भारतीय जनता पार्टीस सुटल्याचा दावा करीत पदाधिकाऱ्यांसह कार्यकर्त्यांनी शुक्रवारी परभणीतील छत्रपती शिवाजी चौकात फटाक्यांची आतिषबाजी करीत आनंदोत्सव साजरा केला.

भारतीय जनता पार्टीचे ज्येष्ठ नेते विजयराव वरपुडकर, उद्योग आघाडीचे प्रदेशाध्यक्ष प्रमोद वाकोडकर, भाजप महानगराध्यक्ष राजेश देशमुख, पार्टीचे जिल्हा सरचिटणीस तथा बाजार समिती सदस्य विलास बाबर, डॉ. केदार खटींग, बाळासाहेब जाधव, सुनील देशमुख, माजी नगराध्यक्ष कमल किशोर अग्रवाल, माजी नगरसेवक मधुकर गव्हाणे, प्रदेश कार्यकारणी सदस्य मोहन कुलकर्णी, राजेश देशपांडे, माजी नगरसेविका सौ. मंगल मुदगलकर, विजय गायकवाड, राधाजी शेळके, शिवाजीराव मवाळे, सुरेश गिरी, संजय रिझवानी, सुरेश भुमरे, अनुप शिरडकर, दिनेश नरवाडकर, अॅड. एन.डी. देशमुख, नागसेन पुंडगे, सुभाषराव आंबट यांच्यासह अन्य पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी शुक्रवारी सकाळी छत्रपती शिवाजी चौकात फटाक्यांची जोरदार आतिषबाजी केली. या आतिषबाजीने संपूर्ण परिसर दणाणला.

### लायन्स क्लबकडून महारक्तदान शिबीर

**परभणी,/प्रतिनिधी:** परभणी लायन्स क्लब परिवाराचे भिष्मपितामह माजी प्रांतपाल स्व. डॉ. के.सी. पारख यांच्या जन्म दिनानिमित्त लायन्स क्लब परिवारातर्फे २२ सप्टेंबर रोजी महाविक्रमी रक्तदान शिबीर आयोजित करण्यात आले आहे.

स्टेडिअम जवळील नूतन जिल्हा परिषदेच्या इमारतीत सकाळी ८ ते दुपारी ४ या वेळेत हे महाविक्रमी रक्तदान शिबीर होणार असून रक्तदान केलेल्या प्रत्योकाला १ लाख रुपयांचा मोफत अपघाती विमा काढून मिळणार आहे. या महारक्तदान शिबीरात रक्तदान करुन नागरीकांनी राष्ट्रसेवेत सहभाग नोंदवावा, असे आवाहन उपक्रम प्रमुख लायन्स क्लब परभणी प्रिन्सचे रितेश झांबड जैन, सहउपक्रमप्रमुख लायन्स क्लब परभणी मेनचे हैदरअली जीवानी, विजय श्रीमाळी, रिजन चेअर पर्सन तथा मार्गदर्शक प्रिया ठाकूर, झोन चेअर पर्सन शिवकुमार पुरे, झोन चेअर पर्सन तुषार मराठे, माजी रिजन पर्सन डॉ. प्रविण धाडवे, लायन्स क्लबचे अध्यक्ष पंडीत बरदाळे, लायन्स क्लब परभणी प्रिन्सचे अध्यक्ष उल्हास नाव्हेकर, लायन्स क्लब परभणी रायझिंग वुमन्सच्या अध्यक्षा पुनम मराठे, लायन्स क्लब परभणी मेनचे अध्यक्ष अरुण टाक यांनी केले आहे.

### परळीकर यांनी साकारला सामाजिक संदेश देणारा देखावा

**परभणी,/प्रतिनिधी:** मंगळमुर्ती त्रिमूर्ती नगरातील रहिवाशी महेश सुधाकरराव परळीकर यांनी गणेशोत्सवानिमित्त 'झाडे लावा झाडांचे संगोपन करा' असा सामाजिक संदेश देणारा देखावा आपल्या निवासस्थानी उभा केला आहे.

'झाडे लावा झाडांचे संगोपन करा' या संकल्पनेवर स्वहस्ते श्रीगणेश झाडं लावत असलेली, मूषकराज पाणी घालतोय अशी शाडूच्या मातीपासून पार्थिव मुर्ती तयार केली आहे. आपल्या महाराष्ट्रात पर्जन्यवृष्टी कमी आहे ती वाढविण्यासाठी जास्तीत जास्त झाडे लावून झाडाला एक वर्ष पाणी देवून संवर्धन करणे आवश्यक, प्राणीमात्रांना जीवदान देणाऱ्या या उपक्रमाला प्राधान्य देऊन मोठ्या प्रमाणावर वृक्षारोपण करण्यावर भर द्यावा लागेल. अन्यथा पुढच्या पिढीला वन्य प्राणी हे चित्रातच पाहावे लागतील. वन्यजीव राहात असलेल्या जागांवर टोलेजंग टॉवर्स उभे राहून त्यांच्या हक्काच्या जागा अतिक्रमीत होत आहेत त्यामुळे वनसंवर्धन हीच काळाची गरज आहे, अशी प्रतिक्रिया परळीकर यांनी व्यक्त केली.

तरुण भारत
कार्यालयाचा पत्ता- डॉ.लोया नेत्र रुग्णालयासमोर ढवळे यांचे निवासस्थान शिवाजी नगर, परभणी
❑ दैनिक ❑ वेबसाईट ❑ सोशल मिडिया
छोट्या जाहीराती व प्रगटनासाठी
खरेदी-विक्री-प्रॉपर्टी व वाहन/भाडेपट्टी/नोकरी विषयक/प्रवेश/ विवाह विषयक/ शैक्षणिक/ आरोग्य/ ड्रायव्हिंग स्कूल/ मोबाईल/ हॉटेल/ रेस्टॉरंट/ आईस्क्रिम पार्लर/ मसाज पार्लर/ ब्युटी पार्लर/ कागदपत्रे हरवले/ चेंज ऑफ नेम/ न्यायालयीन व धर्मादाय आयुक्त कार्यालय प्रगटने/
९४ २३३२४६६६५, ९२८४६६४४३०, ९२८४६९५५८३

# चारित्र्यावर संशय घेत पतीची मारहाण

**जिंतूर पोलीस स्थनाकात गुन्हा दाखल**

**जिंतूर,/प्रतिनिधी:** पती पासून विभक्त राहत असलेल्या पतीच्या चारित्र्यावर संशय घेत तिच्या व सोबतच्या पक्ष कार्यकर्त्यांना अश्लील मॅसेज पाठविल्याबद्दल जाब विचारण्यासाठी गेलेल्या शिवसेना शिंदे गटाच्या महिला तालुका अध्यक्षाला पतीने शिवीगाळ करून मारहाण केल्याची घटना गुरुवार दि १९ सप्टेंबर रोजी सकाळी ११:३० वाजण्याच्या सुमारास शहरातील संभाजीनगर मध्ये घडली या बाबत जिंतूर पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला आहे या बाबत शिवसेना शिंदे गट महिला तालुका अध्यक्षा अक्षता राजेश चक्कर यांनी दिलेल्या फिर्यादीत नमूद केले आहे की सात वर्षांपूर्वी त्यांचा आंतरजातीय विवाह राजेश चक्कर यांच्या सोबत झाला होता त्यांना एक मुलगी असून गत दोन वर्षा पासून त्या जिंतूरच्या राजकारणात सक्रिय आहेत.सहा महिन्यांपासून पती राजेश चक्कर याच्या सोबत जमत नसल्याने ते शहरातील संभाजीनगर भागात एका घरात विभक्त राहतात दि १९ स्पटेबर रोजी त्यांचे पती राजेश चक्कर यांनी त्यांची पती वापरत असलेल्या जुन्या भ्रमणध्वनी क्रमांका वरून पतीच्या नवीन भ्रमणध्वनी क्रमांकावर अश्लील मजकूर असलेला व्हॉट्सअप मसेज पाठवला तसेच त्यांच्या पक्षाचे सचिव अशोक देशमुख यांनी सुद्धा अक्षता चक्कर यांना फोन करून सांगितले की त्यांच्या सह विशाल देशमुख, अशोक नेवरे, राम काजळे पाटील,अशोक कदम यांनाही राजेश चक्कर यांनी अक्षता चक्कर यांच्या जुन्या मोबाईल क्रमनकावरून अश्लील मजकूर असलेला व्हॉट्सअप मॅसेज पाठवला याचा जाब विचारण्यासाठी पती अक्षता चक्कर व सोबत पक्षाचे सचिव हे राजेश चक्कर याच्या जालना रस्त्यावरील घरी गेले असता ते मिळून आले नसल्याने त्या परत घरी आल्या असता ११:३० वाजण्याच्या सुमारास राजेश चक्कर याने दरवाजाला लाथ मारून घरात प्रवेश करून अक्षता चक्कर यांना अश्लील भाषेत शिवीगाळ करत चारित्र्यावर संशय घेत लाथाबुक्क्याने मारहाण केली मारहाणीचा आवाज ऐकून अशोक देशमुख विशाल देशमुख यांनी सोडवा सोडव केली या बाबत जिंतूर पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास जमादार वाटोडे हे करत आहे

## आरोग्यवर्धिनी योग शिक्षक संघटनेचे मुख्यमंत्री यांना मागण्यांचे निवेदन

**परभणी,/प्रतिनिधी-** येथील आरोग्य वर्धिनी योग शिक्षक संघटनेच्या वतीने आरोग्य केंद्र, आयुष केंद्र व आरोग्य उपकेंद्र येथे कार्यरत असलेल्या योग शिक्षकांना शासनाने कायमस्वरूपी सेवेत समाविष्ट करून मानधनात वाढ करण्याची मागणी आरोग्य वर्धिनी योग शिक्षक संघटनेच्या वतीने मुख्यमंत्री यांच्याकडे जिल्हाधिकारी यांच्यामार्फत दिलेल्या निवेदनात करण्यात आली आहे.



महाराष्ट्र योग शिक्षक संघटनेशी संलग्न असलेल्या परभणीच्या आरोग्य वर्धिनी योग शिक्षक संघाकडून दि. २० सप्टेंबर रोजी दिलेल्या निवेदनात आरोग्य वर्धिनी योग शिक्षकांना सेवेत कायमस्वरूपी समाविष्ट करावे, एका योग सत्राचे मानधन ५०० रुपये ऐवजी १००० रुपये करावे, आरोग्य केंद्रावर जाण्या येण्याकरिता प्रवासी भत्ता द्यावा, एका आरोग्य केंद्रावर महिन्यात चार ऐवजी दहा योगसत्र घेण्याची परवानगी द्यावी आदी मागण्या करण्यात आल्या आहेत.

या निवेदनावर संघटनेचे जिल्हाध्यक्ष गजानन चौधरी, जिल्हा समन्वयक वसंत पारवे, महिला समन्वयक विद्याताई खंदारे, लक्ष्मण निरस,डॉ. शिवप्रसाद सानप, सुंदरदास मोरे, उद्धवराव सूर्यवंशी, सचिन रायपत्रीवार, सतीश भरोसे, अंकुश गरड, चंद्रकांत देशमुख, श्रीकृष्ण गोंगे, रामा गायकवाड, कैलास बेले, अशोक कुंभार, दिलीप देवकर, बाळासाहेब रामपूरकर, आरतीताई शिंदे, शरयू यादव, अशोक तळेकर, मयांक सोनटक्के, निलेश मते, अविनाश राऊत, अमोल राऊत, रोहिणी शिंदे, गजानन उदावंत, महादेव घाटूळ, अश्विन वायाळ, अनंता सोगे, प्रियंका उराडे आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

योग शिक्षकांची स्थिती अत्यांत बिकट आहे. आमच्या मागण्यांची दखल न घेतल्यास संघटनेचे राज्य अध्यक्ष मनोज निलपवार यांच्या मार्गदर्शनाखाली लोकशाही मार्गाने उपोषण करण्याचे ठरले आहे.
गजानन चौधरी, जिल्हा अध्यक्ष
आरोग्य वर्धिनी योग शिक्षक संघ
जिल्हा- परभणी

योगाच्या प्रचार प्रसाराचे कार्य सुव्यवस्थितपणे पार पाडण्यासाठी योग शिक्षक सक्षम असला पाहिजे. यासाठी शासनाने आमच्या मागण्या मान्य करणे गरजेचे आहे. विद्याताई खंदारे, महिला समन्वयक
जिल्हा- परभणी

## सकल मराठा समाजाच्यावतीने आज जिंतूर शहरात बंदची हाक

**मराठा आरक्षण योद्धा मनोज जरांगे पाटील यांच्या समर्थनासाठी बंद**

**सेलू,/प्रतिनिधी-** प्रशासनास निवेदन मराठा आरक्षण योद्धा मनोज जरांगे पाटील यांच्या आमरण उपोषणाची सरकार दखल घेत नसल्यामुळे उपोषणाच्या समर्थनासाठी सोमवार २३ सप्टेंबर रोजी जिंतूर बंदची हाक देण्यात आली आहे

मराठा समाजाला ओबीसी मधून आरक्षण देण्यात यावं यासाठी जालना जिल्ह्यातील अंतरवाली सराटी येथे मराठा आरक्षण योद्धा मनोज जरांगे पाटील यांनी १७ सप्टेंबर पासून आमरण उपोषण सुरू केले आहे.

उपोषणाच्या सहाव्या दिवसापासून त्यांची तब्यत खालावत जात आहे मात्र सरकार कडून काहीच निर्णय घेतला जात नसल्यामुळे मराठा समाज आक्रमक झाला झाला आहे म्हणून या उपोषणाला पाठिंबा देण्यासाठी जिंतूर तालुका सकल मराठा समाज वतीने प्रशासनाला निवेदन देण्यात आले आहे .यामध्ये म्हटले आहे की ,मराठा आरक्षण योध्दा मनोज जरांगे पाटील यांनी मागील सहा दिवसापासून आमरण उपोषण सुरु केले असून सरकारने उपोषणाची दखल घेतली नसल्याने निषेध नोंदवला आहे.याच निषेधासाठी जिंतूर तालुका बंद ठेवण्यात येणार असल्याचे नमूद करण्यात आले आहे म्हणून शाळा,कॉलेज,व्यापारी प्रतिष्ठाण बंद ठेऊन सहकार्य करण्याचे आवाहन मराठा समन्वकांनी केले आहे .

### अज्ञात वाहनाच्या धडकेत एक ठार



**जिंतूर,/प्रतिनिधी:** तालुक्यातील येलदरी येथील जिंतूर ते सेनगाव या रस्त्यावर येलदरी गावाजवळ अज्ञात वाहनाच्या धडकेने अमोल कापुरे हा युवक आपल्या दुचाकीवरून जात असताना गावरान धाब्याजवळ अज्ञात वाहनाने धडक दिल्यामुळे त्याचा मृत्यू जागी झाला ही घटना शनिवारी रात्री सातच्या दरम्यान झाली आहे या घटनेची माहिती मिळताच जिंतूर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक श्री सुकाळे साहेब यांनी त्वरित घटनास्थळाला जाऊन मृत अवस्थेत पडलेल्या अमोल कापुरे यांचा मृतदेह जिंतूर ग्रामीण रुग्णालयात आणण्यात आला व तेथे डॉक्टरांनी त्यांना मृत असे घोषित केले या घटनेमुळे येलदरी गावावर डोंगर कोसळलेला आहे अमोल कापुरे यांचे वय ३२ वर्ष असून त्यांना दोन मुली पती भाऊ आई-वडील असा मोठा परिवार आहे रविवारी दुपारी बारा वाजता येलदरी येथील शमशानभूमीमध्ये त्यांच्यावर अंत्यासंस्कार करण्यात आले जिंतूर पोलिसांनी अज्ञात वाहनाविरुद्ध गुन्हा नोंद करण्यात आला आहे



### मौजे केहाळ येथील भाजप व इतर कार्यकर्त्यांचा भांबळे यांच्या उपस्थितीत प्रवेश

**जिंतूर,/प्रतिनिधी:** मौजे केहाळ येथील भाजप व इतर कार्यकर्त्यांचा मा.आ.विजयराव भांबळे साहेब यांच्या उपस्थितीत जाहीर प्रवेश करण्यात आला होता.

केहाळ येथील कार्यकर्ते भगवानराव खुशालराव घुगे, त्रिंबकराव घुगे, राजाराम घुगे, धोंडीबा रोकडे, मनोहर घुगे, मनोहर चाटे, मुरलीधर चाटे, बाजीराव घुगे, शिवाजी धोत्रे, बबन प्रधान, लिंबाजी कोकाटे, विश्वनाथ कोकाटे, सुनील बांगर, शुभम गिऱ्हे, शिवाजी घोगरे, श्याम ढोके, ज्ञानेश्वर कऱ्हाळे, गजानन खाकरे, अमोल गिऱ्हे, सोनू घोगरे, गजानन कऱ्हाळे, गजानन घुगे, सखाराम शेंबडे, सईद चांद, सय्यद अफसर, सय्यद कासब, शेख सलीम यांनी मा.आ.विजयराव भांबळे साहेब यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवत राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरदचंद्र पवार) पक्षात प्रवेश केला. यावेळी मा.आ.विजयराव भांबळे साहेबांनी पक्षाचे रुमाल घालून पक्षात स्वागत केले व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. यावेळी मधुकरराव घुगे, ज्ञानदेवराव घुगे, सुरेशराव घुगे, शैलेश घुगे , नितीन कोकाटे ई. कार्यकर्ते उपस्थित होते.

## इतर मागास बहुजन कल्याण विभाग कल्याणकारी योजनेचा लाभ घ्या - मुंडे



**सेलू,/प्रतिनिधी-** इतर मागास बहुजन कल्याण विभागाच्या विविध योजनेत नाविन्यपूर्णता आणत त्या मिळविण्यासाठी प्रत्योक योजनेच्या अटी शर्थीची माहिती जाणून घेणे व याची परीपूर्णता करून योजनेपासून कोणीही वंचित राहू नये अशी मोहीम इतर मागास बहुजन विभाग विभागाने हाथी घेतली आहे.या घटकातील लाभार्थ्यांनी या कल्याणकारी योजनेचा लाभ घ्यावा असे अवाहन गटविकास अधिकारी अमितकुमार मुंडे यांनी केले.

ईतर मागास बहुजन कल्याण विभागाच्या योजनांची जनजागृती मोहीम सहाय्यक संचालक गिता गुठ्ठे यांचे सनियंत्रणात तालकास्तरावर राबविली जात आहे. शुक्रवारी सेलू येथील नुतन विद्यालय सभागृहात हा मेळावा घेण्यात आला. अध्यक्षस्थानी तहसीलदार डॉ. शिवाजी मगर हे होते.तर प्रमुख पाहुणे म्हणून गटविकास अधिकारी अमितकुमार मुंडे,प्राचार्य उत्तम राठोड,इतर मागास बहुजनचे निरीक्षक तुकाराम भराड,ओबीसी महामंडळचे निरीक्षक रवी दशरथे,गणेश जाधव,गंगाधर भुसारे ,रमेश मरेवार यांची उपस्थिती होती.यावेळी बोलतांना गटविकास अधिकारी अमितकुमार मुंडे म्हणाले की,सर्वसामान्यांचे जिवनमान उंचावणे यासाठी हा विभाग प्रयतशील आहे त्यामुळे लाभार्थी प्रतिसाद आवश्यक आहे असे मुंडे यांनी सांगितले.

यावेळी बोलतांना तहसीलदार डॉ. शिवाजी मगर म्हणाले की,ओबीसी ,व्हिजेएनटी,एसबीसी प्रवर्गातील विद्यार्थ्यांचा शैक्षणीक विकास घडवून त्यांचे ज्ञान संवर्धनासाठी इतर मागास बहुजन कल्याण विभाग उत्तमपणे कार्यरत आहे.विद्यार्थांना करिअर करण्याची हि एक प्रकारे संधी आहे.या कल्याणकारी योजना राबविण्यात इतर मागास बहुजन कल्याण विभाग आग्रस्थानी आहे. योजनांच्या प्रभावी. आंमलबजावणीसाठी हा स्वतंत्र विभाग कार्यान्वित केला आहे. यामध्ये मॅंट्रीकपुर्व पासुन मॅंट्रीकेत्तर शिष्यवृत्तीसह परदेशात मोफत शिक्षणाची विद्यार्थ्यांना संधी आहे. या विभागातील नाविण्यपूर्ण योजनेत आपण स्वतः, आपले कुटुंब व आपल्या गावातील घटक लाभार्थी बनले पाहिजे यासाठी सर्वांनी प्रयत करावे असे आवाहन मगर यांनी केले.यावेळी ओबीसी महामंडळाचे निरीक्षक रवी दशरथे यांनी ईतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळ अंतर्गत बिज भांडवल,थेट कर्ज योजना,बिनव्याजी कर्ज योजना,गटकर्ज योजना,शैक्षणिक कर्ज योजना त्यांचे स्वरूप व निकष याबद्दल सविस्तर माहिती दिली. गंगाधर भुसारे यांनी जिल्हास्तरीय पदवी व त्यापुढे शिक्षण घेणाऱ्या मुले व मुलींसाठी स्वतंत्र वसतिगृह,व्हिजेएनटी आश्रमशाळा, विद्यानिकेतन पब्लिक स्कुल कमळेवाडी, कन्यादान, वसंतराव नाईक तांडा वस्ती सुधार योजना,धनगर मुलांसाठी नामांकित इंग्रजी शाळा,मोदी घरकुल योजना,वयोवश्री व तिर्थदर्शन योजना अशा विविध योजनेची सविस्तर माहिती दिली.सुत्रसंचालन आर. एस. साळेगावकर यांनी केले.भगवान पल्लेवाड यांनी आभार मानले.यशस्वीतेसाठी प्राचार्य रमेश नखाते, मुख्याध्यापक शाम मचाले, निलेश गडम,योगेश गिराम,भगवान पल्लेवाड, बालाजी मुळे बाळू गोरे,भागवत चोपडे यांनी पुढाकार घेतला.

# राज्यस्तरीय अखिल भारतीय विद्यार्थी विज्ञान मेळाव्यात तेलभरे प्रथम

**सेलू,/प्रतिनिधी:** महाराष्ट्रातून एकमेव एल. के. आर. रोडगे प्रिन्स इंग्लिश स्कूलची निवड करर्ण्यात आली आहे.

दि. २१.सेलू तालुक्यातील एल के आर रोडगे प्रिन्स इंग्लिश स्कूल ची विद्यार्थिनी, कुमारी तनिष्का तेलभरे हिने राज्यस्तरीय अखिल भारतीय विद्यार्थी विज्ञान मेळाव्यात प्रथम क्रमांक पटकावून शाळेचे, सेलू तालुक्याचे,छत्रपती संभाजी नगर विभागाचे नाव उज्वल केले आहे. तनिष्का हिने अत्यांत उत्कृष्ठ कामगिरी करून आता राष्ट्रीय स्तरावर होणाऱ्या विज्ञान मेळाव्यासाठी आपली निवड निश्चित केली आहे.

नारायण चौरे यांच्या मार्गदर्शनाखाली तनिष्काने या स्पर्धेत सहभाग घेतला होता, तनिष्काला गायत्री पावडे हिची सोबत होती.तिने विज्ञानाच्या विविध पातळ्यांवर आपले कौशल्य सिद्ध केले. तालुका, जिल्हा आणि विभागीय स्तरावर सलग प्रथम क्रमांक पटकावत तनिष्काने आपल्या कौशल्याची झलक दाखवली होती. तिच्या या यशामुळे शाळेच्या शिक्षणप्रणालीचे आणि तिच्या परिश्रमाचे कौतुक सर्वत्र होत आहे. महाराष्ट्र राज्यातून एकमेव प्रिन्स इंग्लिश स्कूलची निवड होणे हे संपूर्ण राज्यासाठी अभिमानाची बाब आहे. तनिष्काचे हे यश संपूर्ण शाळेच्या आणि पालकांच्या मनात आनंद आणि गौरवाची भावना निर्माण करणारे आहे. या उल्लेखनीय यशावर संस्थेचे अध्यक्ष डॉ संजय रोडगे* यांनी प्रतिक्रिया व्यक्त करताना तनिष्का तेलभरे, गायत्री पावडे आणि तिच्या मार्गदर्शक शिक्षकांचे अभिनंदन केले. त्यांनी सांगितले की, ''आमच्या शाळेच्या विद्यार्थिनीने राज्यस्तरीय विज्ञान मेळाव्यात प्रथम क्रमांक मिळवून राष्ट्रीय स्तरावर



प्रवेश मिळवणे हे शाळेसाठी अभिमानास्पद आहे. तनिष्काने घेतलेले प्रचंड परिश्रम, शिक्षकांचे मार्गदर्शन आणि विद्यार्थ्यांची जिद्द यामुळेच हे यश शक्य झाले आहे.'' डॉ रोडगे पुढे म्हणाले, ''महाराष्ट्र राज्यातून एकमेव शाळा म्हणून आमची निवड झाल्याने आम्ही अतिशय गौरव अनुभवीत आहोत. आम्ही सतत विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी प्रयतशील आहोत, आणि तनिष्काचे हे यश त्याचाच एक ठळक पुरावा आहे. आम्ही राष्ट्रीय स्तरावर देखील तिला आणखी मोठ्या यशाच्या शुभेच्छा देतो.''

या राष्ट्रीय यशाबद्दल श्रीराम प्रतिष्ठान सेलू चे संस्थापक अध्यक्ष डॉ संजय रोडगे, सचिव डॉ सविता रोडगे, प्रशासकीय अधिकारी प्रा. महादेव साबळे,शाळेचे मुख्याध्यापक कार्तिक रताला, प्रगती क्षीरसागर,तसेच शिक्षकवृंदांनी तनिष्काचे यश कौतुकास्पद असल्याचे नमूद केले आहे आणि तिला पुढील राष्ट्रीय स्तरावर होणाऱ्या स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# हिंगोलीत काँग्रेसच्या विधानसभा आढावा बैठकीत दोन गटात हाणामारी

## मारहाणीनंतर काँग्रेसचे शहराध्यक्ष पवन उपाध्ये रूग्णालयात दाखल



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २२ सप्टेंबर**
येथील स्व शिवाजीराव देशमुख सभागृहात शनिवारी जिल्ह्यातील विधानसभा निहाय आढावा बैठक आणि इच्छुक उमेदवारांच्या मुलाखती होणार होत्या. यावेळी काँग्रेसचे माजी आ. भाऊराव पाटील गोरेगावकर आणि इच्छुक उमेदवार प्रकाश थोरात यांच्या गटात सहप्रभारी कुणाल चौधरी यांच्यासमोरच तुंबळ हाणामारी झाली. यावेळी गोरेगांवकर समर्थक तथा काँग्रेसचे हिंगोली शहराध्यक्ष पवन उपाध्ये यांना जबर मारहाण झाल्यामुळे त्यांना एका खासगी रूग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले. याबाबत पक्षश्रेष्ठींकडे तक्रार करणार असून कार्यवाही न झाल्यास टिळक भवनासमोर आमरण उपोषण करणार असल्याचा इशारा पवन उपाध्ये यांनी दिला आहे.

सध्या विधानसभेचे वारे जोरात वाहू लागले असून शनिवारी येथील शिवाजीराव देशमुख सभागृहात काँग्रेसच्या हिंगोली विधानसभा मतदारसंघासाठी इच्छुक उमेदवारांनी त्यांचे शक्तीप्रदर्शन केले. सुरूवातील माजी आ. भाऊराव पाटील गोरेगावकर यांचे समर्थक सभागृहात दाखल झाले. त्यांच्या समर्थकांमुळे संपूर्ण सभागृह पॅक झाले होते. त्यांनतर काँग्रेसच्या विधान परिषदेच्या आमदार डॉ प्रज्ञा सातव यांच्यासोबत इच्छुक उमेदवार प्रकाश थोरात हे देखील समर्थकांसह उपस्थित झाले. यावेळी दोन्ही गटाच्या समर्थकांनी जोरदार घोषणबाजी करीत शक्तीप्रदर्शन केले. यावेळी मंचावर सहप्रभारी कुणाल चौधरी, लोकसभा प्रभारी ॲड सचिन नाईक यांच्यासह आ.डॉ प्रज्ञा सातव, माजी आ. भाऊराव पाटील गोरेगावकर आदींची उपस्थिती होती.

सभागृह पॅक भरल्यामुळे प्रकाश थोरात यांच्या समर्थकांना बसण्यासाठी जागा मिळत नव्हती. त्यातच शहराध्यक्ष पवन उपाध्ये यांना प्रकाश थोरात यांच्या समर्थकांनी जबर मारहाण केली. यावेळी सहप्रभारी कुणाल चौधरी यांनी मध्यस्थी करीत दोन्ही गटाला शांत केले परंतु आढावा बैठक न घेताच त्यांनी काढता पाय घेतला.

यावेळी पवन उपाध्ये यांनी सांगितले की, प्रकाश थोरात यांच्याविरोधात मी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांच्याकडे तक्रार केली होती. त्याचा राग मनात धरून त्यांच्या समर्थकांनी मला जबर मारहाण केली असून खिशातील पैसे आणि मोबाईलही हरवला आहे. यासंदर्भात पक्षश्रेष्ठींकडे तक्रार करणार असून तक्रारीची दखल न घेतल्यास टिळक भवनासमोर आमरण उपोषण करणार आहे.

दरम्यान, शहराध्यक्ष पवन उपाध्ये यांना येथील एका खासगी रूग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले असून त्यांची प्रकृती सध्या स्थिर आहे. माजी आ. भाऊराव पाटील गोरेगावकर यांनी त्यांची रविवारी सकाळी दवाखान्यात जाऊन भेट घेतली आहे. हिंगोली विधानसभा निवडणुकीवरून माजी आ. भाऊराव पाटील गोरेगावकर आणि आ. डॉ. प्रज्ञा सातव गटातील वाद पुन्हा एकदा चव्हाट्यावर आला आहे.

# गणेशोत्सव शांततेत पार पाडणाऱ्या स्वयंसेवकांचा सत्कार



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २२ सप्टेंबर**
जिल्ह्यात श्री गणेश स्थापना, विसर्जन आणि श्री विघ्नहर्ता चिंतामणी गणपती मंदिर उत्सव शांततेत पार पाडण्यासाठी स्वयंसेवक, सामाजिक संघटना तसेच पोलिस दलातील कर्मचारी यांनी मोलाची भूमिका निभावल्याबद्दल जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सभागृहात त्यांचा मान्यवरांच्याहस्ते गौरव करण्यात आला.

यावेळी जिल्हाधिकारी अभिनव गोयल, पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे, मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले, अप्पर पोलिस अधीक्षक अर्चना पाटील, अप्पर जिल्हाधिकारी खुशालसिंह परदेशी, उपविभागीय पोलिस अधिकारी सुरेश दळवी, पोनि विकास पाटील, पोनि मारोती थोरात, पोनि सुधीर वाघ यांची प्रमुख उपस्थिती होती.

श्री गणेशोत्सव २०२४ अंतर्गत हिंगोली जिल्ह्यात एकूण १४६४ सार्वजनिक श्री गणेश मंडळांनी स्थापना करण्यात आली होती. त्याचप्रमाणे श्री विघ्नहर्ता चिंतामणी गणपतीचे जवळपास दीड लाख भाविकांनी दर्शन घेतले. जिल्ह्यातील सार्वजनिक गणेश मंडळांचे विसर्जन आणि श्री विघ्नहर्ता चिंतामणी गणपती दर्शन शांततेत पार पाडण्यासाठी पोलिस दलाच्यावतीने सुक्ष्म नियोजन करण्यात आले होते. यासाठी निवृत्त पोलिस अधिकारी, कर्मचारी, स्वयंसेवी संघटना, स्वयंसेवक यांना सहभागी करून घेण्यात आले होते. त्यांनी गणेशोत्सव शांततेत पार पाडण्यासाठी मोलाची भुमिका बजावली. या सर्वांच्या कार्याची दखल घेत तसेच स्वच्छता अभियान आणि रक्तदान शिबीर असे उपक्रम राबविल्याबद्दल जिल्हाधिकारी गोयल, पोलिस अधीक्षक कोकाटे यांच्या संकल्पनेतून संबंधितांचा गौरव करण्यात आला. यावेळी प्रशस्तीपत्र प्रदान करण्यात आले. या कार्यक्रमास पोलिस ठाण्यांचे प्रभारी, गणेश मंडळांचे स्वयंसेवक, अंमलदार, सामाजिक संघटनेचे पदाधिकारी आदींची उपस्थिती होती.

# भाजपचे रामदास पाटील सुमठाणकरांचा झंझावती दौरा

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २२ सप्टेंबर**
भारतीय जनता पक्षाचे लोकसभा प्रमुख रामदास पाटील यांनी हिंगोली विधानसभा मतदार संघात झंझावती दौरा सुरू केला असून या दौऱ्यात त्यांनी गावांतील नागरिकांशी संवाद साधत आहेत.




हिंगोली विधानसभा निवडणुकांचे वारे सध्या जोरात वाहत असून सर्वच राजकीय पक्षांचे इच्छुक उमेदवारांनी गावांमध्ये भेटीगाठी, सभा, कॉर्नर बैठका तसेच नागरिकांशी संवाद साधण्यास सुरूवात केली आहे. रविवारी डिग्रस कऱ्हाळे सर्कलमधील आठ्ठरवाडी यैथील श्री हनुमान मंदिराचे दर्शन घेतल्यानंतर गावकऱ्यांशी संवाद साधला. गोरेगाव सर्कलमधील नागमाथा, वरखेडा त्यानंतर बाभूळगाव सर्कलमधील केंद्रा बु, येथे माजी विभागीय आयुक्त सुनील केंद्रेकर यांचय निवासस्थानी सदीच्छा भेट दिली. गोरेगाव येथील ग्रामदैवत गोरेश्वर महादेवाचे दर्शन घेतले तसेच नागरिक तसेच पदाधिकारी यांचेशी संवाद साधला. सेनगाव तालुक्याती पातोंडा, पुसेगाव, लिंगपींपरी, हिवरा, भानखेडा, आडोळ, मकोडी, सुकळी, गोंडाळा, माझोड आदीं गावांना भेटी देत तेथील नागरिकांशी संवाद साधला आहे. रामदास पाटील सुमठाणकर यांनी हिंगोली विधानसभा मतदारसंघासाठी जोरदार तयारी सुरू केली असून सकाळपासून रात्री उशिरापर्यंत विविध गावांना भेटी देत नागरिकांशी संवाद साधत त्यांच्या अडचणी, समस्या जाणून घेत आहेत. त्यांच्या झंझावती दौऱ्याला चांगला प्रतिसाद मिळत असतांना दिसत आहेत.



**हिंगोली– मराठा समाजाला ओबीसीतून आरक्षण द्या या मागणीसाठी मराठा आंदोलक मनोज जरांगे यांनी अंतरवाली सराटी येथे आमरण उपोषण सुरू केले आहे. त्यांच्या उपोषणाला पाठींबा म्हणून रविवारपासून हिंगोलीत मराठा बांधवांनी छत्रपती शिवाजी महाराज पूतळा परिसरात आमरण उपोषण सुरू केले आहे. या उपोषणात सहभागी मराठा बांधव. छाया– विजय गुंडेकर**

## संक्षिप्त वृत्त

### सुप्रसिध्द व्यापारी स्वरूपचंद परतवार यांचे निधन



हिंगोली– येथील दिगंबर जैन समाजातील ज्येष्ठ समाजसेवक व प्रकाश इलेक्ट्रिकल्सचे संस्थापक स्वरुपचंद केशवराव परतवार यांचे त्यांच्या निवासस्थानी दुःखद निधन झाले. मृत्यू समयी त्यांचं वय ८५ वर्ष होत. त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा, दोन मुली, नातू, पणतू असा मोठा परीवार आहे. मूळचे लोहगाव येथील रहिवाशी असलेल्या स्वरुपचंद यांनी हिंगोली येथील महावीर चौकात प्रकाश इलेक्ट्रिकल्स हे प्रतिष्ठान निर्माण करून मोठा व्यवसाय केला. श्री सार्वजनिक दसरा महोत्सव, दिगंबर जैन समाज संघटना, महावीर भवन, सकल जैन समाज, भारतीय जैन संघटना, जैन समाज सामूहिक विवाह व परिचय मेळावा समिती, व्यापारी महासंघ आदींचे अनेक वर्ष पदाधिकारी होते. त्यांच्या पार्थिवावर कयाधू स्मशान भूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी मोठ्या संख्येने जनसमुदाय उपस्थित होता.

### रिधोरा येथे सात दिवसांपासून आमरण उपोषण



वसमत– तालुक्यातील रिधोरा गावामध्ये मराठा बांधव दत्तराव भालेराव यांचे आमरण उपोषण सुरू आहे. मनोज जरांगे पाटील यांना पाठिंबा आमरण उपोषण सुरू केले आहे. या उपोषणाचा आजचा सातवा दिवस असून समाजासाठी अन्नपाणी त्याग केलेला आहे. यावेळी वसमत तालुक्यातील मराठा बांधव आक्रमक झालेला दिसून येत आहे. रिधोरा या गावांमध्ये गावकरी मंडळी मोठ्या संख्येने उपोषणस्थळी दाखल झाले आहेत.

### हिंगोलीत ईद मिलादुन्नबी निमित्त भव्य मिरवणूक

हिंगोली– जश्ने ईदे मिलादुन्नबी निमित्त भव्य मिरवणुकीचे आयोजन करण्यात आले होते. ठिकठिकाणी प्रतिष्ठित नागरिकांकडून ईद–ए–मिलादुन्नबी कमिटीच्या सदस्यांचे हार व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. ठिकठिकाणी नागरिकांनी अल्पोपहार जिलेबी, मिठाई, शरबत, बदाम शेख, कचोरी रॅलीमध्ये येणाऱ्या लोकांना वाटले. या रॅलीचे आयोजन ईद मिलादुन्नबी समितीचे अध्यक्ष हाजी मोहम्मद खिजर,सचिव हाजी अहमद खान, नसीर अहमद खान, शेख गुलाम मुस्तफा आदींनी केले होते.

# अखिल भारतीय मारवाडी महिला संघटनेकडून गरजूंना कपड्यांचे वाटप




**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २२ सप्टेंबर**
येथील अखील भारतीय मारवाडी महिला संघटनेच्यावतीने मानवता की दीवार अंतर्गत गोरगरीब मुले, मुली तसेच महिलांना कपड्यांचे वाटप करण्यात आले.

अखील भारतीय मारवाडी महिला संघटनेच्यावतीने विविध सामाजिक उपक्रम राबवले जात आहेत. याचाच एकभाग म्हणून रविवारी संघटनेच्यावतीने गोरगरीबी आणि गरजूंना कपड्यांचे वाटप करण्यात आले. यावेळी मोठ्या संख्येने गरजुंनी कपडे आणि साड्या तसेच मुलांमुलींसाठी ड्रेस घेण्यासाठी गर्दी केली होती. यावेळी संघटनेच्या अध्यक्षा मंजु बगडिया, सचिव वर्षा कयाल, कोषाध्यक्ष पूजा बगडीया यांच्यासह महिला पदाधिकारी व सदस्या उपस्थित होत्या.

# जि.प. कर्मचारी व शिक्षक पतसंस्थेची सर्वसाधारण सभा संपन्न




**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली २२ सप्टेंबर**
येथील जि.प.बहूविध प्रशाला येथे पतसंस्थेची २४ वी वार्षिक सर्वसाधारण सभा संस्थेचे अध्यक्ष गजानन बोरकर यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. या सर्वसाधारण सभेसाठी प्रमुख पाहुणे म्हणून या संस्थेचे संस्थापक अध्यक्ष व्ही.एस.सुर्यवंशी, मनोहर पोपलाईत, भगवानराव लोंढे, उपशिक्षणाधिकारी नेटके, गटशिक्षणाधिकारी नांदे, माजी चेअरमन प्रकाशराव निळकंठे, जावळे, आत्माराम मईंग, जि.प.शिक्षक पतसंस्था अध्यक्ष रामदास कावरखे, विठ्ठल पवार, रामराव वराडे, विश्वंभरराव जावळे व पतसंस्थेचे सभासद मोठ्या प्रमाणात सभासद उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक हरिभाऊ मुटकुळे यांनी केले या प्रसंगी संस्थेचे सचिव रमेश सुर्यवंशी यांनी संस्थेच्या वार्षिक अहवाल वाचन केले व संस्थचे पुढील वर्षासाठीची उद्दीष्टे व ध्येयधोरणे सांगितले. गटशिक्षणाधिकारी श्री नांदे यांनी संस्थेच्या प्रगतीसाठी सर्व सभासदांनी संस्थेत भरपूर प्रमाणात ठेवी ठेवून संस्थेला सहकार्य करावे व नियमित कर्जफेड करावी, असे प्रतिपादन केले त्याचबरोबर संस्थेचे संस्थापक अध्यक्ष सुर्यवंशी यांनी येणाऱ्या वर्षे मध्ये संस्थेची स्वतःची इमारत असावी अशी अपेक्षा व्यक्त केली. अध्यक्षीय समारोप करताना बोरकर यांनी संस्थेच्या प्रगतीसाठी व सभासद हितासाठी सदैव प्रयत्नशील राहणार असल्याचे सांगितले. या कार्यक्रमासाठी उपस्थित सर्व मान्यवरांचे आभार संस्थेचे संचालक गजानन खिल्लारी यांनी व्यक्त केले.

# राशन दुकानातून १०० टक्के आनंदाचा शिधा व धान्य वाटप

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २२ सप्टेंबर**
शहरातील एस एफ पठाण यांच्या राशन दुकानातून शंभर टक्के लाभार्थ्यांना गौरी व गणपतीचा आनंदाचा शिधा आणि सप्टेंबर महिन्याचे धान्य वाटप करून ऑनलाईन त्याची नोंदही करण्यात आली आहे. राज्यात सप्टेंबर महिन्यात १०० टक्के धान्य वाटणारे पहिले राशन दुकान ठरले आहे.



शहरातील आनंद नगर भागात असलेल एस एफ पठाण यांनी मागील वर्षीही लाभार्थ्यांना १०० टक्के धान्य वितरीत करीत ऑनलाईन नोंद केली होती. यावर्षीही त्यांना माहे सप्टेंबर मध्ये दि ४ सप्टेंबर ते २० सप्टेंबर या काळात मिळालेले ५८३९ किलो गहू, ८४०४ किलो तांदुळ आणि गौरी गणपतीनिमित्त लाभार्थ्यांना वाटपासाठी मिळालेला ५४६ आनंदाचा शिधाची किट त्यांनी वाटप केली आहे. कदाचित राज्यात एस एफ पठाण यांचे पहिले दुकान आहे त्यांनी गौरी गणपती आनंदाचा शिधा आणि धान्य वाटप लाभार्थ्यांना सप्टेंबर महिन्याच्या २० तारखेपर्यत करून त्याची शासन दरबारी ऑनलाईन नोंदही केली आहे. त्यांच्या या कामाबद्दल पुरवठा विभागाच्यावतीने कौतुक करण्यात येत असून त्यांच्या कामाची ऑनलाईन नोंदही झाली आहे.

# विविध प्रजातीची ११ हजार झाडे लावण्याचा मानस– पोलिस अधीक्षक कोकाटे

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २२ सप्टेंबर**
येथील पोलीस अधीक्षक कार्यालय आणि ईतर ठिकाणच्या परिसरात घनवट पद्धतीने विविध प्रजातीचे झाडं लावण्याच्या कार्यक्रम घेण्यात आला.. याप्रसंगी ११ हजार झाडे सदभाव सेवाभावी संस्था, पर्यावरण रक्षक दलच्या सह्योगाने लावण्याचा मानस असल्याचे पोलीस अधिक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांनी व्यक्त केला.



जैवविविधता टिकली पाहिजे, मातीचा पोत सुधारला पाहिजे, जलस्तर वाढविणे, ऑक्सिजन पार्क, फॅक्टरी तयार झाली पाहिजे याअनुषंगाने झाडं लावण्यार असल्याच डॉ भरतीया यांनी सांगितले. याची सुरुवात केली असून यामध्ये जांभूळ, गोंदन, चिंच, महारुख, नळखीरा, पळस, कांचन, टेम्भूर्णी, कडुलिंब, वड, पिंपळ आदी विविध प्रजातीचे झाडांचं रोपण करण्यात आले. ड्रीप करून झाडं जगविल्या जाणार तसेच त्यांना बांबूच्या कमठ्याचा आधार दिला जाणार आहे. मुख्याधिकारी डॉ. अरविंद मुंढे, आणि वन विभाग, सामाजिक वनिकरण यांच्या माध्यमातून वृक्षांची उपलब्धता झाली. आणखी जशी जशी वृक्ष मिळतील त्याप्रमाणे लागवड करण्यात येणार आहे. याप्रसंगी सतीश मुळतकर, रामराव जाधव, सदभाव आणि पर्यावरण रक्षक दलाचे डॉ अभयकुमार भारतीया, विनोद खरात, पोले, रवी धनवे यांची उपस्थिती होती.

# सागवान तस्करांना एक दिवसाची पोलीस कोठडी

**तभा वृत्तसेवा**
**इस्लापूर, दि. २२ सप्टेंबर -**

रात्रीची जंगलगस्त करीत असतांना भुलजा परिसरात अवैध वृक्ष तोड होत असल्याचा सुगावा लागला. कानोसाघेत घटनास्थळी जाऊन चार तस्तर हाती लागले तर अंधाराचा फायदा घेऊन पोबारा केलेला पाचव्या तस्कराला चतुर्भूज करण्यास वनपथकाला यश मिळाले. सदर घटना बोधडी वनविभागाच्या कार्यकक्षेतील भुलजा कक्ष क्र.२१३- सर्वे नंबर ३३ मधील असून मुद्देमाल जप्त केला आहे. न्यायालयाने तस्करांना एक दिवसाची वन कोठडी सुनावली आहे.



नांदेडचे उपवनसंरक्षक केशव वाबळे यांच्या मार्गदर्शनाखाली श्रीकांत इटलोड (वनसंरक्षक, रो. ह. यो. व वन्यजीव नांदेड) यांच्या नियोजनात आणि सी. जी. पोतुलवार (वनपरिक्षेत्र अधिकारी, बोधडी) यांच्या नेतृत्वात २० सप्टेंबरच्या रात्री गस्तीवर असतांना नियतक्षेत्र भुलाजा कक्ष क्र. २१३ व. स. नंबर ३३ जंगलात अवैध वृक्षतोड होत असतानाचा सुगावा लागल्यामुळे वनपरिक्षेत्रातील त्या क्षेत्राचे वनपाल गंगाधर नीलपत्रेवार, वनरक्षक जी. एस. देवकांबळे, जी.पी.काळे, के.जी. माळी यांनी तातडीने सापळा रचून अवैध वृक्षतोड करणारे वनतस्कर प्रकाश मारोती सिडाम, माणिक माधव सिडाम, मारोती नागनाथ दराडे, राज नागनाथ गेडाम यांना सहा सागी नगासह दोन करवती जायमोक्यावर पकडल्या. त्यातील अंधाराचा फायदा घेऊन पळालेल्या विजय संजय गीते या तस्करास दुसऱ्या दिवशी अटक केली.

सदर वनगुन्ह्यात तपास कामी शेख याखुब वनपाल जकास, एस. एल.ढगे वनपाल पाटोदा, के.एम.बडूरे वनपाल थारा, डी. एन.गड्डे, एन.के. सुरणर, ए. एन. रंगे, एस. आर. वट्टमवार, के. एस. तलांडे, एन.पी. कोरडे, ए. टी. मधीकर, पी.डी.सोनुने, ए. ए. सपकाळ, कु. ए. एम.देशमुखे, कु. दुर्गा ढालके, सौ.सुजाता देवापुरे यांचा या पथकात समावेश होता. सदरील आरोपीविरुद्ध भारतीय वन अधिनियम १९२७ चे कलम २६(१)(ड), २६(१)(फ), २६(१)(ई), ६४, ६५(अ), ६९, ७७ अन्वये प्र.गु.रि.क्रमांक ०४/२०२४ दि. २०/०९/२०२४ नुसार वनगुन्ह्याची नोंद करून माननीय न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग अपिलीय न्यायालय, किनवट येथे दाखल केले असता तस्करांना न्यायालयाने आरोपींना एक दिवसाची वन कोठडी सुनावली असल्याचे सूत्रांनी सांगितले.

# ना.हेमंत पाटील यांचे आनंदराव पाटील बोंढारकर यांच्या नेतृत्वात भव्य रॅली द्वारे स्वागत

**तभा वृत्तसेवा**
**नवीन नांदेड, दि. २२ सप्टेंबर -**

माजी खासदार हेमंत पाटील यांच्या हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे हळद संशोधन केंद्राचे अध्यक्षपदास कॅबिनेट मंत्रीपदाचा दर्जा देण्यात आल्याबद्दल आज हेमंत पाटील यांचे नांदेड आगमन निमित्त शिवसेना जिल्हाप्रमुख आनंदराव पाटील बोंढारकर यांच्या नेतृत्वात भव्य रॅली काढुन स्वागत करण्यात आले.

नांदेड रेल्वे स्थानकावर हेमंत पाटील यांचे आगमन होताच फटाक्यांची जोरदार आतिषबाजी करत त्यांची भव्य रॅली काढण्यात आली. शिवसेना जिल्हाप्रमुख आनंदराव पाटील बोंढारकर यांच्या नेतृत्वात आयोजित करण्यात आलेल्या रॅलीत शिवसैनिक मोठ्या प्रमाणात सहभागी झाले होते.

नांदेड दक्षिणचे माजी आमदार तथा हिंगोली चे माजी खासदार हेमंत पाटील यांची हिंदुरुदय सम्राट बाळासाहेब ठाकरे हळद संशोधन केंद्राचे अध्यक्षपदी यापूर्वीच निवड करण्यात आली होती . मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली राज्य सरकारने हेमंत पाटील यांच्या अध्यक्षपदाला आता कॅबिनेट मंत्रीपदाचा दर्जा बहाल केला आहे. असा दर्जा प्राप्त होणारे हेमंत पाटील हे पहिलेच माजी खासदार आहेत. त्यांच्या या निवडीबद्दल नांदेड दक्षिण शिवसेनेच्या वतीने जंगी स्वागत समारंभाचे आयोजन केले होते. हेमंत पाटील यांना कॅबिनेट मंत्री पदाचा दर्जा प्राप्त झाल्यानंतर ते आज पहिल्यांदाच नांदेड येथे आले होते. त्यांच्या आगमनपित्यार्थ रेल्वे



स्थानकावर स्वागताची जंगी तयारी करण्यात आली होती. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर, छत्रपती शिवाजी महाराज , महात्मा ज्योतिबा फुले, सावित्रीबाई फुले यांच्या पुतळ्यांना हेमंत पाटील यांनी अभिवादन ही केले. त्यानंतर उघड्या जीप मधून त्यांची भव्य रॅली काढण्यात आली.

यावेळी आमदार बालाजीराव कल्याणकर, शिवसेना जिल्हा संपर्कप्रमुख दत्तात्रय पईतवार, शिवसेना जिल्हाप्रमुख उमेश मुंडे, शिवसेना जिल्हाप्रमुख गंगाधर बडुरे, डॉ . अंकुश देवसरकर, शिवसेना शहरप्रमुख तुलजेश यादव, शिवसेना तालुकाप्रमुख उद्धव पाटील शिंदे, शिवसेना शहरप्रमुख सुहास खराणे, शिवसेना तालुकाप्रमुख अशोक मोरे, शिवसेना जिल्हासंघटक शंकर पिनोजी,शिवसेना उपजिल्हाप्रमुख बिल्लु यादव, उपजिल्हाप्रमुख बाळासाहेब पाटील कऱ्हाळे, उपजिल्हाप्रमुख सचिन किसवे, उपजिल्हाप्रमुख दत्ता पाटील पांगरीकर,सहसंपर्क प्रमुख स. दर्शनसिंघ सिध्दू, सहसंपर्कप्रमुख आकाश रेड्डी, जयंतराव कदम, तालुकाप्रमुख संजय कुरे, तालुकाप्रमुख संतोष भारसावडे, तालुकाप्रमुख संतोष कपाटे, तालुकाप्रमुख अमोल पवार,शहरप्रमुख सचिन माने, तालुकाप्रमुख सुदर्शन नाईक, तालुकाप्रमुख बालाजी मुरकुटे, शहरप्रमुख सुरज सातुलवार,युवासेना जिल्हाप्रमुख आमोद साबळे, जिल्हाप्रमुख साई विभुते, जिल्हाप्रमुख संदेश संदेश पाटील हडसणीकर ,महिला आघाडी जिल्हाप्रमुख सौ. वनमाला राठोड, जिल्हाप्रमुख गिता पुरोहित, जिल्हाप्रमुख शितल भांगे, तालुकाप्रमुख स्नेहा पाटील, शहरप्रमुख लक्ष्मीबाई दुधे, एसी-ओबीसी-एसटी जिल्हाप्रमुख मंगेश कदम, अल्पसंख्याक जिल्हाप्रमुख शेख सिराज, अवघड वाहतूकसेना जिल्हाप्रमुख संतोष लामदाडे, वैद्यकीय शहर प्रमुख दुर्गेश बागडे, तालुकासंघटक माऊली मोरे, विकास देशमुख, शिवसेना उपशहरप्रमुख प्रकाश जोंधळे, पप्पू गायकवाड, स्वराज यादव यांच्यासह जिल्ह्यातील शिवसेना-युवासेना,महिला आघाडी आजी-माजी पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## संक्षिप्त वृत्त

### पशुसंवर्धन अधिकारी डॉ. भुपेंद्र बोधनकर यांची लातूर येथे बदली

**नांदेड** -डॉ. भुपेंद्र बोधनकर यांची जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी जिल्हा परिषद, लातूर येथे बदली तर त्यांच्या जागेवर डॉ. सुरेखा दिगांबर माने यांची नांदेड येथे जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी पदावर नियुक्ती झाली आहे.
डॉ. भुपेंद्र बोधनकर यांनी त्यांच्या ४ वर्षाच्या कार्यकाळात इमारत दुरुस्तीसह नवीन ६० इमारतीचे बांधकाम करण्यात आले. मानव विकास च्या माध्यमातून गाव तेथे खोडा त्याचबरोबर जिल्हा परिषद उपकर योजनेत गाव तेथे खोडा उपलब्ध करून देण्यात आला. मानव विकास व जिल्हा परिषद उपकर योजनेतून पशुवैद्यकीय साहित्य उपलब्ध करून दिले. तसेच प्रत्येक पशुवैद्यकीय दवाखान्यात उपचारासाठी येणाऱ्या पशुंना पिण्याच्या पाण्याचा हौद उपलब्ध करून दिलेला आहे. पशुवैद्यकीय दवाखान्याला सोलर युनीट बनविण्यासाठी उपक्रम चालु केला. लंपी त्वचा रोग निर्मूलन साथीच्या कालावधीत उत्तम काम केले असुन लोकप्रतिनिधी यांच्या माध्यमातून पशुवैद्यकीय संस्थांना मितीलीन ब्लू मेडिसिन उपलब्ध करून दिले आहे. त्यांच्या कार्यकाळात पशुसंवर्धन विभागातील पशुधन पर्यवेक्षक ते सहायक पशुधन विकास अधिकारी पदोन्नती, १०,२०, ३० व आश्वासित प्रगती योजनेचे सर्व लाभ कर्मचाऱ्यांना वेळेत देण्यात आले आहेत. त्याचबरोबर पंचायत राज समितीने पशुसंवर्धन विभागाचे काम चांगले चालू आहे म्हणून स्तुती केली आहे. जिल्हा परिषद सर्वसाधारण सभेत पशुसंवर्धन विभागाचे अधिकारी व कर्मचारी कामकाज चांगले करत असल्याचे अभिनंदन ठराव संमत करून प्रशंसा केली आहे. डॉ.भुपेंद्र बोधनकर यांनी त्यांच्या कालावधीत विविध प्रकारच्या कामाच्या माध्यमातून नांदेड जिल्ह्यात अत्यंत उत्तम कामगिरी केली आहे. त्याचबरोबर माळेगाव यात्रा येथील नियोजन देखील उत्कृष्ट होते.

### उमरी शहरातील लाईट स्वच्छतेकडे मुख्याधिकाऱ्यांनी लक्ष द्यावे : अनंतवार



**उमरी** -शहरातिल अनेक गल्लीमध्ये लाईट व स्वच्छताची अभाव जानवत असुन विशेषता उमरी पहाड गल्ली प्रभाग क्रं चार व्यकंटेश नगर मधिल सर्व सामान्य लोकांनाची बेहाल होत असल्याचे उमरी माजी नगराध्यक्ष सौ अनिता श्रीनिवास अनंतवार प्रतिनिधी तथा नगर परिषद कर्मचारी अध्यक्ष श्रीनिवास अनंतवार यांनी मुख्यधिकारी निलम कांबळे यांच्याकडे निवेदन देवून मागणी केली आहे . उमरी शहरातील अनेक प्रभागात स्वच्छता आणि पाण्याचा प्रश्न उद्भभत असुन त्यामुळे शहरातील नागरीकांना त्रास होत आहे अनेक वेळा तोंडी सुचना देवूनही प्रश्न मार्गी न लागल्याने मुख्यधिकारी उमरी यांचे लक्ष वेधन्यासाठी उमरी तालुका अजित पवार गटाचे तालुकाध्यक्ष डॉ विक्रम देशमुख तळेगावकर यांच्या नेतृत्व सल्याने निवेदन देण्यात आले आहे .
नगर परिषद यावेळी माजी नगर परिषद कर्मचारी संघटनेचे अध्यक्ष श्रीनिवास अनंतवार, राष्ट्रवादी कार्यअध्यक्ष ज्ञानेश्वर पाटील सावंत, बालाजी पाटील पवार , युवा कार्यध्यक्ष संतोष वाघमारे, अविनास पाटील पवळे , नागेश पांढरे , सह आदी मान्यवर उपस्थित होते.

### नांदेडमध्ये शाहीर संभाजी भगत यांच्या विद्रोही आंबेडकरी शाहिरी जलसाचे आयोजन

**नांदेड** - प्रसिद्ध विद्रोही लोकशाहीर संभाजी भगत यांच्या विद्रोही आंबेडकरी शाहिरी जलसाचे येत्या मंगळवारी नांदेडमध्ये आयोजन करण्यात आले असून सत्यशोधक समाज स्थापना दिनाच्या निमित्ताने नांदेडकरांना या जलसाची पर्वणी अनुभवायला मिळणार आहे. शहरातील कुसुम सभागृहात मंगळवारी दि.२४ रोजी सायंकाळी ६:३० वाजता या जलसाला सुरुवात होणार असून रसिक श्रोत्यांची व्यवस्था करण्यात आली आहे. यशवंतराव चव्हाण सेंटर नांदेड शाखेच्या वतीने या जलसाचे आयोजन करण्यात आले असून हा जलसा प्रेक्षकांसाठी विनामूल्य आहे. नांदेडकरांनी मोठ्या संख्येनी उपस्थित रहावे असे आवाहन यशवंतराव चव्हाण सेंटरचे अध्यक्ष कमलकिशोर कदम, सचिव शिवाजी गावंडे, सर्व कार्यकारिणीसह कार्यक्रमाचे संयोजक इंजि. गोविंद हानवटे, महेश देशमुख, सय्यद युनूस, बसवराज बिरादार, रामकृष्ण सुर्वे यांनी केले आहे.

### मुदखेड तालुक्यातील चर्मकार समाज बांधवांनी महामोर्चात उपस्थीत राहाव : सुभाष दुधंबे

**मुदखेड-** चर्मकार समाजाच्या विविध मागण्यासाठी राष्ट्रीय चर्मकार महासंघाने व महासंघाचे संस्थापक अध्यक्ष माजी मंत्री बबनरावजी घोलप व प्रदेशाध्यक्ष माधवराव गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली आझाद मैदान मुंबई येथे प्रचंड मोर्चा दि. १ ऑक्टोंबर रोजी काढण्यात येणार आहे या अनुषंगाने दि. २१ सप्टेंबर रोजी संत रविदास महाराज चौक मुदखेड येथे राष्ट्रीय चर्मकार महासंघ जिल्हा नांदेडचे महानगराध्यक्ष इंजि दिगंबर भाडेकर, उत्तर जिल्हाध्यक्ष गजानन जोगदंड, युवा जिल्हाध्यक्ष विठ्ठल वाघमारे, युवती जिल्हाध्यक्ष ज्योती सोनटक्के यांनी समाज चर्मकार समाज बांधवांना मोठ्या संख्येने मुंबई येथील प्रचंड मोर्चात उपस्थित राहण्यासाठी आवाहन केले आहे. तालुका युवा अध्यक्ष सुभाष दुधंबे यांनी दि.२१ सप्टेंबर रोजी सकाळी ११ वाजता संत रविदास महाराज चौक येथे तालुक्यातील चर्मकार समाज बांधवांनी मुंबई येथे महामोर्चा मध्ये उपस्थित रहाण्याचे आवाहन केले. यावेळी राष्ट्रीय चर्मकार महासंघ जिल्हा नांदेड,व मुदखेड तालुका युवा अध्यक्ष सुभाष दुधंबे, धारबा सोनटक्के, दत्ता सोनटक्के, राजु सोनटक्के, भगवान दुधंबे, गजानन सोनटक्के, धुराजी जोगदंड, सोनाजी गंगासागरे, विकी दुधंबे, हरिश कांबळे, श्रावण दुधंबे, प्रकाश गंगासागरे, प्रदीप अन्नपूर्णे, राहुल मात्रे, यांच्या वतीने मान्यवरांचे स्वागत करण्यात आले.

# आई-वडीलारबरोबर शिक्षकांची भुमिका समाजात अतिशय महत्त्वाची : माजी आ.चव्हाण

**तभा वृत्तसेवा**
**लोहा, दि. २२ सप्टेंबर -**

आई-वडिलांबरोबरच शिक्षकांची भूमिका समाजात अतिशय महत्त्वाची असून, भावी पिघडविण्याचे काम शिक्षक करीत असल्याचे प्रतिपादन माजी आमदार रोहिदास चव्हाण यांनी केले.

१९ सप्टेंबर रोजी लोहा तालुक्यातील डोंगरगाव येथील आयोजित कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी आमदार रोहिदास चव्हाण, कैलासगीर महाराज मठाधिपती मठ संस्थान डोंगरगांव, लिंबोटीचे चेअरमन राजीव जाधव, तंटामुक्ती अध्यक्ष बालाजी पाटील बगाडे, सरपंच तानाजी धर्मापूरे उपसरपंच दत्ता बगाडे, माणिका येवले, आयोजक राजीव जाधव, ज्ञानेश्वर जाधव,विलास कांबळे आदींची उपस्थिती होती.

यावेळी पुबोलतांना माजी आमदार रोहिदास चव्हाण म्हणाले की, सध्या मोबाईलच्या अतिवापरामुळे नवीन पिढी भरकटत चालली असून शिक्षकांवर फार मोठी जबाबदारी येऊन पडली आहे. पाल्यांनी आई-वडिलांचा मान ठेवला पाहिजे, विद्यार्थ्यांच्या अंगी नम्रता आली पाहिजे. विद्यार्थ्यांना सामाजिक ज्ञान मिळणे महत्त्वाचे असून नितीमूल्याचे शिक्षण दिले पाहिजे असे सांगून माजी आमदार रोहिदास चव्हाण यांनी तुकोबांच्या 'असाध्य ते साध्य करिती सायास' याद्वारे मतितार्थ समजावून सांगत व डॉ. बाबासाहेब आंबेडकरानी दिलेला संदेश आत्मसात कराल वाचाल तर वाचाल या पंक्तीतून संत ज्ञानेश्वरांच्या जे खळांची व्यंकटी सांडो यासह अनेक उदाहरणे देत सर्वच विषयाला हात घातला. एकीकडे शाळेतील लेकरांना ड्रेस नाहीत पुस्तकाचा तुटवडा निर्माण केला जात आहे, तर दुसरीकडे सरकारच्या लाडकी बहिण योजनेवर खर्च करून देशावर कितीतरी कर्ज वासुन अल्याची खंत व्यक्त केली. गेल्या काही दिवसांपूर्वी सेवानिवृत्त झालेले सहशिक्षक बी.डी. बगाडे यांना भरभरून शुभेच्छा देत उपस्थित पालक, ग्रामस्थ, शाळेचा व उच्च माध्यमिक विद्यालयातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थ्यांची मने जिंकली.

यावेळी प्रा. नागरगोजे, मुख्याध्यापक कांबळे यांनी मनोगत व्यक्त केले. सदरील कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन कुरूळेकर यांनी मानले.

# सहकाऱ्यांना वाऱ्यावर सोडणार नाही, विधानसभा निवडणूक लढणारच : चंद्रसेन पाटील सुरनर

**तभा वृत्तसेवा**
**कंधार, दि. २२ सप्टेंबर -**

वंचित बहुजन आघाडीच्या वतीने लोहा विधानसभा निवडणूक २०२४ साठी उमेदवारी जाहीर करण्यात आली आहे, उमेदवारी मिळाली नसली तरीही मी बाळासाहेब आंबेडकर यांच्यावर नाराज नाही, ते कायम आदरस्थानी आहेत, मात्र मागील अनेक दिवसांपासून माझे सहकारी विधानसभा निवडणुकीसाठी रात्रंदिवस झटत आहेत, त्यांना वार्यावर सोडणार नाही उमेदवारी जाहीर झाल्यानंतर अनेक सहकार्यांचे फोन आले यामुळे लोहा विधानसभा निवडणूक मी पुर्ण ताकतीने लढणार आहे असे निवेदन माजी जिल्हा परिषद सदस्य चंद्रसेन पाटील प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिले आहे.



वंचीत बहुजन आघाडीची उमेदवार यादी प्रसिद्ध झाल्यानंतर मला मतदारसंघातून माझ्या सहकार्यांचे मोठ्या प्रमाणात फोन आले, मी माझ्यावर प्रेम करणार्या सर्व सहकार्यांना निरोप देऊ इच्छीतो की मी विधानसभा निवडणुक २०२४ साठी उमेदवार असणारच आहे, कुठल्याही परिस्थितीत मी निवडणूक लढवणारच आहे, याबाबत शंका नसावी, याबाबत पुढील रणनीती ठरवण्यासाठी लवकरच कार्यकर्ता मेळावा घेऊन दिशा ठरवली जाणार आहे . विधानसभा मतदारसंघातील प्रत्येक गावोगावी भेटीसाठी लवकरच नियोजन करण्यात येईल. जनमताचा आदर करुन सहकार्यांच्या आग्रहास्तव आपण निवडणूक रिंगणात असणार असल्याचे यावेळी त्यांनी सांगितले आहे.

# अशोकरावांकडून कन्या श्रीजया यांची उमेदवारी जाहीर



**तभा वृत्तसेवा**
**मुदखेड, दि. २२ सप्टेंबर -**

मुदखेड येथे खा. अशोक चव्हाण यांनी विविध विकास कामांचा भूमिपूजन सोहळा व छोटेखानी सभांमधून कन्या श्रीजया चव्हाण यांची भाजपाकडून उमेदवारी जवळपास जाहीर केली असून अनेक ठिकाणी झालेल्या छोटेखानी सभेत श्रीजया याच कमळाच्या उमेदवार असतील यांना भरभरून मतांनी विजयी करा असे आवाहन उपस्थित नागरिकांना केल्याचे पहावयास मिळाले.

भोकर विधानसभा मतदारसंघात खा. अशोक चव्हाण यांनी महायुतीकडून कन्या श्रीजया चव्हाण यांना उमेदवारी जाहीर केल्यामुळे महायुतीतील अनेक निष्ठावंत इच्छुक उमेदवार नाराज झाल्याची चर्चा असून महायुती म्हणून भाजपाच्या नेत्याने असे परस्पर जाहीर करणे चुकीचे असल्याचे अनेकांनी म्हटले आहे. भोकर मतदारसंघात महायुतीकडून अनेक अनेक जण कार्यकर्ते निवडणूक लढवण्यासाठी इच्छुक आहेत. परंतू खा. अशोक चव्हाण यांनी परस्पर कन्येची उमेदवारी जाहीर केल्यामुळे महायुतीच्या कार्यकर्त्यांनी नाराजी व्यक्त केली.

### महायुतीच्या निष्ठावंत इच्छूकांवर सतरंज्या उचलण्याची वेळ?

मुदखेड येथे दि.२१ सप्टेंबर रोजी शहरातील नई आबादी, रेल्वे स्टेशन,न्याहाळी येथे खा. अशोक चव्हाण यांनी आगामी विधानसभा निवडणूक डोळ्यासमोर ठेवून मुदखेडात विविध ठिकाणी भूमिपूजन सोहळे आयोजित करण्यात आले होते. परंतु या सोहळ्याकडे स्थानिक नागरिकांनी पाठ फिरवल्याची चर्चा होत आहे. शहरात खा.अशोक चव्हाण यांनी जवळपास साडेसहा कोटी रुपयांचे भूमिपूजन कार्यक्रम भर पावसात पार पाडले परंतु या सोहळ्यासाठी मुदखेड ग्रामीण भागातील उपरे पदाधिकारी तसेच गुत्तेदार आणि त्यांचे समर्थक यांचा मोठा भरणा व्यासपीठावर चमकोगिरी करताना पहावयास मिळाल्याने महायुतीचे अनेक निष्ठावंत कार्यकर्ते नाराज झाल्याची चर्चा आहे.

या सोहळ्यासाठी माजी आमदार अमर राजूरकर, जिल्हा मध्यवर्ती बँकेचे संचालक गोविंदराव शिंदे नागेलीकर,जिल्ह्याचे महामंत्री प्रवीण गायकवाड,मारुती शंखतिर्थकर, उद्धव पवार, तालुकाध्यक्ष बालाजी खटिंग, शहराध्यक्ष संजय सोनटक्के, गजानन कमळे, गोविंद गोपनपल्ले, मुन्ना चांडक संजय आऊलवार आदिसह कार्यकर्ते उपस्थित होते.

# हदगाव - हिमायतनगरसाठी ४ कोटी ५७ लाखाचा निधी मंजूर

## शिवसेना जिल्हाप्रमुख कोहळीकर यांच्या प्रयत्नांना यश

**तभा वृत्तसेवा**
**हदगाव, दि. २२ सप्टेंबर -**



हदगाव- हिमायतनगर विधानसभेतील विविध विकास कामाकरीता जिल्हा नियोजन समिती मधून वेगवेगळ्या योजनेतून ४ कोटी ५७ लाख रुपयाचा निधी मंजूर झाला असून शिवसेना जिल्हाप्रमुख बाबुराव कदम कोहळीकर यांनी पाठपुरावा करून हदगाव व हिमायतनगर तालुक्यातील विकासासाठी ४ कोटी ५७ लाख रूपयांचा निधी उपलब्ध करून घेतला आहे. उपलब्ध झालेल्या निधीमुळे मतदार संघातील दोन्ही तालुक्यातील विविध नगरी विकास कामांना गती मिळणार आहे.

मागील दोन वर्षापासून शिवसेना जिल्हाप्रमुख बाबुराव कदम कोहळीकर यांनी विधानसभा क्षेत्रातील ग्रामीण क्षेत्रातील रस्ते गावातील रस्त्यांचे सिमेंट करण तसेच नाल्या याकरिता वेगवेगळ्या योजनेच्या माध्यमातून विकास कामांना गती देण्यासाठी मोठ्या प्रमाणात निधी खेचून आणण्यात सातत्याने प्रयत्न केले आहे. महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व गिरीश महाजन ग्रामविकास, पंचायतराज व पर्यटन मंत्री महाराष्ट्र राज्य तथा पालकमंत्री यांच्या माध्यमातून हदगाव तालुक्यातील तळणी अंतर्गत प्राथमिक आरोग्य केंद्र नवीन इमारतीच्या बांधकाम करिता ४ कोटी १० लाख रुपये, छत्रपती शिवाजी महाराज चौक तामसा परिसर सुशोभीकरण करीता ५ लक्ष ५० हजार, दुधड वाळकेवाडी गावअंतर्गत चोकांचे सुशोभीकरण करीत ४ लक्ष ४० हजार, पळसा गावअंतर्गत चौकांचे सुशोभीकरण करणे ४ लक्ष ४० हजार, कोळी गावअंतर्गत चौकांचे सुशोभीकरण करणे ५ लक्ष ५० हजार तसेच हिमायतनगर तालुक्यातील खडकी बा. गावअंतर्गत चौकांचे सुशोभीकरण करणे ५ लक्ष ५० हजार, सरसम बु. गावअंतर्गत चौकांचे सुशोभीकरण करणे ५ लक्ष ५० हजार, कामारी गावअंतर्गत चौकांचे सुशोभीकरण करणे ७ लक्ष ७० हजार, पोटा बु. गावअंतर्गत चौकांचे सुशोभीकरण करणे ८ लक्ष ८० हजार असा एकूण ४ कोटी ५७ लाख रुपयाचा निधी मंजूर करून उपलब्ध करण्यात कोहळीकर यांना यश आले आहे. हदगाव-हिमायतनगर मतदारसंघात मध्ये जिल्हा नियोजन समिती मधून वेगवेगळ्या योजनेतून सह मंजुरी देऊन निधी उपलब्द करुन दिल्या बदल महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व गिरीश महाजन ग्रामविकास, पंचायतराज व पर्यटन मंत्री महाराष्ट्र राज्य तथा पालकमंत्री नांदेड यांचे आभार मानले.

# देशातील सामाजिक सलोखा बिघडवणाऱ्यांवर कारवाई करा

**तभा वृत्तसेवा**
**मुदखेड, दि. २२ सप्टेंबर -**

देशात सामाजीक सलोखा बिघडवणारे अपशब्द वक्तव्य करणारे रामगीरी महाराज व नितेश राणे यांना तात्काळ अटक करण्यात यावे यासाठी दि. २० सप्टेंबर रोजी मुदखेड शहरातील समस्त मुस्लीम बांधवाचे तहसील कार्यालया समोर एकदिवसीय धरणे आंदोलन.

इस्लाम धर्माचे संस्थापक पैंगबर आप हुजूर (स.अ.) यांच्या बद्दल रामगीरी महाराज यांनी सार्वजनिक कार्यक्रमात अपमानस्पद व चुकीचे शब्द वापरून समस्त इस्लाम धर्मीयांच्या भावना दुखावल्या आहेत. त्यांच्या या वादग्रस्त वक्तव्यामुळे महाराष्ट्रासह संपुर्ण देशात



इस्लाम धर्मीय लोकांमध्ये संतापाची लाट उसळली आहे.

आप हुजूर मोहम्मद पैंगबर (स.अ.) यांच्या शिकवीणी नुसार इस्लाम धर्मीय शांतता प्रिय असुन भारत देशातील मुस्लीम समाज सविधानावर विश्वास ठेवून सदैव राष्ट्रीय एकता- एकात्मता जोपासण्याचा प्रयत्न करित आलेला आहे. महाराजांना अटक न होने शासनाचे अपयश म्हणावे की, मुस्लीम समाजामध्ये असंतोष निर्माण करण्याचे षडयंत्र म्हणावे? हि बाब अनाकलनील आहे. तसेच सत्ताधारी आमदार नितेश राणे हे उट सूट मुस्लीम समाजाच्या भावना भडकविणारे, मुस्लीम समाजाला धमक्या देणारे वक्तव्य सार्वजनिक कार्यक्रमातुन करित आहेत.

मुदखेड शहरातील सकल मुस्लिम समाजाच्या वतीने आज दिनाक २० सप्टेंबर रोजी दुपारी शहरातील तहसील कार्यालयासमोर धरणे आंदोलन करण्यात आले होते धरणे आंदोलनात शहरातील मुस्लिम धर्म गुरूंनी भाषण करत आपला रोष व्यक्त केले तहसील प्रशासनाच्या वतीने नायब तहसिलदार मारोतराव जगताप यांनी निवेदन स्वीकारले.

धरणे आंदोलनात कोणत्याही प्रकारचा अनुचित प्रकार घडू नये या संदर्भात अर्धापूर रेंजचे उपविभागीय पोलीस अधिकारी डेनियल बेन यांच्या मार्गदर्शनाखाली मुदखेड पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक वसंत सप्रे यांच्या नेतृत्वाखाली सहायक पोलिस निरीक्षक बाबसाहेब कांबळे,पोलीस उपनिरिक्षक शिवाजी पाटील शिंदे , पोलीस उपनिरिक्षक बंडू गवई , पोलीस जमादार किशोर पाटील, चंद्रशेखर मुंडे, बलवीर सिघ ठाकूर ,एन बी रघुवंशी, डी.जी.चक्रधर, इरलेवाड ,पांचाळ, जाधव , झूंजारे, शेख समदानी , शेख मकसूद सह होमगार्ड यांनी चोख बंदोबस्त ठेवला होता सकल मुस्लिम समाजाच्या वतीने शहरातील मुस्लीम व्यापाऱ्यांना दिनांक २० सप्टेंबर रोजी आपले दुकाने, पदस्थापना बंद ठेवण्याचे आव्हान करण्यात आले होते आज दिनांक २० सप्टेंबर रोजी दुपारी २.३० वाजता तहसील कार्यालय समोर धरणे आंदोलन कार्यक्रमाची सुरुवात हाफिझ याहिया यांनी नाते कलाम सादर करत केली,यावेळी हाफीज इमरान रजा ,हाफीज अतिक उर रहमान ,मुफ्ती सुलेमान नदवी, मौलाना काजी अब्दुल्ल लतीफ कासमी, मुफ्ती मोहसीन सिद्दिकी,मुफ्ती नइम,माजी उपाध्यक्ष करीम खान साब यांनी आपल्या भाषणातून प्रेषित मोहम्मद पैंगबर बदल वादग्रस्त वक्तव्य केलेल्यावंर कठोरात कठोर कलमे लावत अटक करून कारवाई करण्याची मागणी केली ,शहरातील रेल्वे स्टेशन परिसर दक्षिण भाग,नवी , मोंढा या भागातील मुस्लीम दुकानदारांनी आपापले दुकाने बंद ठेवत धरणे आंदोलनात मुस्लीम समाजातील नागरिकांनी आणि युवकांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला होता.